म. ग्रं. मं. ठाणे
विषय चरित्र
स. नं. ५११

RLLBK-0007785

# आषाढी–कार्तिकी

( संत-चरित्रांचें-दर्शन )

—लेखक—

भा. द. खेर,
बी. ए.

RLI BK-0007785

ह. भ. प. सोनोपंत दांडेकर, [illegible]
एम्. ए.

मूल्य अडीच रुपये.

* ज य श्री-प्र का श न
२, नारायण पेठ, पुणें २.

* मुखपृष्ठावरील तिरंगी चित्र
श्री. रघुवीर मुळगांवकर

* सर्वाधिकार लेखकाधीन

* प्रसिद्धी दिन
आषाढ शुद्ध ११ शके १८७४

* लेखनकाल
१-२-५२ तें ७-६-५२.

* हस्तलिखिताची पृष्ठसंख्या
१६८

* मुद्रक
रोहिणी मुद्रणालय,
लक्ष्मी रोड, पुणें २.

क्र. ११६८७
१।१।५३

# अर्पण--पत्रिका

ज्यांचें आयुष्य धर्म आणि सत्कृत्य यानींच शोभिवंत झालेलें आहे अशा मातृतुल्य श्रीमती सौ. राजकुमारी देवी याना सादर समर्पण !

—लेखक

# ह. भ. प. श्री. सोनोपंत दांडेकर

# यांची प्रस्तावना

भागवत धर्म मंदिराचा पाया रचणारे श्री ज्ञानदेव, त्याचा विस्तार करणारे श्री नामदेव, त्यावर ध्वजा लावणारे श्री एकनाथ व त्यावर कळस होऊन बसलेले श्री तुकाराम बोवा या भागवत-संप्रदायी प्रमुख संत चतुष्टयाचें दर्शन श्री. भा. द. खेर यांनीं या पुस्तकात करून दिलेलें आहे. संतचरित्राकडे वाचकाचें लक्ष्य वेधणें हा या पुस्तकाचा मुख्य हेतु आहे व तो खास साधला आहे यात काहींच शंका नाहीं. ज्याचें दर्शन झालें त्याच्याशीं संभाषण करून त्याच्यापासून विवेकाच्या दोन गोष्टी शिकण्याकरितां वेळ काढण्याची इच्छा दर्शनेच्छु लोकाना झाल्याशिवाय राहणार नाही रूपक बाजूस सारून बोलावयाचें तर श्री. खेर यांनीं लिहिलेलीं हीं चरित्रें वाचून वाचकाची जिज्ञासा अधिक वाढेल व तो संत चारित्राच्या अभ्यासाकडे अधिक वळेल यांत मुळींच संशय नाहीं.

हीं चरित्रें म्हणजे बोलून चालून दर्शनेंच असल्यानें ह्यात चरित्रांतील प्रमुख घटनाचाच उल्लेख केलेला आहे. चरित्राकडे वाचक वळावेत असा हेतु असल्यानें चरित्र-कथनांत निष्कारण निर्माण होणाऱ्या अनेक वादागात ग्रंथकार शिरले नाहींत. पण याचा अर्थ विवेचक बुद्धि सोडून देऊन त्यानीं केवळ अंध-भक्तिवर उभारलेला फापट-पसारा वाचकासमोर उभा केला आहे असें मात्र नव्हे. श्री. खेर यानीं स्वत च म्हटल्याप्रमाणें आधुनिकता व अश्रद्धा या दोन गोष्टींचा वस्तुत काहींच अन्योय-संबध नाहीं. श्रद्धा व विवेचक बुद्धि याचा उपजत तटा असण्याचें काहींच कारण नाहीं. उदाहरणार्थ, तुकारामबोवा जर स्वतः म्हणतात की ' बालवेषात ' आपणास श्रीहरि भेटला तर ही गोष्ट त्याचें चरित्र लिहिणारानें

मराठी ग्रंथ ... क्र. ... ५९९

देणेंच अवश्य आहे. नामदेव जर म्हणत असेल की मारवाडांत माझ्यादेखत कूप पाण्यानें उचबळून आला तर तेंहि देणें अवश्य आहे. या गोष्टी न देणें म्हणजे तुकारामबोवा व नामदेव वेडे-भाबडे होते असें म्हणण्यासारखेंच आहे. ही विवेचक बुद्धि नव्हे. ती स्वत.च्या ज्ञानाची घमेंड आहे. तुकारामबोवा सत्यच सांगेन अशी जर प्रतिज्ञा करतात व त्याप्रमाणें ती सर्वत्र पाळताना दिसतात, मग केवळ आपल्या अनुभवास येत नाही म्हणून एवढेंच ते भाबडे-पणानें मानतात असें म्हणणें ही विवेचक बुद्धि खचित नाहीं. या साऱ्या गोष्टी जमेस धरूनच श्री. खेर यानीं हीं चरित्रें लिहिलेलीं आहेत.

हे सर्व संत मोठे कार्यकर्ते असे होऊन गेले. या सर्वांचें कार्य नामदेवाच्या शब्दांत सांगावयाचें तर पुढीलप्रमाणें सांगता येईल.

नाचू कीर्तनाचे रंगीं। ज्ञानदीप लावू जगीं ॥

ज्ञानाचा नंदादीप, पतिताचा दीपस्तंभ, अनाथाचा नाथ, भक्तिमार्ग प्रदीप, याप्रमाणें प्रत्येक संताचें वैशिष्टय दर्शविण्याकरिता श्री. खेर यानीं या प्रत्येक चरित्राला सार्थ असें नाम दिलें आहे. 'पतिताचा दीपस्तंभ' या नामाभिधानानें नामदेवाचें कार्य संपूर्णतया दर्शविलें जात नाही. तर श्री. खेर यांनी नामदेव चरित्रात म्हटल्याप्रमाणें, "आपलें नाम ज्यानीं देव बनविलें अशी त्याच्या नावाची प्रतिष्ठा प्रस्थापित झालेली आहे." त्या दृष्टीनें नामदेव हे 'नामाचा दीपस्तंभ' होते.

जाता जाता आणखी एक गोष्ट तीहि नामदेवाच्या संबधानें असल्यामुळें सांगणें अवश्य आहे. नामदेवाच्या प्रस्तुतच्या छापील गाथाचें संशोधन होणें अगत्याचें आहे. वारकरी व नामदेव शिंपी-समाज हा नामदेव त्यांच्या लहान वयांत दरोडेखोर होते हें मान्य

करीत नाहीं. श्री. खेर यानीं या पुस्तकात अन्य युक्तिवाद करून-देखील अखेरीस नामदेव हे दरोडेखोर नव्हते असेंच मानलें आहे श्री. पाटसकरानीं एक उत्कृष्ट निबध लिहून ज्यात नामदेव हे दरोडेखोर होते असें सांगितलें आहे तो अभग नामदेवाचा कसा नसावा याविषयीं उत्कृष्ट पुरावा आणून तें मत चागलें खोडून काढलें आहे.

श्री. खेर यांच्या या ग्रथाची भाषा सरळ व ओघवती अशी आहे. चरित्र सागण्याची पद्धत चटकदार आहे व कोणतेंहि चरित्र वाचावयास घेतलें कीं सपेपर्यंत खाली ठेववत नाही अशी ती आकर्षक आहे.

श्री. खेर यानीं सर्वांना " संत पाहो, सत पाहो " म्हणून या पुस्तकाचे द्वारा नुसती हाक मारली आहे असें नव्हे तर त्याचें दर्शनहि करून दिलें आहे. त्याच्या या हाकेस ओ देऊन, डोळे उघडे ठेवून जर वाचकानी सतदर्शन घेतलें तर माझी खात्री आहे कीं त्याना सताचा अधिक परिचय व्हावा, त्याच्यापासून दोन गोष्टी शिकाव्या अशी इच्छा उत्पन्न होईल. श्री. खेर यानीं या ग्रथाचें रूपानें मोठी सेवा केली आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात —

तेहि प्राणापरौते । आवडती हें निरुतें ।
जे भक्तचरित्रातें । प्रशसिती । ( १२-२२७ )

( जे भक्त-चरित्राची प्रशसा करतात, तेहि आम्हाला (श्रीकृष्णांना) प्राणापलीकडे आवडतात, हें सत्य समज. )

पुण्यपत्तन
आषाढ शु।। १ शके १८७४
२३-६-१९५२

**शं. वा. दांडेकर**

दों = ९३५८०४
७।८।५२

## दर्शन घेण्यापूर्वी—

हीं संतचरित्रें मी प्रामुख्यानें भाविक लोकांच्यासाठींच लिहिलेलीं आहेत. आधुनिकता नि अश्रद्धा या दोन गोष्टींचा वस्तुतः कांहींच अन्योन्य-संबंध नाहीं. काळाबरोबर माणसाच्या श्रद्धाहि बदलत जातात ही वस्तुस्थिति मान्य करून देखील कांहीं सनातन गोष्टी अशा असतात की त्यांच्यावर परंपरागत श्रद्धा ही ठेवावीच लागते. काळाबरोबर त्या श्रद्धेचीं पावलें बदलून भागत नाहीं. माझ्या मतानें संतचरित्रें हीं अशाच सदरात मोडतात आणि म्हणूनच त्यांच्या अत्यंत उज्वल जीवनातील परंपरागत प्रसंग आहेत तसेच ते मानणें युक्त होईल. आधुनिकतेचा हात त्यांच्यावर फिरता उपयोगी नाहीं. निदान मी तसा हात त्यांच्या चरित्रावर फिरविलेला नाहीं आपल्या पवित्र सनातन परंपराचा वारसा आहे तसाच तो पुढें चालविणें हें मी माझें कर्तव्य मानलें आहे नि त्यानुसारच मी हीं संतचरित्रें लिहिलेलीं आहेत. नव्या आधुनिक पिढीलाहि तीं खचित मार्गदर्शक वाटतील असा मला विश्वास वाटतो. एखाद्या मार्गदर्शक दीप-स्तंभाचें नाना दिशानीं दिसणारें विविध दर्शन विलोभनीय वाटतें. तीच गोष्ट या संतचरित्रांचीहि आहे.

हीं संतचरित्रें इतकीं विविधतेनें नटलेलीं आहेत कीं त्याचें इतक्या अल्पावकाशात समग्र दर्शन करून देणें शक्यच होणार नाहीं तथापि अनेक संतवाङ्मयविषयक ग्रंथ वाचून मी त्यांच्या चरित्रातील बहुतेक सर्व घटनाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्थात् त्या चरित्राचें हें केवळ दर्शन आहे. एखाद्या मंदिराबाहेर उभे राहून आपण दुरून देवाचें दर्शन घेतो त्याप्रमाणें! परंतु तें तसें दर्शन घेतल्यानंतरच त्या देवाजवळ जाऊन त्याचें समग्र स्वरूप जाणून घेण्याची आपल्या अंतःकरणात इच्छा होत असते. एवढें कार्य जरी या माझ्या संतचरित्रांच्या दर्शनानें केलें तरी मला आनंद वाटेल.

संत चरित्रात अनेक वाद मूळ धरून बसलेले आहेत. परंतु ज्या वादाच्या प्रहारानें आपली श्रद्धाच उन्मळून पडेल अशा कोणत्याहि वादाची चर्चा या चरित्रात मी केलेली नाहीं. संत-जन्माच्या काल-निर्णय-वादांत तर माझें मन मुळींच रमले नाहीं.

मी एवढेंच धरून चाललो कीं हे सारे थोर धर्मात्मे निश्चित जन्मले होते; आणि त्यांनीं भावी पिढ्याना पृथ्वी मोलाचा पवित्र वारसा देऊन ठेवलेला आहे. तो वारसा हाती घेताना आपण त्याच्या-विषयी सदैव कृतज्ञ असले पाहिजे आणि भावी पिढीलाहि तेच कृतज्ञतेचे धडे आपण शिकविले पाहिजेत.

अशा पुस्तकाला ह. भ. प. श्री. सोनोपंत दांडेकर यांच्यासारख्या थोर "आधुनिक संताची" प्रस्तावना लाभावी हें मी भाग्य समजतो. त्यांच्याविषयीं मी माझ्या भावना व्यक्त करू शकत नाहीं. शब्दांच्या स्पर्शानें त्या भावनेचीं कुसुमें कोमेजून जातील. मी फक्त एवढेंच म्हणतो कीं मी त्यांचा सदैव ऋणी राहीन !

या पुस्तकाला अनेक सद्गृहस्थांचें अमोल सहाय्य लाभलेलें आहे. प्रथम माझे परमप्रिय स्नेही 'रोहिणी'चे संपादक श्री. वसंतराव काणे नि श्री. रामभाऊ जोशी यांनीं हरतऱ्हेनें मला सहाय्य केलें. तीच गोष्ट मुंबईचे ब्लॉक मेकर श्री. डी. डी. नेरॉय यांची ! मुंबईचे श्री. विष्णुपंत माईणकर यानाहि या बाबतींत विसरणें योग्य होणार नाहीं. तसेच कोणतेंहि संदर्भ पुस्तक माझ्यासमोर विनाविलंब उपस्थित करून 'केसरी-मराठा' ग्रंथालयाच्या चालक वर्गानें मला नेहमींप्रमाणेंच सहाय्य केलेलें आहे. शेफर्डस् ॲबर-डिव्हाईन या संस्थेचे चालक श्री. आर. जी. तांडे यांनीं दुर्मिळ कागद उपलब्ध करून, श्री. शंकरराव परभाणे यांनीं सारा मजकूर वेळेवर जुळवून देऊन नि स्वाधीन मुद्रणालयाचे चालक श्री. पाध्ये बंधू यांनी तो वक्तशीर मुद्रित करून मला अपार सहाय्य दिलें. मुखपृष्ठाची आकर्षक सजावट श्री. मुळगावकर यांनी करून दिलेली आहे. श्री. स.र. चिंचळकर यांनीं वारकरी संप्रदायात नेहमीं म्हटले जाणारे निवडक अभंग काढून दिले ते पुस्तकाच्या शेवटीं दिल्यामुळें पुस्तकाची उपयुक्तता फारच वाढली. या सर्व मंडळींचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

२ नारायण पेठ
पुणें २.

आपला नम्र
—भा. द. खेर

# ज्ञानाचा नंदादीप—ज्ञानदेव : १

“ तुमच्या मुलाची मुंज होऊं शकणार नाहीं. कारण तुमचा अपराधच इतका घोर आहे ! आणि तुमच्या त्या अपराधाला देहांताशिवाय दुसरें प्रायश्चित्तच नाहीं ! ! ”

आळंदीच्या ब्राह्मणाचा हा निर्णय ऐकून विठ्ठलपंताच्या हृदयाचा थरकाप उडाला. त्यांना स्वतःच्या देहाचे असे बंध राहिले नव्हते. परंतु आपल्या प्रिय पुत्राच्या देहसंस्काराचे बंध मात्र त्यांच्या अंतःकरणांत पुरेपूर जागृत होते. त्यामुळें ब्राह्मण-वर्गाचा तो निर्णय ऐकून विठ्ठलपंताच्या डोळ्यासमोर अक्षरशः विश्व उभें राहिलें. एका क्षणांत सारी दारुण परिस्थिति त्यांच्या ध्यानीं आली. आपल्या लाडक्या निवृत्तीची नि ज्ञानेश्वराची मुंज आतां होऊं शकणार नाहीं. मग त्या लहानग्या सोपानाची तरी मुंज कोठून होणार ! या विचारानें त्यांच्या हृदयाचें पाणी पाणी होऊन गेलें.

ज्ञानेश्वराच्या वडिलांनीं संन्याशाचा संसार थाटला होता. त्यांनीं गृहस्थाश्रमांत पुन्हा पदार्पण केलें होतें. त्यांचा हा अपराध त्यांना मान्य होता. त्या अपराधासाठीं वाटेल तें प्रायश्चित्त घेण्यास ते सिद्ध होते. एखाद्या शास्त्राधारानें आपल्या प्रिय पुत्रांची मुंज होणार असेल तर एकच काय पण आपले सात जन्माचे देह अर्पिण्यास

त्याची सिद्धता होती. परतु आपलीं मुलें वाऱ्यावर टाकून जाण्याची त्याची तयारी नव्हती त्याचे सारे उपनयन सस्कार होऊन ब्राह्मण समाजात त्याना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी अशी विठ्ठलपंतांची उत्कट इच्छा होती.

परतु त्याच्या त्या नैसर्गिक इच्छेला आळदीच्या ब्राह्मणानी सुरुग लावला. विठ्ठलपतानीं त्या ब्राह्मणापुढें साक्षात् दडवत घातला आणि ते त्याना काकुळतीनें म्हणाले, " आम्ही पतित आहोत. आपण आम्हाला पावन करून द्या. आमचे सारे अपराध भले-पणानें पोटात घाला. परमपूज्य गुरुची आज्ञा शिरसावद्य मानून मी पुन्हा गृहस्थाश्रमात पदार्पण केलें आहे कामवासनेच्या आहारीं जाऊन मी हें कृत्य मुळीच केलेलें नाही. तथापि आपण सागाल ती शिक्षा भोगण्यास मी तयार आहे. परतु माझ्या मुलाच्या मुजी होतील असा काही शास्त्राधार शोधून काढा. "

हे शब्द उच्चारून केवळ्या काकुळतीनें त्यानीं त्या ब्राह्मण समाजाकडे बघितले ! परतु त्याचा काहीं एक उपयोग झाला नाहीं. विठ्ठलपताचे शब्द वाऱ्यावर विरून गेले. त्यांचें सारें अध्यात्म रूढीपुढें लुळें पडलें. रूढीनें माणुसकीवर मात करून तिला पाया-खालीं चिरडले. जणू पुरातन सस्कृतीचे आपण एकमेव ठेकेदार आहोत अशा आविर्भावानें त्यानीं विठ्ठलपताना देहान्त प्रायश्चित्त फर्मा-विलें. त्याच्या मुलाच्या मुजींना मात्र शास्त्राधार सापडू शकला नाहीं.

विठ्ठलपताचा अगदीं नाइलाज झाला. ज्या त्याच्या पुत्रानें पुढें उभ्या विश्वाला अध्यात्माचा सदेश दिला त्या त्याच्या पुत्राच्या मुजीला मात्र शास्त्राधार सापडू शकला नाहीं. ब्राह्मण्याचें द्वार त्याला बद होऊन गेलें. आणि अशारीतीनें विठ्ठलपताचा मानबिंदु दुखावला गेला

त्याना आता जीवनात कसलाहि आनद उरलेला नव्हता. वस्तुत: वैराग्य हा त्याच्या जीवनाचा मूळ पिंड होता. देहधर्माविषयी त्याची मूळचीच वृत्ति उदासीन अशी होती. त्या वृत्तीवर निर्घृण रूढीनें अखेरचा प्रहार केला होता. आपल्या पत्नीला त्यानीं सारी परिस्थिति निवेदन केली. ती ऐकून ती महासतीहि व्याकुळ झाली. आपल्या पोटच्या प्रिय पुत्राच्या प्रतिष्ठेपुढें त्या पतिपत्नींना आपलें जीवन कवडीमोल होतें. तें त्यानीं गगार्पण करण्याचा निश्चय केला.

ज्या परमेश्वरावर त्याची अढळ श्रद्धा होती त्या परमेश्वरावर आपल्या मुलाचा सारा भार टाकून तीं पतिपत्नी प्रयागला येऊन दाखल झालीं; आणि ज्या ठिकाणीं गगा-यमुना याचा पवित्र सगम होतो त्याठिकाणी त्यानीं आपलीं जीवितपुष्पें अर्पण केलीं आणि तो गगा-यमुनेचा सगम अधिकच पवित्र करून सोडला. जन-सागरावर दैववशात् जणू दोन मानवी बुडबुडे उद्भवले नि नष्ट होऊन गेले, एवढीच जगाच्या दृष्टीनें त्या दोघाच्या या निर्गमनाची किंमत होती. परतु मानवी रूढीच्या इतिहासावर एका नव्या क्रातीची लाट उसळत होती आणि त्या लाटेच्या योगानें रूढीचे जुने सकेत पार धुतले जात होते या गोष्टीची जगाला यत्किंचित्‌हि कल्पना नव्हती.

परतु इकडे त्या चार मुलाच्या अत करणात मात्र या कल्पनेचा उद्भव स्पष्टपणानें घडत होता.

प्रथम काहीं दिवस त्या अनाथ मुलाना अत्यत दारुण परि-स्थितीला तोंड द्यावें लागलें. आईबाप निघून गेले तेव्हा थोरल्या निवृत्तिनाथांचें वय फार तर दहा वर्षांचें होतें आणि धाकटी मुक्ता-बाई उणीपुरी पाच वर्षांचीहि नसेल. खरोखर त्याच्यावर दैवाची कुऱ्हाड कोसळली होती. आपले आईबाप आणि तेहि अशा तऱ्हेनें या जगातून नाहींसे झाले ही वार्ता जेव्हा त्याच्या कानावर आली

तेव्हां एकमेकांच्या कुशीत बसून तीं छबकडीं टाहो फोडून रडली असतील. कोणी कोणाचें सान्त्वन करावयाचें हा त्या ठिकाणीं प्रश्न नव्हता; आणि कोणी कोणाला आधार द्यावयाचा हेंहि कोणाला समजण्यासारखें नव्हते.

परंतु दुष्ट जगाचे आघात सोसून एकप्रकारचा समजुतदारपणा त्यांच्या अंगीं त्याहि वयात आलेला होता. दुःखाचा पहिला बहर ओसरल्यानंतर त्यांनीं आपल्याला सावरलें. अशा तऱ्हेच्या दुःखाला अंत नसतो ही गोष्ट त्यांनीं बरोबर ओळखली. जगातून त्यांना कसल्याहि प्रकारचा आधार मिळण्यासारखा नव्हता. उलट सारें जग एकप्रकारच्या दुष्टाव्यानें त्यांच्याविरुद्ध उभें ठाकलें होतें. त्या तसल्या जगाशीं त्यांना टक्कर द्यावयाची होती. साऱ्या परिस्थितीचा त्यांनीं साकल्यानें विचार केला. त्या साऱ्या भावंडाच्या आयुष्याचा अक्षरशः उन्हाळा होऊन गेला होता. त्या ठिकाणीं पावसाळा निर्माण करण्यासारखी परिस्थिति त्यांना आता उत्पन्न करावयाची होती. आपल्या ज्येष्ठ बंधूला—त्या निवृत्तिनाथाला—गुरुस्थानीं मानून तें कार्य करण्यासाठीं श्री ज्ञानेश्वर बद्धपरिकर झाले आणि त्यांनीं आपल्या पुढील महान् कार्याची मुहूर्तमेढ रोवली.

आईबापाच्या मृत्यूची भीषण वार्ता कळल्यानंतर हीं सारी मुलें आपल्या मूळ ठिकाणीं म्हणजे आपेगावास राहण्यासाठीं गेलीं. त्यांना कुणाचाच आधार नव्हता. त्यांच्या परिस्थितीप्रमाणेंच मोडकळीला आलेलें त्यांच्या पूर्वजाचें जुनें घर आणि अल्पसा जमिनीचा तुकडा एवढाच काय तो त्यांना आधार उरला होता. हीं संन्याशाचीं मुलें असल्यामुळें भाऊबंदाचीं घरें त्यांना बंद झालीं होतीं. 'हें विश्वाचि माझें घर' याप्रमाणें त्या भावंडाची स्थिति झाली होती. अशा स्थितींत टीचभर पोटासाठीं दारोदार भीक मागण्याचा मार्ग

त्याना पत्करावा लागला. निवृत्तीनीं नि ज्ञानेश्वरानी दारोदार जाऊन भिक्षा मागावी आणि जो काय तुकडा मिळेल तो आपल्या अश्रूंच्या पाण्यात भिजवून त्या चौघानीं एकत्र येऊन खावा, अशा प्रकारचे त्याचे दिवस चालले होते. त्या काळीं बहिष्काराचा प्रभावच इतका होता की या चार मुलाना पोटापुरती भिक्षाहि घालण्यास कोणी तयार होईना. ज्या ज्ञानेश्वरानी अखिल विश्वाला अमृताचे कुभ वाटले त्या ज्ञानेश्वराना भाकरीचा चतकोर तुकडाहि महाग झाला ही गोष्ट विशिष्ट कालाचा महिमा दर्शविणारी आहे यात कसलीहि शका नाहीं.

काहीं काहीं वेळा या मानवी आयुष्यात अशी विचित्र परिस्थिति निर्माण होते कीं त्या परिस्थितीपुढें माणसाला नमावें लागतें. त्या-ठिकाणी ती परिस्थिति तें मानवी जीवन घडवीत असतें. परतु उलट काहीं वेळा एखाद्या परिस्थितीवर एखादा मनुष्य मात करतो आणि ती विशिष्ट परिस्थिति आपल्या अगातील प्रभावानें पार बदलून टाकतो. त्या ठिकाणी मनुष्य ती परिस्थिति घडवीत असतो.

ज्ञानेश्वर महाराज हे दुसऱ्या वर्गात मोडणारे थोर पुरुष होते. काहीं एका विशिष्ट मर्यादेपर्यंत त्यानीं परिस्थितीला आपल्यावर मात करू दिली. मन मारून नि अत.करणाची कवाडें बद करून साऱ्या गोष्टी त्यानीं मुकाट्यानें सहन केल्या. परतु त्याच्या सहन-शिलतेची मर्यादा आता सपत आली होती. सृष्टीमाता त्याच्या ठिकाणी नव्यानें होणाऱ्या स्फुरणाची आतुरतेनें वाट बघत होती. अनुकूल काल त्याच्या दिशेने हळुहळू पावले टाकीत येत होता. त्या कालाचें स्वागत करण्यास ज्ञानेश्वर सिद्ध झाले.

मग तीं सारी भावडें आळदीस आलीं. आपण आता मुज करावी असा विचार ज्ञानेश्वराच्या मनात घोळू लागला. ज्या एका गोष्टी-

साठीं आपल्या आईवडिलांनीं देहत्याग केला ती गोष्ट कार्यवाहींत आणल्याशिवाय पितृऋणातून आपण मुक्त होऊं शकणार नाहीं, असें त्याच्या मनानें घेतलें. मुंजीचा हा विचार त्यांनीं निवृत्तिनाथांना बोलून दाखविला परंतु ज्ञानेश्वराचे हे परात्पर गुरु साऱ्या देहधर्मांच्या पलीकडे केव्हाच निघून गेले होते त्यांना स्वतःच्या देहाची शुद्धी राहिली नव्हती. मग देह–संस्काराची शुद्धी कोठून रहाणार ? परंतु ज्ञानेश्वरांची गोष्ट काहींशी वेगळी होती. वर्णाश्रम-धर्माची ध्वजा रक्षण करण्यासाठीं नि विश्वात् ती नव्यानें फडकविण्यासाठी ज्ञानेश्वर महाराजांचा अवतार होता. तेव्हां कचित्-प्रसंगीं ब्राह्मणांच्या पाया पडून, त्यांच्यापुढें काकुळती करून आपली मुंज आपल्या पदरात पाडून घ्यावी आणि ब्राह्मणाचे अधिकृत अधिकार प्राप्त करून घ्यावेत अशा मताचे ज्ञानेश्वर होते.

परंतु जो आळंदी गाव त्यांच्याच नाममहिम्यामुळे पुढें विश्रांतीचा ठाव झाला त्या आळंदी गावातील ब्राह्मणांनीं त्यांची मुंज करण्याचें साफ नाकारलें आणि शुद्धिपत्रासाठीं त्यांना पैठणची वाट दर्शविली

मग निवृत्तिनाथ आपल्या लहानग्या भावंडांना पाठीशी घालून पायीं प्रवास करीत करीत पैठणला येऊन दाखल झाले. दुर्दम्य आशावाद नि ब्राह्मणांशी वादविवाद करण्याचा आत्यंतिक आत्म-विश्वास एवढेंच भांडवल त्या भावंडांच्याजवळ होतें. पैठणला आल्यानंतर त्या चौघांनीं गोदातीरीं यथाविधी स्नान केलें नि तें गोदातीर आपल्या स्नानाने पवित्र करून सोडले. त्यानंतर आपल्या वडिलांच्या मामाकडे त्यांनीं आपला मुक्काम ठोकला. चार दिवसांनीं पैठणकरांची सभा भरली. त्या सभेंतील सज्जनापुढें निवृत्तिनाथांनीं साष्टांग नमस्कार घातला आणि आपला पदर पसरून ते त्या सभास्तारांना मोठ्या काकुळतीच्या स्वरात म्हणाले, “ आम्हीं अनाथ

आहोत. दीन आहोत. पतित आहोत. आपण आमच्यावर कृपा करा आणि आम्हाला पावन करून घ्या. "

परंतु हें बोलताना निवृत्तिनाथाची वृत्ति मात्र मुळींच विचलित झाली नव्हती. त्याच्या मुखावर आत्मिक समाधानाचें विलक्षण तेज पसरलें होतें. त्याच्या स्वरात काकुळती होती; परंतु अंत करणात मात्र पुरेपूर आनंदी वृत्ति नांदत होती. वस्तुत साक्षात् शुद्धीला शुद्ध करण्याचें आत्मिक बल त्याच्या ठायीं होतें. परंतु केवळ लोकोपचारासाठीं या त्याच्या साऱ्या गोष्टी चालल्या होत्या. लोक-संस्थेच्या हिताहिताची सदैव काळजी वहाणाऱ्या ज्ञानेश्वरासाठीं या गोष्टी करणे त्याना भाग पडत होतें.

सभेंतील सभासदानीं निवृत्तिनाथाचें भाषण शांतचित्तानें ऐकून घेतलें एखादा शास्त्राधार हुडकण्यासाठी अनेक स्मृतिग्रंथ उलथे-पालथे झाले परंतु संन्याश्याच्या मुलाना शुद्ध करून घेण्याजोगा असा एकहि शास्त्राधार काही केल्या सापडेना आणि शास्त्रापेक्षा रूढी ही तर अधिक बलवत्तर होती केवळ मानवी प्रार्थनेनें तिच्या दृढ शृंखला तुटण्याजोग्या नव्हत्या.

अखेरीस हतबुद्ध होऊन पैठणकर ब्राह्मणानी आपला निर्णय घोषित केला. ते म्हणाले, " संन्याश्याच्या मुलाची मुंज व्हावी असा एकहि आधार धर्मशास्त्रांत सांगितलेला नाहीं. यास्तव तुमची मुंज होऊं शकणार नाहीं. एखाद्या प्रायश्चित्तानें तुम्ही पावन व्हाल अशीहि परिस्थिति नाहीं आता एकच गोष्ट करणें तुम्हाला शक्य आहे. सदैव हरिचिंतन करीत जा. ब्राह्मणापासून ते चांडालापर्यंत सर्वांठायीं परमेश्वर स्वरूप मानून त्याची भक्ति करीत जा. सर्वत्र परमेश्वराची वसती कल्पून त्याच्या ठिकाणी लीन होऊन रहा. लग्न करून उगाच संसार वाढवू नका!"

ब्राह्मणाचा हा निर्णय ऐकून निवृत्तीनाथ आदींच्या वृत्ति क्षण-भर क्षुब्ध होऊन गेल्या असतील. केवळ शास्त्राधार नाहीं यासाठीं त्याना आपल्या नैसर्गिक मानवी अधिकाराना मुकावें लागत होतें. या गोष्टीचा संताप त्यांच्या मनात उफाळला नसेल असें म्हणवत नाहीं. त्यांच्या नावाप्रमाणें त्यांची स्वतःची वृत्ति जरी निवृत्तिपर होती तरी रूढीनें वा शास्त्रानें लादलेली निवृत्ति त्याना मानव-ण्याजोगी नव्हती. किंबहुना त्याचसाठीं आळंदीपासून वणवण प्रवास करीत ते पैठणला येऊन दाखल झाले होते. त्याना त्यांचे नैसर्गिक अधिकार प्राप्त करून घ्यावयाचे होते. "मी संसार करणार नाहीं!" आणि "तुम्हाला संसार करता येणार नाहीं!" या दोन प्रकारच्या म्हणण्यात जमीन-अस्मानाचें अंतर होतें. पहिल्या म्हणण्यात स्वतःचेंच स्वतःवर खुषीचें बंधन होतें आणि दुसऱ्यात जुनाट रूढीची आणि सनातन शास्त्राची सक्तीची आज्ञा होती. माणसाला स्वखुषीचें बंधन मानवतें, पण सक्तीची आज्ञा परवडत नाहीं.

आणि ज्या ब्राह्मणानीं या शास्त्राज्ञेचा घोष केला त्या ब्राह्मणाची तरी काय पात्रता होती? पंचपक्वानाचें भोजन पोटात गडप करून दुसऱ्याला उपवासशास्त्राचे धडे देण्याचा तो निष्ठुर प्रकार होता. स्वतःच्या संसार-सुखांत आकंठ स्नान करून दुसऱ्याला विर-क्तीच्या गोष्टी शिकविण्याचा तो हीन दर्जाचा प्रकार होता. मुक्तीनंतर येणारी विरक्ति हीच चिरकाल टिकत असते या गोष्टीची जाणीव त्या ब्राह्मणापैकीं एकालाहि नव्हती. आणि रूढीच्या वा शास्त्राच्या शृंखला तोडण्याचें सामर्थ्य त्यांच्यापैकीं एकाच्याहि वाहूत नव्हते. त्यांच्यासमोर वादविवाद करण्यात यापुढे काहीं अर्थ नव्हता. 'भट्टीं' केलेला वाद अशा तऱ्हेनें वाया गेला आणि ज्ञानेश्वराना एका निराळ्याच मार्गाचा अवलंब करावा लागला

केवळ वादविवादानें काम भागणार नाहीं ही गोष्ट ज्ञानेश्वर महाराजाच्या तात्काळ ध्यानात आली. जेव्हा बुध्दीचे मार्ग लगडे पडतात तेव्हा त्या मानवी बुध्दीला अतर्क्य असे कांहीं चमत्कार करून दाखवावे लागतात हें त्याना सहज समजलें. कांहींतरी दिव्य करून दाखविल्याशिवाय या जगातील जनता जागृत होत नाहीं कीं काय कुणास ठाऊक ! सुमोर दहा हजार वर्षांपूर्वी रामायण कालीं लंकेच्या परिसरात एक अग्निकुंड धडाडलें नि त्यांतून सीतामाईची निर्मल मूर्ति प्रत्यक्ष अग्निदेवाच्या करकमलावर बसून बाहेर पडली आणि त्याच क्षणीं सीतामाईची थोरवी प्रस्थापित झाली. पुढें महा-भारत कालीं श्रीकृष्ण भारतीय युद्धापूर्वी अखेरच्या शिष्टाईला गेले. त्या ठिकाणीं वादविवाद शास्त्र लगडें पडू लागलें. तेव्हा अखेरीस श्रीकृष्णाना विश्वरूप दर्शनाचा चमत्कार करावा लागला. तेव्हांच त्या ' गवळ्याच्या पोराला ' प्रतिष्ठा प्राप्त झाली. जेव्हां बुध्दीचा मार्ग खुंटला, वादविवाद शास्त्राचा पराभव झाला तेव्हा या ' सन्या-स्याच्या पोराला 'हि असेच चमत्कार करावे लागले. ज्ञानेश्वर या प्रसगानें पुढें झाले आणि त्यानीं रेड्याच्या मुखांतून अक्षरशः वेद वदविले आणि एका श्राद्ध प्रसगीं पितराना स्वर्गातून खाली आणून प्रत्यक्ष यजमानाच्या पक्तीला बसविलें. मग काय, तो अग्निमीळे स्वर-युक्त बोललेला बघून सारे ब्राह्मण चकित झाले. एक प्रकारच्या अनामिक हर्षानें त्याचे कान नि डोळे बधीर होऊन गेले. त्याच्या साऱ्या वृत्ति हेलावल्या. एका क्षणांत हजारो ब्राह्मण ज्ञानेश्वराच्या भोंवती गोळा झाले. त्यानीं दर्शविलेल्या चमत्कारामुळें त्याच्यावर नमस्काराची बरसात झाली. आणि ज्ञानेश्वराच्या जयजयकारानें सारे गोदा तीर दणकून गेलें.

आणि अशा तऱ्हेनें शके १२०९ च्या माघ मासीं त्यांना हवें

असलेलें ' शुद्धिपत्र ' प्राप्त झाले परतु तें जेव्हा नि ज्या मार्गानें त्याना नको होतें तेव्हां ! हे चमत्कार दर्शविण्यापूर्वी त्या वेळेच्या समाजानें या चारी भावडाची किंमत ओळखली नव्हती. चमत्कारान्तर घातलेल्या नमस्काराची त्याना काय आवश्यकता होती ? प्रत्यक्ष ब्राह्मण्याची मुज लावण्याचा त्याचा अधिकार ! परतु स्वत.चीच मुज त्याना नाकारण्यात आली. 'समाजानें त्याच्या-वर हा धडधडीत अन्याय केला होता. वस्तुत स्वर्लोकाच्या परिस-रात असलेल्या नीलाकाशात, कल्पनेच्या पखावर आरूढ होऊन स्वैरतेनें सचार करणारा हा ज्ञानराज गरुड, यदृच्छेनें एका समाजरूपी प्रचड वृक्षावर काही काळ स्थिरावला. परतु त्या समाजानें त्या गरुड पक्ष्याच्या सानिध्याचा अवमान करून बहिष्काराचा वणवा स्वत च भोंवती पेटविला. पण उच्च भरारी मारून त्या वणव्यातून तो गरुड पक्षी निसटला आणि त्या बहिष्कार-वणव्यांत तो समाज-वृक्षच जळून खाक झाला. त्या वणव्याच्या ज्वाला आकाशात परिभ्रमण करणाऱ्या त्या गरुड पक्ष्यापर्यंत जाऊन कधीं पोहोचल्याच नाहींत. उलट त्यानें केलेल्या चमत्काररूपी जलसिंचनानें तो वणवा विझला आणि समाजाची भ्रांति पार नष्ट होऊन गेली. सूर्योदय होताच धरित्रीवरील अधकार नाहीसा होऊन जिकडेतिकडे प्रकाशाची दिवाळी होते त्याप्रमाणें ज्ञानसूर्याचा उदय होताच समाजावरील अज्ञान-अधकाराचा पार लोप होऊन गेला.

ज्ञानेश्वराच्या आयुष्यातील उन्हाळा सपून त्या ठिकाणी आता वर्षाऋतूस प्रारभ झाला होता विठ्ठलपतावरील सामाजिक बहिष्कार, त्यानतर आपलीं पोरकी पोरें परमेश्वरावर सोपवून आपल्या पत्नीसह त्यानीं केलेलें देहविसर्जन, त्या दोघाच्या दारुण निधनानतर उघडे-पडलेले ते चार जीव, कोरान्नालाहि महाग झालेली त्याचीं जीवितें.

ग्रं. क्र. ७/८५२
१९

आणि अखेरीस आळंदी नि पैठण येथील ब्राह्मणांनीं त्याच्या मुंजीला दिलेला नकार व केलेली अवहेलना या गोष्टी आता इतिहासजमा झालेल्या होत्या. परिस्थितीनें जणूं त्याना आव्हान दिलें होतें, आणि त्या परिस्थितीवर त्यानी त्याहि वयात मात केली होती. सूर्योदयापूर्वीं दशदिशा जशा प्रकाशमान होतात त्याप्रमाणें अनुरूप वयोमर्यादेपूर्वींच त्याचे ठिकाणीं ज्ञानाचा सूर्य उगवला होता आणि त्याच्या भोंवतालची परिस्थिति त्यानें उजाळली होती. त्याच्या भाग्योदयाचा काल त्याच्या नजिक आला होता आणि अखिल जनसागराची सारी संपत्ति त्याच्या पायाशी आपोआप चालत आली होती; आणि मौज ही कीं ज्या समाजानें पूर्वीं त्याचा दुस्वास केला होता तोच समाज त्याच्याशी एकरूप होऊन गेला. त्याच्या मनो-रूपी आकाशातील सारीं अभ्रें नाहीशीं झालीं होतीं आणि त्या आकाशानें निळें शुद्ध स्वरूप धारण केलें होतें. लोखंडाला परीसाचा स्पर्श झाल्याबरोबर लोखंडाचें सोनें बनावें त्याप्रमाणें ज्ञानेश्वराच्या ज्ञान-परीसानें त्या लोकाच्या मनाचें जणू सोनें बनविलें होते. पाण्यात पाणी मिळावें त्याप्रमाणें त्या सर्वांची मनें आता एकरूप होऊन गेलीं होती. त्यांच्यामधील सारा अहंभाव नष्ट झाला होता आणि ज्या ठिकाणी तो नष्ट होतो त्या ठिकाणी भेदभावाला जागाच उरत नाहीं, या न्यायानें सारी जनता ज्ञानेश्वरमय झाली होती. ज्ञानेश्वराच्या सुखाला आता पारावार उरला नव्हता. “सुखानें सुखामध्येंच सुख भोगावें” अशी त्याची स्थिती झाली. त्या वेळेच्या समाजामध्यें ठायीं ठायीं त्यांच्यासाठीं सत्कार-समारंभ होऊं लागले. परंतु केवळ सत्कार-समारंभांनीं कार्याची परिसमाप्ति होत नाहीं ही गोष्ट ज्ञानेश्वरानीं पुरेपूर ओळखली आणि आपल्या पुढील आयुष्याचा कर्तव्य मार्ग ते चालू लागले.

पैठणच्या मुक्कामात आपल्या पदरी फार मोठी प्रतिष्ठा पाडून ज्ञानेश्वर आपल्या भावडांसह आपेगाव येथें येऊन दाखल झाले; आणि आपल्या चरण धूलीनें त्या सर्वांनी आपली मातृभूमि धन्य केली. एकेकाळीं याच त्यांच्या मातृभूमीत एका चतकोर तुकड्याला हीं भावडे महाग झालीं होतीं. परतु आज त्याच गावातील लोकानीं या चारी भावडावर आपली सारी धनदौलत उधळली आणि ते लोक पूर्वीच्या पापातून अशत. का होईना पण पावन झाले. त्या-नतर आळंदीलाहि तशाच प्रकारें पावन करून ही सारीं मडळी नेवा-स्याला येऊन दाखल झालीं. त्याठिकाणीं ज्ञानेश्वरानीं एक अलौकिक चमत्कार करून दाखविला. मात्र तो चमत्कार त्याच्या पूर्वीच्या चमत्कारापेक्षाहि महान् असा होता; आणि तो अेकच चमत्कार करून जरी ज्ञानेश्वराची जीवन-ज्योत लुप्त झाली असती तरी त्याची स्वर्गीय कीर्ति अमर होऊनच नादली असती. तो चमत्कार म्हणजे त्याच्या ज्ञानेश्वरी या महान् ग्रंथाची रचना हा होय।

ज्ञानेश्वराना नुकतेच पधरावें वर्ष लागलें होतें. आतांपर्यंत त्यानीं अनेक लौकिक चमत्कार करून दाखविले होते. हा अलौकिक ग्रथ सागण्यापूर्वी प्रत्यक्ष त्या ग्रथाचा लेखक सच्चिदानदबाबा याला तो मृतावस्थेंत असताना त्यानी सचेतन करून दाखविलें होतें. जगाला आता एक आध्यात्मिक चमत्कार करून त्याना दाखवावयाचा होता. त्या चमत्काराचें जीवन त्याच्या पार्थिव देहाबरोबर सपणार नव्हतें. तर जोपर्यंत या अवनी तलावर मानव जात जिवत आहे तोपर्यंत त्याचा तो चमत्कार अस्तित्वात राहणार होता.

शके १२१२ च्या सधीस आपले सद्गुरु श्री निवृत्तिनाथ याना सन्मुख बसवून या ग्रथातील वेदवाणी सागण्यास ज्ञानेश्वरानीं प्रारभ केला. प्रतिदिनीं असख्य लोक ही वेदवाणी ऐकण्याकरिता जमू

५९९

लागले. दिवसेंदिवस सभेला अधिकाधिक रंग भरूं लागला; आणि ज्ञानेश्वराच्या मुखातून ज्ञानामृताचा झरा अखंडपणानें पाझरूं लागला. असुराच्या तावडीतून प्रत्यक्ष मोहनीराजानें विमुक्त केलेल्या अमृताचें सरक्षण करण्याकरिता जणू तें अमृत ज्ञानेश्वराच्या अत:करणात लपविलें होतें. परतु ज्ञानानें त्या अमृताचा पत्ता शोधून काढला आणि अक्षराचें रूप धारण करून तें ज्ञान त्या अमृतात बुडालें नि दिव्यरूप घेऊन तें तेथून बाहेर पडले. ते अमृतकण टिपण्यास सारी जनता सिध्द होतीच. एखाद्या कमलदलावर बसलेल्या चकोरानें चद्रकिरणाचे शोषण करावें किंवा एखाद्या विकसित पुष्पावर बसून त्यामधील विसततूचा फराळ ज्याप्रमाणें एखाद्या राजहंसानें करावा त्याप्रमाणे ज्ञानेश्वराच्या मुखातून बाहेर स्रवणारे ते अमृतकण आधाशीपणानें टिपले जात होते.

आणि जेव्हा तो अलौकिक ग्रथ सागून पुरा झाला तेव्हा सर्वांची खात्री पटली कीं; सूर्याचें तेज, चद्रकिरणांची शीतलता, सागराचें गाम्भीर्य, अमृताचें अमरत्व, नक्षत्राचें पावित्र्य आणि गगनाची शुचिता नि विमलत्व या साऱ्या गोष्टी या ग्रथांत एकत्र गोळा झालेल्या आहेत. जणू जगातील साऱ्या अलौकिक गोष्टींचें अलौकिकत्व एकत्र करूनच कीं काय ज्ञानेश्वरानीं हा आपला अलौकिक ग्रथ निर्माण केलेला होता. किंबहुना हा ग्रथ सागण्याच्या भरात त्यानी जी दिव्य वाणी उच्चारली ती त्यानीं अक्षरश खरी करून दाखविली होती. त्याचा बोल प्राकृत होता ही गोष्ट खरी. परंतु त्या त्यांच्या बोलानें पैजेवर अमृतालाहि जिंकलें. ज्ञानेश्वरानी ज्ञानेश्वरीची अक्षरयोजनाच अशी केली कीं त्यापुढें नादब्रह्म फिकें पडले आणि सुगधादिकाचें सामर्थ्यहि हतप्रभ झालें. स्वत: ज्ञानेश्वरांनीं म्हटल्याप्रमाणें त्याना गुरुकृपेचें अपार सहाय्य होतें. त्या गुरुकृपेनें

ते बोलले आणि निराकार ब्रह्माचें प्रत्यक्ष रूप त्यांनीं बोलून दाखविलें; आणि तें परब्रह्म इंद्रियाच्या पलीकडे असताना त्यांनीं इंद्रियाना त्याचा साक्षात् भोग घडविला. लोकाना सदैव प्रिय झालेला जो शृंगार त्याच्या मस्तकावर जणू वामनरूपानेंच पाय ठेवून ज्ञानेश्वरानीं शांतरस निर्माण केला; आणि अशा प्रकारची मराठी देशभाषा ते बोलले की जिनें साहित्य शिकविलें आणि गोडींत अमृताला मागें सारलें. त्याच्या त्या शांतरसानें पौर्णिमेच्या प्रत्यक्ष चंद्राशीं बरोबरी केली आणि सारे रसरंग खुलवून सोडले. त्यायोगानें शुद्ध चित्त पुरुषाची त्या श्रवणाबरोबर समाधी लागली असेल यात काहींच नवल नाहीं. पण प्रत्यक्ष पिशाच्चांचीहि मनें सात्विक रसानें पाझरून गेली. त्याच्या शब्दार्थानें साऱ्या विश्वाचें दिक्कोन भरून गेले आणि त्यावर आनंदाचें आवरण पडलें. श्रवणाचे नि चित्ताचें ऐक्य झालें. ब्रह्मविद्येची जणू खाण उघडली आणि परम सुखात सारी जनता आकंठ पोहू लागली. एका क्षणात साऱ्याचीं अंतःकरणें भक्तीनें ओथबली. आपल्या कुळाचा नि कुलिनत्वाचा वृथा अभिमान त्याच्यामधून पार नाहींसा झाला. त्याची विद्वत्तेची हाव संपली आणि त्याचा रूपाचा अभिमान नि संपत्तीचा डौल गळून पडला.

ज्ञानेश्वराचें विवेचन ऐकत असतांना जनतेचीं सर्वेंद्रियें अक्षरशः कानात अवतीर्ण झाली होतीं आणि जेव्हा या महान् ग्रंथाचा शेवटचा शब्द कानीं पडला तेव्हा नादब्रह्माचा हात धरून अमृताच्या वर्षावामध्यें आपण नर्तनच करीत आहोत की काय असा स्पष्ट भास त्या सर्वांना झाला. मग कुठला आला आहे अहंकार नि कुठला आला आहे द्वेष ? त्या सर्वांच्या वृत्ति एकरूप होऊन गेल्या नि त्या नादब्रह्मात विलीन झाल्या.

या ग्रंथाची परिसमाप्ति झाल्यानंतर प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांचीहि अवस्था अगदीं बेहोश होऊन गेली. समोर बसलेल्या आपल्या सद्गुरूला ते म्हणाले कीं, " माझ्या गुरुमाउलीनें मला आपणा संतचरणाची जोड करून दिली आहे त्या योगें माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण झालेल्या आहेत. अहो, सर्व पृथ्वीगोल एक वेळ सुवर्णाचा करता येईल, चिंतामणीचे पर्वत निर्माण करता येतील, सातहि सागर अमृतानें सहज भरता येतील, किंवा जितक्या चांदण्या आहेत त्यांचे चंद्र बनविणेंही कठीण नाही. कल्पतरूंची उद्यानें लावणें कठीण नाही. या सर्व गोष्टी संभवनीय आहेत. पण गीतार्थाचें रहस्य मात्र समजणार नाहीं. असें असूनही माझ्यासारख्या एका मुक्या मनुष्यानें सर्व लोकांना सहज ग्रहण करता येईल असा ग्रंथ मराठी भाषेंत लिहावा! केवळ आपल्या कृपेनें हा ग्रंथ सिद्धीस जाऊन हा सुखसोहळा मी बघत आहे. त्यानें माझ्या जन्माचें साफल्य झालें आहे. "

आणि केवळ ज्ञानेश्वरांच्याच नव्हे तर अखिल मानव जातीच्या जन्माचें सार्थक त्यांच्या या ग्रंथानें केलें आहे. सरस्वतीच्या मुकुटांतील दैदिप्यमान रत्नाप्रमाणें आपल्या अनुपम दिव्य तेजानें हा महान् ग्रंथ सदैव तळपत राहील यांत कसलाहि संदेह नाहीं. आपलें विभूतीमत्व कोठे कोठें आहे यासंबंधी भगवान श्रीकृष्णांनीं अर्जुनाला कांहीं खुणा स्पष्टपणानें सांगितलेल्या आहेत. जें जें मंगलमय आहे त्या त्या ठिकाणीं भगवंताचा निवास आहे. या न्यायानें भगवंताचा तो निवास ज्ञानेश्वरांच्या या महान् ग्रंथांत असलाच पाहिजे!

या थोर ग्रंथाचें अत्याक्षर ज्ञानेश्वरांच्या मुखावाटे बाहेर पडलें आणि ज्या क्षणीं तें बाहेर पडलें त्या क्षणापासून ते एका निरा-

कयाच गोष्टीचा विचार करू लागले. त्याची दृष्टी श्री क्षेत्र पंढरपुराकडे वळली. परम विठ्ठलभक्त नामदेव यांची त्याना उत्कटतेनें आठवण झाली. त्यांच्या सगतीत तीर्थयात्रा करण्याचा बेत त्यांनीं मनातून निश्चित केला आणि आपल्या भावडाना घेऊन ते पढरीला येऊन दाखल झाले.

त्या ठिकाणीं आल्यानतर प्रत्यक्ष विठ्ठलानें सगुण रूप धारण करून नामदेवाला निश्चितपणानें ज्ञानेश्वराच्या हवालीं केलें. मग तेथून मोठी तीर्थयात्रा निघाली. ज्ञानाचा नि भक्तीचा जणू सगम होऊन तो तीर्थयात्रेकडे निघाला होता. सध्या आषाढी नि कार्तिकी एकादशीला ज्याप्रमाणें असख्य भजनी दिंड्या हातात टाळ नि मृदुग घेऊन पायी प्रवास करीत क्षेत्रस्थानाकडे निघतात त्याप्रमाणें ज्ञानेश्वराबरोबर त्यावेळीं यात्रेसाठीं सहस्रो लोक निघाले. त्यावेळेचा देखावा अत्यत अपूर्व असा असला पाहिजे. आजच्या वारकऱ्यांचें प्रतीक म्हणून त्यावेळीं ज्ञानेश्वराबरोबर निघालेले यात्रेकरू कोणत्या योग्यतेचे होते ही गोष्ट त्याची केवळ नावें जरी उच्चारलीं तरी सहज समजून येईल. त्यावेळी मगळवेढ्याहून चोखामेळा आले होते, आरणभेंडीहून सावता माळी नि तेरेगावाहून गोरोबा कुभार हे आले होते. याशिवाय सद्‌गुरू निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई, विसोबा खेचर, नरहरी सोनार, जनमित्र, बका आदी संत या अपूर्व मेळाव्यात दाखल झाले होते. साऱ्या मोक्षपुऱ्या नि पवित्र तीर्थ क्षेत्रें त्यानीं आपल्या चरण धुळीनें पावन केलीं. अशा रीतीनें ज्ञानेश्वराच्या छत्राखालीं वेगवेगळ्या जातीचे नि पंथाचे, निरनिराळ्या वयाचे व विद्येचे असख्य सत जमा झाले; आणि प्रत्येक तीर्थ क्षेत्रातील दिक्कोन " पुडलीक वर दे हारि विठ्ठल " या महाराष्ट्रीय घोषणेनें त्यानीं दणाणून सोडला. त्या प्रत्येक ठिकाणीं अग्रपूजेचा मान ज्ञानेश्वराचा

होता. एखाद्या शूर सम्राटानें जग जिंकीत एकसारखें पुढे पुढें जावें त्याप्रमाणें लाखो लोकांची अंत:करणें आपल्या अगम्य आध्यात्मिक सामर्थ्यानें जिंकीत ज्ञानेश्वर एखाद्या दैवी सम्राटाप्रमाणें एक सारखे पुढें पुढें चालले होते.

तीर्थयात्रा संपवून ती सारी मंडळी परत पंढरपूरला आली. नामदेवांना पाहून विठ्ठलाला परमावधीचा हर्ष झाला. त्याचा जिवलग सखा त्याला भेटला होता. मग पंढरपूरला या यात्रेचें फार मोठें मानवर्दे झालें. त्यानन्तर त्या संतांची पांगापांग झाली आणि ज्ञानेश्वर आपल्या भावंडांसह पुन्हा आळंदीला येऊन दाखल झाले.

त्यांच्या आयुष्यातील दुसरा ऋतु जो पर्जन्यकाल तोहि आता सरू लागला होता. त्या ऋतूचें कार्य संपलें होतें. पण वर्षाऋतूत सर्वत्र फुललेली ज्ञानाची हिरवळ मात्र अजूनहि ताजीतवानी होती. तिच्यावरचें तेज मुळींच कमी झालें नव्हते तिचा सुगंध कायम होता इतकेंच नव्हे तर प्रतिक्षणी तो वृद्धिंगत होत चालला होता. परंतु अलीकडे त्यांच्या अंत:करणाची वृत्ति मात्र विरक्तीकडे झुकू लागली होती. त्या दृष्टीनें त्यांच्या आयुष्यातील हिवाळ्याला प्रारंभ झाला होता. विशाल कर्तृत्वानंतर सहजतेनें प्राप्त होणारी प्रतिष्ठा नि जनतेचे मिळणारे नमस्कार त्यांना मुळीच नको होते. एका असामान्य कर्तृत्वासाठीं त्यांचा अवतार होता आणि त्यांचें तें महान् अवतार कार्य समाप्त झाले होते. ते आता जगाच्या कोणत्याहि ऋणात राहिलें नव्हतें. त्यांचें वय लहान होतें ही गोष्ट खरी. ज्ञानेश्वरांना नुकतेंच बाविसावें वर्ष लागलें होतें. परंतु वृक्षाच्या वयापेक्षा वसंताच्या कृपेवरच त्या वृक्षाची फलनिष्पत्ती अवलंबून असतें त्याप्रमाणें वैराग्य वसंतानें त्यांच्यावर त्या अल्पवयांतहि खैरात केली होती. त्यांचें कर्तृत्व जरी संपुष्टात आलें नव्हतें तरी त्यांचें कार्य

मात्र संपलें होतें. केवळ त्या दृष्टीनेंच त्यांच्या आयुष्यातील शिशिर ऋतूला प्रारंभ झाला होता.

वास्तविक ज्या ठिकाणीं दिशाचा अंत होतो, सागराची खोली संपुष्टात येते, काळ ज्या ठिकाणीं क्षणभर का होईना पण विसावतो, केवळ दृश्य क्षितिजच नव्हे तर प्रत्यक्ष नभांगणाची मर्यादा जिथें संपते, त्या साऱ्या ठिकाणींहि ज्ञानेश्वराचें कर्तृत्व कधीं स्थिरावलें नव्हतें. या साऱ्या परिसीमा उल्लंघून तें केव्हाच पलीकडे गेलें होतें. पण कधींतरी नि कुठेतरी प्रत्येक गोष्टीला मर्यादा ही पडतेच. त्याप्रमाणें ती मर्यादा आता पडली होती.

आणि मौज ही कीं ती मर्यादा ज्ञानेश्वरांनीं बरोबर ओळखली. मानवी कर्तृत्वाची परिसीमा ओळखून त्यानंतर लगेच देहार्पण करणें हेंच मोठेपणाचें खरें खरें लक्षण आहे. तें ओळखून ज्ञानेश्वरांनीं आपल्या धवल कीर्तिमंदिरावर सोनेरी कळस चढविला.

आपल्या मनातील बेत एकदा निश्चित झाल्यानंतर दि. २५ आक्टोबर १२९६ या दिवशीं समाधि घेण्याचा निर्णय त्यांनीं घोषित केला. ज्ञानेश्वर हे महान् योगी असल्यामुळें प्रत्यक्ष समाधीं त्यांच्या मनाचा पत्ता विचारीत आली. त्या क्षणीं त्याचें मन मुळींच विचलित झालें नाहीं. जिवंतपणीं जिथें उभ्या शरीराची ज्यांना पर्वा नव्हती त्या ठिकाणीं पतन पावणाऱ्या शरीराचें त्यांना संकट काय म्हणून वाटणार ?

परंतु इतर सारीं मंडळीं मात्र दुःखसागरांत अक्षरशः बुडून गेलीं. ज्ञानेश्वराचा विरह त्यांना सहन होण्याजोगा नव्हता. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांनीं सांगीतलेलें जड वस्तूचें तत्वज्ञान त्यांना काय माहीत नव्हतें ? घंटेचा नाद ज्याप्रमाणें घंटेंतच विलीन होतो त्याप्रमाणें मानवी जडदेह परमेश्वराच्या निजरूपातच नाहींसा होत

असतो हें तत्वज्ञान त्याच्या परिचयाचें नव्हतें का ? अक्षरें पुसलीं तरी अर्थ पुसला जात नाहीं ही गोष्ट त्याना ठाऊक कां नव्हती ? परंतु मृत्यूच्या उंबरठ्यावर हें सारें तत्वज्ञान लंगडें पडतें हीच गोष्ट खरी !

पंढरपूरला जाऊन ज्ञानेश्वरानीं पांडुरंगाला आपला समाधीचा मनोदय कळविला. तेव्हा पांडुरंगानें त्याना कुरवाळलें नि म्हटलें, " बा ज्ञानचक्रवर्ति, तुझी इच्छा सफल होईल. कार्तिक शुद्ध एकादशीस पंढरपूरला ज्याप्रमाणें महोत्सव होतो त्याप्रमाणें कार्तिक वद्य एकादशीस आळंदीला तुझ्या प्रीत्यर्थ महोत्सव होत जाईल. "

प्रत्यक्ष पंढरीनाथाचें हें वरदान ऐकून सर्व संतानी टाळ्याचा एकच गजर केला. त्यावेळीं स्वर्गातून त्या पवित्र मेळाव्यावर खचित पुष्पवृष्टी झाली असेल.

मग ती सारीं संत मंडळीं पांडुरंगासह आळंदीला येऊन दाखल झालीं. आळंदीला आल्यानंतर नामदेवाच्या डोळ्याचें पाणी तर मुळींच खळेना. इतरांचीहि तीच अवस्था झाली.

आणि जेव्हा प्रत्यक्ष समाधीचा दिवस उगवला तेव्हा दु:खाला पारावार उरला नाहीं. ज्ञानेश्वराच्या होणाऱ्या विरहामुळें साक्षात् गहिंवर गहिंवरून गेला.

आळंदीला आल्यानंतर साऱ्यानीं इंद्रायणीचें स्नान केलें. आळंदीच्या पंचक्रोशींत एकच धादल उडून गेली. घाटावर पाय ठेवायला जागा उरली नाहीं. इंद्रायणीच्या तीरावर असलेल्या सिद्धेश्वराच्या डाव्या बाजूस अजान वृक्षाच्या छायेखालीं ज्ञानेश्वरानीं समाधीस्थान सिद्ध केलें. ज्ञानेश्वर समाधी घेण्यासाठीं तयार झाले. त्यांची मुद्रा शांत दिसत होती. नामदेवाच्या मुलानीं समाधीची जागा झाडून स्वच्छ केली. एकादशीला हरिजागर उरकण्यांत आला. द्वादशीला

पारणें होतें. त्या दिवशीं दुपारीं दोन प्रहर होईपर्यंत एकसारख्या जेवणावळी चालल्या होत्या. पिंपळाच्या पारावर ज्ञानेश्वरानी पारणें सोडलें. या पक्तींत प्रत्यक्ष पांडुरंग सोवळें नेसून ज्ञानेश्वरांना वाढीत होता. रुक्माईनें सुसरें वाढप केलें एवढेंच नाहीं तर उष्टी खरकटींहि काढलीं. ज्ञानेश्वराना निमंत्रण करून नामदेवानीं पानावर आणून बसविलें. त्यावेळी एकीकडे निवृत्तिनाथ मुक्ताबाईचें सांत्वन करीत होते. सोपानदेवालाहि त्यानीं आपल्या मध्यमार्गी घेतला होता आणि त्याचेंहि सांत्वन करण्याचें काम निवृत्तिनाथ करीत होते. परंतु तें करीत असताना आपला गहिंवर त्याना आवरत नव्हता. कोणी कोणाचें सांत्वन करण्याचा प्रश्नच त्याठिकाणीं उरलेला नव्हता.

भोजन आटोपल्यानंतर तिसऱ्या प्रहरीं कीर्तनाला प्रारंभ झाला. ज्ञानेश्वर ज्या ठिकाणीं उभे होते त्या ठिकाणीं येऊन प्रत्येकानें त्यांची अखेरची भेट घेतली. मग ज्ञानेश्वरानी समाधी-स्थानाची पूजा केली. त्यावेळीं त्याच्या मुखावर अप्रतिम तेज विलसत होतें; आणि एकप्रकारचा अपार आनंद बाहेर ओसंडत होता

शेवटी शके १२१८ कार्तिक वद्य त्रयोदशीचा दिवस उजाडला. त्या दिवशीं गुरुवार होता. सूर्य ऐन मध्यावर आला होता आणि या हृदयद्रावक प्रसंगाला साक्षीभूत राहिला होता. तो सारा प्रसंग बघतांना त्याच्या नेत्रातून उष्ण अश्रुधारा बाहेर ओसंडत होत्या. ज्ञानेश्वराच्या विरह कल्पनेनें तो प्रतिक्षणी निस्तेज होऊं लागला. त्यावेळीं ज्ञानेश्वराना बसण्यासाठीं तुळशीबेलाचें आसन तयार करण्यात येत होतें.

मग आपल्या भावंडाचे हात ज्ञानेश्वरानीं आपल्या हातात घेतले आणि ते पांडुरंगाचे हातीं दिले. त्यावेळी प्रत्यक्ष पांडुरंगाचा हात अश्रु पुसण्यासाठीं डोळ्याकडे गेला. मग इतराची काय कथा ? इतर

सर्व लोकाना नमस्कार करून निवृत्तिनाथाना शेवटचा नमस्कार करण्यासाठीं ज्ञानेश्वर त्याच्याजवळ आले आणि म्हणाले, " आतांपर्यंत आपण माझें पालनपोषण केलेंत. माझे सारे हट्ट पुरविलेत. केवळ आपल्याच कृपेनें मी स्वरूपाकार झालो आहे; आणि ही मायानदी ओलाडली आहे. "

यावर निवृत्तिनाथ म्हणाले, " तू कधीं माझी अमर्यादा केली नाहींस. तू खऱ्या अर्थानें गुरुशिष्याच्या नात्याची कड लावलीस. गीतार्थाचा सोहळा करून आमच्या नेत्राची पारणीं फेडलीस. आतां मात्र तुझ्यासारखा सखा पुन्हां कधीं भेटणार नाहीं. "

मग सोपानाचें सात्वन नि साभाळ करण्याबद्दल ज्ञानेश्वरानीं पाडुरगाला पुन. पुन्हा सागितलें.

अखेरचें ' नमन ' केल्यानतर ज्ञानेश्वराच्या नावाचा प्रचड जयजयकार करण्यात आला; आणि ते समाधीस्थानाकडे जाण्यासाठीं वळलें. साऱ्या लोकानीं त्याना अखेरचें वदन केलें. पाडुरंगानें त्याच्या गळ्यांत पुष्पहार घालून त्याच्या कपाळाला केशरी गध लावलें. मग ज्ञानेश्वरानीं समाधीस्थानाला प्रदक्षिणा घातल्या आणि ते आत शिरू लागले.

यावेळीं मात्र निवृत्तिनाथांच्या मनावरचा ताबा पार उडाला. एखादी बाधलेली गवताची पेंढी एकदम सुटावी आणि सारें गवत रानोमाळ होऊन जावें त्याप्रमाणें त्याच्या मनावरचा बध सुटला आणि त्याच्या नेत्रातून अश्रुधारा उधळल्या.

परतु ज्ञानेश्वरानी एकदाहि मागें वळून बघितलें नाहीं. या अखेरच्याहि क्षणीं त्याच्या वृत्तीची मुळींच चलबिचल झाली नाहीं. समुद्राला मिळण्यासाठीं भरवेगानें चाललेलें नदीचें पाणी मागें काय चाललें आहे हें बघण्यासाठीं कधींच थाबत नसतें. त्याप्रमाणें या

ज्ञानरूपी गंगेनें अज्ञाताच्या महासागराला जाऊन मिळण्यापूर्वी एकदांहि मार्गे वळून बघितलें नाहीं. आत जाताना त्याचा एक हात पढरीनाथानें धरला होता आणि दुसरा हात निवृत्तिनाथांनीं धरलेला होता. त्या दोघानीं त्याना आसनावर नेऊन बसविलें. पद्मासन घालून ज्ञानेश्वर उत्तराभिमुखी बसले. हात जोडून ज्ञानेश्वरानीं आपले नेत्र मिटले. पुढ्यांत ज्ञानेश्वरी ठेवली होती आणि शेजारी नदादीप तेवत होता. ज्ञानेश्वरांनीं आपलें मन एकाग्र केलें आणि अंत.करणात कर्मयोगाचें सुख आठविलें.

हें सर्व झाल्यानतर पाडुरंग नि निवृत्तिनाथ बाहेर पडले त्यानीं समाधीवर शिळा लावली. ज्ञानाचा दिनकर लोपला.

एका क्षणात सारें सारें शात–अगदी शात होऊन गेलें. ज्ञानेश्वराचा पार्थिव देह दृष्टीआड झाला आणि त्याचवेळीं ज्ञानेश्वराची मंगलमय मूर्ति मानवतेच्या मुद्रेवर अनत कालची कोरली गेली नि त्यांच्या त्या महान् ग्रथाचा परिमल त्रैलोक्याच्या विशाल अवकाशात पसरला गेला.

---

# पतितांचा दीपस्तंभ—नामदेव : २

शंकराच्या पिंडीवर मानवी रक्ताचा अभिषेक झाला तेव्हां ती पाषाणाची मूर्ति जागृत झाली. समोर नामदेव उभे होते. त्याना उपरती झालेली स्पष्ट दिसत होती. त्याच्या डोक्याला झालेल्या जखमेंतून रक्ताची धार वहात होती. त्याच्या डोळयांतूनहि एकसारखे अश्रु ओघळत होते आणि रक्त नि अश्रु याचा एकसारखा अभिषेक शंकराच्या त्या पिंडीवर होत होता. शरीरातील रक्त अतोनात गेल्यामुळें कांहीं वेळानें नामदेवाना ग्लानी आली, त्यांची शुद्ध पार हारपली आणि देवाच्या द्वारीं ते तसेच पडून राहिले.

दोन प्रहरचा सुमार होता. त्या दिवशीं नामदेव आपल्या नित्यनियमाप्रमाणें आवढ्या नागनाथाचें दर्शन घेण्यासाठीं देवळात आले. नामदेवानी देवापुढें नैवेद्य ठेवला. जवळच एक अनाथ स्त्री आपल्या मुलाला कडेवर घेऊन उभी होती. देवापुढें ठेवलेल्या नैवेद्याकडे पाहून तिच्या कडेवरचा मुलगा त्या नैवेद्यासाठीं रडू लागला. तेव्हां त्या स्त्रीनें त्या मुलाला मारण्यास प्रारंभ केला. तें दृश्य पाहून नामदेवांचें अंतःकरण गहिंवरलें; नि नामदेव त्या स्त्रीवर रागावले. त्यावर ती स्त्री कांहींशा संतापानें उत्तरली, " तुमचें म्हणणें ठीक आहे. परंतु या पोरट्याला मी काय माझीं हाडें खायला घालूं ?

माझ्या साऱ्या संसाराचा उन्हाळा झालेला आहे. दरोडेखोराना पकडण्यासाठीं राजानें माझ्या पतीला पाठविलें आणि त्या धादलींत माझा पती ठार मारला गेला नि मी उघडी पडले. सांगा, काय खायला देऊं आता या पोराला ? माझीं हाडें ? ”

त्या स्त्रीची ती हकीगत ऐकून नामदेव मनातून चरकले. कारण त्या दरोडेखोरामध्यें ते स्वतःच सामील होते आणि पर्यायानें त्यानींच तिचा संसार उध्वस्त केला होता. किंबहुना असा एकच काय पण अनेक मानवी संसारावर त्यानीं याप्रमाणें निखारे ठेवले होते नि ते जाळून खाक केले होते. या गोष्टीची त्या क्षणीं त्याना तीव्र जाणीव झाली. त्याच्या मनाचा थरकांप उडाला. त्याचें अंतःकरण द्रवलें. त्याना उपरती झाली. एखाद्या लहान पोरासारखे ते ढसढसा रडूं लागले. हातून झालेल्या अक्षम्य अपकृत्यामुळें त्याच्या मनाची टोंचणी त्याना असह्य झाली आणि काही तरी करून आपल्या हातून झालेल्या या पापाचें परिमार्जन करावें असें त्याना वाटूं लागलें. लगेच त्यानीं सर्वसंगपरित्याग केला. आपल्याजवळ होतें नव्हतें तें सारें जवळच्या ब्राह्मणाना दान करून टाकलें. नंतर आपल्या हातात एक सुरी घेऊन ते शंकराजवळ गेले आणि आपल्या डोक्यावर त्यानीं त्या सुरीचा प्रहार केला. जणुं शंकराच्या साक्षीनें त्यानीं आपल्या नव्या आयुष्याचा नारळ फोडला नि आपलें जुनें पापी आयुष्य नष्ट करून टाकलें. डोक्यावर खोल जखम झाली नि सांबाच्या पिंडीवर मानवी रक्ताचा अभिषेक सुरू झाला. त्या योगानें ती पाषाणाची मूर्ति जागृत झाली आणि नामदेवांना तिनें दृष्टांत दिला.

घडलेला हा चमत्कार अतर्क्य खरा. पण तो घडला हेंहि खरें ! मानवी बुद्धीच्या क्षेत्रात ज्या गोष्टी बसत नाहींत त्या गोष्टींनाच

'चमत्कार' हें नामाभिधान प्राप्त होत असतें. परंतु त्याचबरोबर जें मानवी बुद्धीच्या कक्षेत येत नाहीं तें सारें खोटें मानण्याची बुद्धि-निष्ठाची सहाजिकच प्रवृत्ति होते. प्रत्येक शास्त्राला स्वतःचीं अशीं काहींतरी गृहित कृत्यें हीं अपरिहार्यतेनें मानावींच लागतात. त्याच-प्रमाणें अध्यात्मशास्त्राच्या अंगभूत असलेल्या चमत्कार शास्त्राला-देखील गृहित कृत्यें असणें चुकीचें नाहीं. ज्ञानेश्वरानीं रेड्याच्या तोंडातून वेद वदविले ही गोष्ट बुद्धिवादी लोक खरी मानणार नाहींत. परंतु त्याच ज्ञानेश्वरानी वयाच्या केवळ पंधराव्या वर्षी लिहिलेली ज्ञानेश्वरी तर ते खरी मानतील ना ? बुद्धीच्या क्षेत्रातहि तो चमत्कार नव्हता का ? मग तो चमत्कार केवळ नजरेसमोर आहे म्हणून त्याला मानणें युक्त असेल तर केवळ इतर चमत्काराची अनुपस्थिति त्याना मानण्याच्या आड येता कामा नये. एखाद्या चमत्काराचा कार्यकारणभाव कळला नाहीं म्हणून तो चमत्कार घडलाच नाही असें मानणें चुकीचें होईल. चंद्र-सूर्यांचे उदयास्त, चंद्रदर्शनानें होणारी सागरभरती, तसेंच चंद्रदर्शनानें पाझरणारा चंद्रकांत मणि नि तत्सम कित्येक गोष्टींच्या मागचा कार्यकारणभाव सापडेल का ? केवळ अशा गोष्टी किंवा चमत्कार आतापर्यंत घडत आले म्हणूनच ते यापुढेंहि घडत राहतील असें अनुमान श्रद्धेच्या बळावर आपण काढतोच ना ? मग रेड्याच्या तोंडातून वेद वदले किंवा पाषाणाची मूर्ति मानवी रक्ताचा स्पर्श होताच जागृत झाली नि तिनें नामदेवाना दृष्टांत दिला या गोष्टी खऱ्या मानायला काय हरकत आहे ? या जगातील सर्वच कोडीं बुद्धीच्या बळावर सुटत नसतात, तर त्याना श्रद्धेचें अधिष्ठान हें असावेंच लागतें.

नामदेवाची परमेश्वरावरील श्रद्धा जेव्हा अशीच उत्कट झाली तेव्हाच परमेश्वरानें त्याना दृष्टांत दिला. त्या दृष्टांतात शंकरानें त्याना

पंढरपूरला जाण्याचा आदेश दिला. त्या ठिकाणीं गेल्यानतर त्यांचें पापक्षालन होऊन त्यांची कीर्ति अजरामर होईल असेंहि शंकरानें त्याना सांगितलें.

शंकराचा आदेश मिळताच नामदेव लगेच पंढरीला जाण्यासाठीं निघाले. चंद्रभागेच्या कांठावर आल्यानतर त्यानीं समोर नजर टाकली. चंद्रभागेला पूर येऊन ती दुथडी वहात होती. नामदेवांच्या अंत करणातहि पश्चात्तापाचा पूर असाच काठोकांठ भरून वहात होता. तो महापूर ओलांडून त्याना त्या पतितपावन परमेश्वराकडे जाऊन पावन व्हावयाचें होतें त्यानीं लाबवर नजर टाकली डोक्याची जखम ताजी असल्यामुळें तिला ठणका लागला होता. परंतु त्याहि-पेक्षा त्याच्या अंत करणाचा ठणका मोठा होता. डोक्याच्या जखमे-भोंवतीं माशा घोंघावत होत्या आणि अंत:करणाच्या जखमेंभोंवतीं संशय घोंघावत होते परमेश्वर आपल्याला अशा परिस्थितींत जवळ करील का ?

नामदेवांचा हा संशय खरा ठरला. परमेश्वर त्याना जवळ कर-ण्यास खरोखरच तयार होईना. नामदेवाचें अंत र्बाह्य ओंगळ स्वरूप बघून पंढरीनाथानें आपल्या भक्तास दृष्टांत देऊन सांगितलें कीं, “समोर महापापी नामदेव उभा असलेला मला दिसतो आहे त्याला या पवित्र पंढरीक्षेत्रात पाय घालू देऊं नका. त्याच्या पदस्पर्शानें आपलें क्षेत्र विटाळेल ! ”

ही गोष्ट नामदेवाना कळली मात्र ! त्याच्या अंत:करणांत दु खांचा डोंब उसळला. ते बेभान झाले. आतापर्यंत केलेलीं सारीं पापें त्याच्या डोळ्यासमोर उभीं राहिलीं आणि त्या पापक्षालनाचा मार्ग मात्र त्यांना कोठेंहि दिसेना.

मग ते मनाशीं म्हणू लागले, "पापाचें क्षालन होत तरी कशानें असतें ? मनाच्या अज्ञानावस्थेंत हातून घडलेल्या पापांची निष्कृति कधींच घडत नसतें कां ? मग खऱ्याखुऱ्या पश्चात्तापाला अर्थ काय ? एकदा जो मनुष्य पापी ठरतो तो अखेरपर्यंत पापीच राहतो का ? मग परमेश्वराच्या भक्तीला कोणता अर्थ आहे ? वास्तविक पुण्यवान पुरुषांना परमेश्वराच्या पायाशीं लोटांगण घेण्याचें कांहींच कारण नसतें. माझ्यासारखे पापी लोकच परमेश्वराच्या पायाचा आश्रय मागत असतात. तो आश्रय मला मिळणार नाहीं का ? पण माझ्या भक्तीच्यां बळावर मी तो मिळवीनच मिळवीन !"

अशा तऱ्हेच्या अनेक शंकाकुशंका नामदेवाच्या मनासमोर त्या वेळी उभ्या राहिल्या नि चंद्रभागेच्या तीरावर उभ्या असलेल्या परिस्थितींत त्यांच्या अंतःकरणांत खऱ्याखुऱ्या भक्तीचें स्वरूप त्यावेळीं जागृत झालें. चंद्रभागेच्या खळखळाटापेक्षाहि त्यांच्या अंतःकरणांत उद्भूत झालेल्या भक्तीचा खळखळाट अधिक जोरदार होता. जणू आपल्या अंतःकरणातील भक्तीला आवाहन करून त्यांनीं पांडुरंगा-समोर साष्टांग नमस्कार घातला नि पांडुरंगाला टाहो फोडून ते म्हणाले, "पांडुरंगा, तुला माझी भीति वाटते का रे ? मी पतित आहे ही गोष्ट खरी. पण आम्हा पतितांना जर तूं दूर लोटूं लागलास तर तूं पतितपावन कसा राहशील ?"

इतकेंहि करून ते थांबले नाहींत, तर त्यांनीं पांडुरंगाला एक पत्रहि पाठविलें. त्यांत त्यांनीं लिहिलें कीं, "मी आतापर्यंत पतितपावन म्हणून तुझी कीर्ति ऐकली होती. म्हणून तर मी तुझ्या दाराशीं आलो. परंतु आता तूं तसा नाहीस हें बघून मी माघारीं फिरतो आहे. हे पंढरीनाथा विठ्ठला, एक तर तूं आपलें पतितपावन हें बीद तरी सोड. नाहींतर मला पतिताला पावन तरी करून घे. ही गोष्ट

जर होणार नसेल तर तुझें 'पतितपावन' हें नाव ठेवलें तरी कोणी हें मला साग ! अरे, माझ्या पातकाचें काय इतकें घेऊन बसला आहेस ? एक सामान्य गणिका ती काय ? परतु केवळ तुझ्या नामस्मरणानें ती पावन झाली नि विमानात बसून वैकुठाला गेली. अजामीळ काय कमी पातकी होता ? परतु चुकून एकवेळ त्यानें तुझें नांव उच्चारलें नि तोहि वैकुठाला जाऊन दाखल झाला. शिशुपालानें तर तुला भरसभेत शिव्या हासडल्या. या सर्वांपेक्षा मी काय अधिक पातकी आहे ? मग मला का दूर लोटतोस ? मला पावन करून का घेत नाहींस ? ”

नामदेवाच्या अत.करणाचा हा टाहो खरोखरच पाडुरगाच्या अतःकरणाला जाऊन भिडला. नामदेवाच्या अत करणात खऱ्या पश्चात्तापाचा जन्म झालेला आहे नि त्याचें चित्त आपल्या चरणीं विलीन झालेलें आहे ही गोष्ट पाडुरगानें तात्काळ ओळखली. याच पाडुरगानें कृष्णावतारी असताना कसाला स्वस्वरूपीं करून टाकला होता. शिशुपालाला तीच गति दिली होती. यादवाना नि वसुदेवादिकाना स्वतःची प्राप्ति करून दिली होती. हाच पाडुरंग कृष्णस्वरूपात नारद, ध्रुव, अक्रुर, शुक नि सनत्कुमार याना त्याच्या केवळ भक्तीच्या बळावर त्याच्या खऱ्या स्वरूपांत भेटला होता; आणि आज तोच पाडुरग नामदेवाना त्याच भक्तीच्या बळावर भेटत होता नि त्याना पावन करून घेत होता.

मानवी अत.करणांत उत्कट भक्तीचा प्रादुर्भाव झाल्याविना असले चमत्कार घडत नसतात; आणि ही भक्ति तरी नामदेवाच्या अतःकरणात का निर्माण झाली ? त्यांना खरोखरच •उपरति झाली होती. आपल्या दरोडेखोरीच्या आयुष्याला ते पुरेपूर कटाळले होते आणि एका नव्या आयुष्यात ते प्रवेश करीत होते.

परंतु या ठिकाणीं एक प्रश्न उद्भवण्यासारखा आहे. तो हा कीं, नामदेव हे मुळांत खरोखरच दरोडेखोर होते का? प्रत्यक्ष इतिहास बाजूला ठेवून देखील, केवळ संस्कारवादावर ज्यांचा विश्वास असेल त्यांना ही गोष्ट एक क्षणभरहि पटणार नाहीं कीं नामदेव हे दरोडेखोर होते! कारण नामदेवाचे वडील दामशेटी आपल्या वयाच्या दुसऱ्या वर्षापासून हरिभक्ति करूं लागले इतकेंच नव्हे तर ज्यांच्या पिढ्यानुपिढ्या केवळ हरिभक्तींतच व्यतीत झाल्या, ज्यांच्या कुटुंबांत पंढरीची वारी अपवादाला देखील कधीं चुकली नाहीं, त्यांच्या वंशांतील एक घटक दरोडेखोर निपजेल ही गोष्ट संस्कारवाद शास्त्राला कदापि पटणार नाहीं. इतिहासानेंहि तीच गोष्ट सिद्ध केलेली आहे; आणि म्हणून आपणालाहि तीच गोष्ट मानावी लागेल.

परंतु घटकाभर इतिहासाच्या विरुद्ध जाऊन केवळ वादासाठीं जरी गृहित धरलें कीं नामदेव हे कुसंगतीमुळें आपल्या पूर्वायुष्यांत दरोडेखोर होते तरी त्यांत बिघडण्यासारखें असें कांहीच नाहीं. इतिहास कसाहि असला तरी त्याची तरफदारी करण्याचें कारण नाहीं. वाल्या कोळ्याचा महर्षि वाल्मिकी होऊं शकतो तर दरोडेखोर 'नाम्याचा' संत नामदेव होण्यास काय हरकत आहे? दरोडेखोरी हा कांहीं त्यांचा स्थायी भाव खास नव्हता. तसा जर तो असता तर त्यांच्या अंतःकरणाला पश्चात्तापाचा कधी स्पर्शहि झाला नसता नि त्यांच्या अंतःकरणांत उत्कट भक्तीहि कधीं उद्भवली नसती. तेव्हां उत्कट भक्ति हीच त्यांच्या अंतःकरणाची मूळ प्रवृत्ति होती ही गोष्ट आपोआपच वरील न्यायानें सिद्ध होते.

आणि मोठ्या लोकांचे पाय पाळण्यांत दिसतात हा न्याय तरी प्रत्येक ठिकाणीं लावण्यांत काय अर्थ आहे? मोठ्या लोकांचे आरंभहि मोठेंच असतात—नव्हे ते असलेच पाहिजेत अशी तरी

इच्छा काय म्हणून असावी? लक्षावधि पतितांची लक्षावधी पापें धुवून त्याना पावन करणारी पवित्र गंगा हिचा उगम गंगोत्री नामक एका लहानशा ठिकाणी आहे. ज्या हिमालयाची उत्तुंग शिखरें केवळ गगनाला भिडलेलीं आहेत नि म्हणूनच वैकुंठवासी शंकराचा निवास त्या ठिकाणीं प्रस्थापित झालेला आहे त्या हिमालयाचें प्रारंभींचें शिखर एखाद्या लहानशा टेकडीएवढेंहि नसेल. मोठ्या व्यक्तींचे वा वस्तुंचे प्रारंभहि तसेच मोठे असावेत ही केवळ इच्छा म्हणून ठीक आहे. पण ते तसे नसतील तर तत्सम हट्टाग्रहहि असता उपयोगी नाहीत. सारांश, नामदेवानीं आपल्या आयुष्याचा प्रारंभ दरोडेखोरीनें केला असें मानण्यात आपण त्यांच्या पदरात कोणताहि कमीपणा टाकीत नाही. उलट त्यांनीं आपली पतित परिस्थिति पावन केली यातच त्यांचा खरा मोठेपणा सिद्ध होतो आणि त्याचें चरित्र पतिताना जणू दीपस्तंभासारखें वाटतें. केवळ उत्कट भक्तीच्या बळावर आपली परिस्थिति उन्नत केल्याचें नामदेव हें एक मूर्तिमंत प्रतीक आहे. आपलें नाम ज्यानीं देव बनविलें अशी त्यांच्या नावाची प्रतिष्ठा प्रस्थापित झालेली आहे.

अर्थात् आपलें हें 'देवत्व' प्रस्थापित करण्यास नामदेवाना फार मोठे प्रयास पडलेले आहेत. घरचा नि दारचा असह्य जाच त्यांना सहन करावा लागलेला आहे. नामदेवाचे वडील दामशेटी यानीं आपल्या या मुलाचें लग्न त्याच्या वयाच्या आठव्याच वर्षी लावून दिलें होतें. सदावर्ते याच्या राजाबाई नावाच्या मुलीशीं हा संबंध जडला होता. या लग्नसोहळ्याचा थाट मोठा अपूर्व होता. परंतु ती अपूर्वाई ध्यानात घेण्याच्या पलीकडे नामदेव दिवसेंदिवस जात चालले होते. आपल्या संसारात त्याचें मन कधींच रमलें नाहीं. परमार्थाच्या गोडीपुढें संसाराची गोडी लंगडी पडू लागली. विश्वाच्या संसारापुढें वैयक्तिक

संसाराचें तेज फिकें भासूं लागलें आणि या गोष्टीचा त्याच्या वडिला-पेक्षां आईच्या मनाला मोठा विषाद वाटूं लागला. पारमार्थिक संसारापेक्षा आपल्या 'नाम्यानें' आपला वैयक्तिक संसार उभा करावा अशी तिची सहाजिकच इच्छा होती. परमेश्वरप्राप्तीपेक्षा पैशाच्या प्राप्तीला तिच्या दृष्टीनें प्राधान्य होतें; आणि या मार्गांत तिच्या दृष्टीनें जर कोणती प्रमुख धोंड असेल तर ती विठ्ठलाची होती. आपलें फसवें स्वरूप दर्शवून विठ्ठलानें आपल्या नामदेवाला आपलासा करून घेतलेला आहे नि त्याच्या नादानें आपलें पोटचें पोर विनाशाच्या गर्तेकडे निघालें आहे अशी तिची खात्री होऊन चुकली.

या साऱ्या अनर्थाला एकटा विठ्ठल कारणीभूत आहे ही गोष्ट तिच्या मनानें एकदा पक्की केल्यानंतर ती एक क्षणभरही थांबली नाहीं. प्रत्यक्ष विठ्ठलाच्या समोर जाऊन तिनें त्याची चांगलीच हजेरी घेतली. त्याला उद्देशून ती संतापानें म्हणाली, "हे विठ्ठला, पांडु-रंगा, तूं आतापर्यंत कोणाचें बरें केलें आहेस ? त्या जगजेत्या वैष्णव नारदाला तूं लंगोटी लावलीस. मयूरध्वज राजा मोठा भला माणूस होता. पण त्याला तूं करवतीं घातलास. दानशूर बलीला पाताळीं दडपलेस. राजर्षी भीष्माचार्यांची बाणानीं पूजा बांधलीस. हरीचा दास जो रुक्मांगद त्याचा उभा गाव ओस पाडलास. शुकाचार्य हा आपल्या आईवडिलाचा एकुलता एक पुत्र होता. परंतु त्याला तूं ज्ञानाच्या नादीं लावलेंस. ध्रुव बाळाला अढळपद अर्पून त्याचें पृथ्वीवरील येणें जाणें तूं बंद केलेंस. सत्य-भक्त हरिश्चंद्र नि त्याची एकनिष्ठ पत्नी तारामती यांना डोंबाघरीं पाणी भरायला तूं भाग पाडलेंस. तुझा परमभक्त प्रल्हाद, पण त्याच्या पित्याची तूं हत्या केलीस. एवढ्या उत्कट भक्तीचा हनुमान पण

त्याला तू मर्कट करून टाकलेंस. पुण्यवंत राजा नळाचा छळ केलास. श्रियाळ राजाचा पुत्र खालास. तुला ना जात, ना कुळ. परंतु माझ्या नाम्याच्या पंक्तीला बसून तूं त्याला भ्रष्टविलेस ! आम्ही तुझें काय घोडें मारलें आहे सांग ! माझ्या नाम्याला तू अशा तऱ्हेनें का भुरळ पाडतोस ? आम्ही अनाथ आहोत. पोटापाण्यासाठीं शिंपी काम करतो. पण तेंहि तुझ्यानें बघवत नाही का ? माझें बाळ माझ्यापासून का हिसडून नेतोस ? सांग ! सांग ! ! ”

मातृहृदयाचा तो टाहो ऐकून विठ्ठलानें म्हटलें, “ मला तुझ्या नाम्याशीं काहीं एक कर्तव्य नाहीं घेऊन जा परत तुझ्या नाम्याला! ”

नामदेव आपल्या आईबरोबर त्यावेळीं परत आले खरे, परंतु पुन्हा पांडुरंगाकडे परत गेले. त्यांचें पांडुरंगाचें व्यसन कमी होत नाहीं असें पाहून एक दिवस गोणाई वैतागानें त्यांना म्हणाली, “नाम्या, तू हा देवाचा नाद सोड नि मी जे काय सांगतें तें जरा नीट ऐक. अरे, तू माझ्या पोटचा गोळा म्हणून तर तुला सांगितल्याशिवाय रहावत नाहीं. आपला भरला संसार सोडून तूं त्या पांडुरंगाचा-निःसंगाचा संग धरलेला आहेस. परंतु तुझी कोणतीच मागणी तो पुरविणार नाहीं. तर उलट एक दिवस तो तुला वैकुंठाला मात्र घेऊन जाईल. अरे, इतर मुलें कशी वागतात हें तरी एकदा नीट बघ. तू मात्र आपल्या कुळाला कलंक लावतो आहेस. घरच्या संसारात धन-धान्य नांदत असताना तुला अभाग्याला एकसारखी पांडुरंगाची आस लागलेली आहे. त्याच्या नादानें तू आपल्या घरचा धंदा बुड-वीत आहेस नि घराकडे दुर्लक्ष करतो आहेस. कसली ही तुझी जगा-वेगळी भक्ति ? आपल्या संसाराची होळी मात्र तू आरंभिली आहेस. अरे बाबा, या विठ्ठलाच्या नादानें कुणाचें बरें झालें आहे ? जो माणूस याची आस धरतो त्याचें सारें तळपट झाल्याशिवाय कधीं राहात

नाहीं. याची संगत जडली कीं संसार संपला नि भिकेसाठीं झोपळा हातीं आलाच म्हणून समजावें ! असा हा घरंघेणा तुझा देव आहे. कोणत्या दैवतानें तुला वेढलें आहे कुणास ठाऊक ! त्याच्या नादानें तुझें सारें जिणें तूं लाजिरवाणें करून टाकलें आहेस. नऊ महिने तुझा भार पोटात वाहिला. त्याचे पांग तू अशा तऱ्हेनें फेडतोस का ? तुझ्याबद्दल मी केवढी आशा धरली होती ? आणि तू माझी केवढी निराशा केलीस ? ''

आणि नंतर ती माऊली आपल्या मनाशीं म्हणाली, " ज्याचें दैव त्याच्या सांगातीं असतें हेंच खरें ! कुणी अश्वावर बसून मार्ग चालतात तर कुणी पायींच रान तुडवितात. कुणी मिष्टान्न खातात तर कुणाला पोटाला कोरान्नहि मिळण्याची पंचाईत पडते. माझ्या नाम्याच्या पूर्वसंचितात याच गोष्टी असल्या तर त्याला तो तरी काय करणार ? ''

गोणाईच्या या उद्गारात उद्वेग होता आणि त्याहिपेक्षा मातृ-हृदयाचें प्रतिबिंब त्यामध्यें स्पष्टपणानें उमटलेलें दिसत होतें. कधीं कधीं तिच्या भावना अनावर होत; आणि साऱ्या गोष्टी तिच्या सहनशीलतेच्या पलीकडे जात. एके दिवशीं पाडुरंगाला तिनें स्पष्ट-पणानें बजावलें, " विठ्ठला, माझ्या देहाचा नि संसाराचा संकल्प सोडून मी आज तुझ्या पायाशी आलें आहे. एक तर माझ्या नाम्याला तरी तुझ्यापासून परत नेईन नाहींतर तुझ्या पायापाशीं जीव तरी देईन ! ''

नामदेवाच्या घरची परिस्थिति दिवसें दिवस खालावत चालली होती. त्याचें राहतें खोपट मोडकळीला आलें होतें. त्या खोपटाचें बहुतेक सारें कूड निघून गेलें होतें. जेव्हा सोसाट्याचें वारें सुटे तेव्हां घरांत दाणादाण होऊन जाई. थंडीच्या दिवसांत तर लहानगी

पोरें थंडीनें काकडून जात. अशा वेळीं त्यांच्या अंगावर घालायला घरात एकहि धडकी वाकळ उरली नव्हती. विशेषतः दुपारची वेळ झाली म्हणजे साऱ्या कुटुंबाच्या डोळ्यासमोर अक्षरशः विश्व उभें राही. मुलें भुकेनें तडफडत आणि अन्नाशिवाय त्याची समजूत पटे- नाशी होई. अशा वेळीं घरांत दाण्याचा एकहि कण शिल्लक नसे, हें बघून नामदेवाची पत्नी राजाई हिला परमावधीचे कष्ट होत.

परंतु या परिस्थितीमुळें नामदेवाच्या परमार्थ भक्तींत मात्र कधीं खंड पडला नाहीं.

नामदेवाच्या या परमार्थ वृत्तीबद्दल त्याची पत्नि राजाई हिनेंहि कांहीं कमी आदळआपट केलेली नाहीं. ती एके दिवशीं नामदेवांना म्हणाली, "आई जें शिकविते तें तुम्हीं ऐकत नाहीं. तुम्हांला आतां लौकिकाची चाड उरलेली दिसत नाहीं. लंगोटी लावून तुम्ही गोसावी झालेले आहांत. सोन्यासारखा संसार दशदिशा उधळून मोकळे झालात. या तुमच्या वागण्यानें माझ्या मनात खरोखर उद्वेग उत्पन्न झालेला आहे. हें जिवाचें दुःख मी आता सांगू तरी कुणाला ?"

परंतु असें म्हणूनहि तिनें आपल्या जिवाचें हें दुःख रखुमाईकडून विठोबाच्या कानापर्यंत अखेरीस पोचविलें. एकें दिवशीं ऐन रात्रीं तिनें रखुमाईला गाठलें नि त्या मातेला राजाई म्हणाली, "अहो रखुमाबाई, माझ्या नवऱ्याला वेडें करून का सोडलें आहे असें आपण एकदा विठ्ठलाला विचारा. त्याच्या अंगावर वस्त्र राहिलें नाहीं. जेवायला पात्र राहिलें नाहीं. अहर्निश एखाद्या निर्लज्जासारखे ते विठ्ठलाचे नाव घेऊन नाचत असतात. माझ्या घरीं चौदा खातीं तोंडें आहेत; आणि त्याना अन्नासाठी दारोदार हिंडावें लागत आहे, आणि हे माझे पति संसारांत असून नसल्यासारखे झाले आहेत।"

असें प्रसंग वारंवार येत; आणि येत तसेंच ते निघूनहि जात.

नामदेवाच्या मनावर या प्रसंगांचा परिणाम घडत नसे असें मात्र नाहीं. माणूस परमार्थ मार्गात असला म्हणून त्याची माणूसकी जाते थोडीच ? आपल्या आईच्या नि पत्नीच्या या उद्गाराचा त्यांना विषाद वाटत असे. परंतु त्यांच्या अंतःकरणातील विठ्ठल-भक्ति मात्र त्यामुळें कधींहि कमी झाली नाहीं. गंगा नदी ज्याप्रमाणें वाटेंत येणाऱ्या प्रत्येक अडथळ्याला न जुमानतां महासागराला मिळण्या-साठीं पुढें पुढें जात असते त्याप्रमाणें नामदेवाची भक्तिरूपी गंगा अशा प्रकारच्या अडथळ्यांना न जुमानता विठ्ठलस्वरूपीं होण्यासाठीं पुढें पुढें जात होती. परंतु नामदेवहि माणूसच होते आणि एखादे वेळीं त्यांच्या मनातील गहिंवर अनावर होई. मग ते आपल्या आईला म्हणत, " आई, आवंढ्या नागनाथाच्या दर्शनाला मी गेलो होतो. तेव्हांपासून माझ्या अंगात हा विठ्ठलाचा संचार झालेला आहे. तेव्हापासूनच हे सारे ऐहिक बंध तुटले, लौकिक व्यवहार संपला आणि माझ्या जीवानें विठ्ठलाचा छंद घेतला. तेव्हापासून टाळ दिंडी घेऊन मी माझ्या रंगांत नाचू लागलो. त्यानेंच माझ्या मनाला सुख वाटतें. तुला खरी गोष्ट सांगू कां ? या देह-घर-संसाराचा मला मनस्वी कंटाळा आलेला आहे. पुत्र, पत्नी नि नात्यागोत्यांच्या माणसाची पर्वा मला वाटेनाशी झालेली आहे. त्याच्यात जर मी रंगलो तर मला नरकवास घडेल अशी धास्ती मला वाटू लागलेली आहे. हें संसार-सुख तुला सत्य वाटतें खरें. परंतु माझ्या मतानें हा केवळ विष-विस्तार आहे. म्हणून मी त्या संसारापासून दूर झालो नि त्या विठ्ठलाला शरण गेलो. तोच आता माझा प्रतिपाळ करील, माझ्या भरण्यापोसण्याची तू मुळींच काळजी करू नकोस. मी कोटी कोटी जरी अपराध केले तरी तो मला कदापि दूर लोटणार नाहीं. माझें अहर्निश संरक्षण करण्यासाठींच जणू आपल्या हातीं सुदर्शन

चक घेऊन तो सतत तेथे उभा आहे. माझा इष्ट-मित्र, बंधु, सोयरा-धायरा सगळा आता तोच आहे. "

आणि अखेरीस आपल्या आईलाच आपल्या मार्गाकडे ओढण्याचा त्यानी प्रयत्न केला आहे. तसा प्रयत्न करताना आपल्या आईला त्यानीं म्हटलें आहे, " आई, माझ्या ठिकाणी तुझें जें प्रेम आहे त्याचा अल्पांश जरी तूं विठ्ठलाच्या पायीं लावलास तरी तुला माझ्या या भक्तिसुखाची पुरेपूर जाणीव होईल. "

परंतु त्या माउलीला ती जाणीव लवकर कधीं झाली नाहीं; आणि नामदेवाच्याहि मनांतील ती जाणीव कधी कमी झाली नाही. त्याच्या पत्नीला मात्र पुढें एका प्रसगानें नामदेवाच्या अगीं असलेल्या अलौकिक सामर्थ्याची पुरेपूर कल्पना आली. एकदा राजाईचे दोन भाऊ तिच्या घरीं आले असताना घरात अन्नाचा एकहि कण शिल्लक नव्हता. नामदेव त्याबाबतीत नेहमींच निष्काळजी असत, परंतु त्यामुळेंच राजाई त्यावेळीं काळजींत पडली. परंतु पंढरीचा विठ्ठल जागरूक होता. त्यानें केशवशेट वाण्याचें रूप घेऊन नामदेवांचें घर भरलें नि राजाईची काळजी दूर केली. त्यावेळेपासून तिच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला आणि नामदेवाचा महिमा तिला कळून चुकला. त्यावेळीं तिनें नामदेवाचे पाय धरले आणि त्याच्याशीं आतापर्यंत अज्ञानानें कठोर वर्तन केल्याबद्दल त्याची तिनें क्षमा मागितली. अखेरीस ती नामदेवाना म्हणाली, " माझ्या जीवनात आता खराखुरा आनंदाचा क्षण उगवलेला आहे. या तुमच्या सुखाला आता मी कोणती उपमा देऊ? मी तुमची अर्धांगी या नात्यानें या तुमच्या ससारात मी खरोखर धन्य झालें आहे. माझी तुम्हांला आता एकच विनंति आहे. मला एक वेळ तुम्ही पांडुरंगाच्या पायीं नेऊन घाला ! "

एखादा प्रचंड लोंढा यावा नि त्यामध्यें सृष्टीवर साचलेली सारी घाण वाहून जावी त्याप्रमाणें राजाईच्या अंत:करणांत नव्या श्रद्धेचा लोंढा निर्माण झाला नि त्यामध्यें नामदेवांबद्दल तिच्या मनावर सांचलेली घाण पार वाहून गेली.

यापुढें आपल्या पतीला एकहि उणा शब्द राजाई कधीं बोलली नाहीं. नामदेव जसे पांडुरंगमय झाले होते त्याप्रमाणें ती नामदेवमय बनली होती. नामदेवानीं तिला तात्काळ आपल्यासारखें करून टाकलें होतें. अशा तऱ्हेनें त्यानीं संसार-लक्ष्मीचें अंत:करण जरी जिंकलें होतें तरी लौकिक लक्ष्मीनें मात्र त्यांच्या कुटुंबाकडे कायमची पाठ फिरविली होती; आणि त्यांच्या संसाराचा उन्हाळा मांडला होता. परंतु या गोष्टीची नामदेवानीं कधींच पर्वा केली नाहीं आणि आपली विठ्ठलाची अव्यभिचारी भक्ति तशीच पुढें चालू ठेवली. ते विठ्ठलाचे परम भक्त बनले आणि विठ्ठल त्यांचा परमप्रिय सखा झाला.

परंतु नामदेवाच्या या भक्तींत एक मोठें व्यंग होतें. त्यांची भक्ती एकारली होती. कोणत्याहि सद्गुणाचा अतिरेक झाला म्हणजे क्वचितप्रसंगीं त्याचें दुर्गुणांत रूपांतर होत असतें; तसें त्यांच्या या भक्तिगुणाचें झालें होतें. अनुभवात्मक ज्ञानाविना मोक्ष मिळत नसतो हा सिद्धांत अजून त्यांच्या पचनीं पडावयाचा होता. भक्तीचें अंतीम पर्यवसान ज्ञान हें असून भक्ति हें त्याचें केवळ साधन आहे, साध्य खचित नव्हे, ही गोष्ट त्यांच्या अनुभवाच्या पलीकडची होती. ज्ञानाच्या गावाला जायला भक्तिचा मार्ग तुडवावा लागतो, ही वार्ता अजून त्यांच्या गावीहि नव्हती. अध्यात्मशास्त्रानें ज्ञान नि भक्ति यांची जी सांगड घालून दिलेली आहे तिकडे नामदेवाचें जावें तितकें लक्ष अजून गेलें नव्हतें.

अध्यात्मशास्त्रानें भक्ति आणि ज्ञान यांची अशी कांहीं मजेदार

गुंफण बनविली आहे कीं तिला फक्त एखाद्या पुष्पमालेचीच उपमा शोभावी. कापसाच्या सूत्रात जशी फुलें गुंफावीत त्याप्रमाणें भक्तीच्या सूत्रात जणू ज्ञान गुंफलें आहे. नामदेव थोर भगवद्भक्त खरे, पण त्यांची भक्ति आंधळी होती. त्या भक्तिला अजून ज्ञानाचें अधिष्ठान प्राप्त झालें नव्हतें.

परंतु शके १२१३ च्या सुमारास आळंदी येथें नामदेव नि ज्ञानदेव या दोघांची प्रथम भेट झाली. जणू भक्ति नि ज्ञान यांची मूर्तिमंत प्रतिकेंच परस्परांना भेटत होतीं. या प्रसंगानें नामदेवाच्या एकांगी भक्तीला ज्ञानदेवाच्या ज्ञानाचें अधिष्ठान प्राप्त झालें. त्या दृष्टीनें त्या दोघांच्या भेटीची ही घटना नामदेवाच्या आयुष्यांतील क्रांतिकारक घटनाच समजली पाहिजे.

ज्ञानावाचून भक्ति नाहीं नि सद्गुरुकृपेवाचून ज्ञान नाहीं ही गोष्टहि नामदेवांना दुसऱ्या एका प्रसंगानुसार कळून आली. नामदेव जेव्हां प्रथम आळंदीस आले तेव्हां ‘ पंढरीचा प्रेमा घरा आला ’ या जाणिवेनें ज्ञानेश्वरादि भावंडांनीं त्यांचे पाय धरले. त्यावेळी नामदेवांच्या अंतःकरणात आपल्या हरिभक्तीचा अहंकार पुरेपूर जागृत होता. ज्याला हरि-चरणांचा नित्य समागम आहे त्याला इतर संतापुढे नमन करण्याचें कांहींच कारण नाही, असे त्यांना वाटलें. परंतु ज्ञानदेवांची धाकटी बहीण मुक्ताबाई ही वयानें जरी लहान होती तरी बोलण्यात मोठी परखड होती. ज्या नामदेवांना देवाचा अखंड शेजार आहे त्यांचा अहंकार अजून गेला नाहीं त्याअर्थी नामदेव अजून कोरडे ठणठणीत आहेत, ही गोष्ट तिने तात्काळ ओळखली परंतु त्याठिकाणीं ती थांबली नाहीं. संत मंडळींपैकीं गोरोबा कुंभार यांचेकडून तिनें नामदेवाचें ‘ मडकें ’--डोकें तपासून घेतलें. गोरोबा काकांनी त्यांच्या डोक्यावर थापटणें चालविलें.

नि तें अजून कच्चें असल्याचा निर्वाळा दिला. मग तें 'भाजलें' पाहिजे असें मुक्ताबाईनें सांगितलें. त्या 'भाजण्याला' भिऊन नामदेवांनीं तडक पांडुरंगाकडे धाव घेतली; आणि आपलें साऱ्या 'कैकाडी' सतांविरुद्ध असलेलें गाऱ्हाणें पांडुरंगापुढें जाऊन सादर केलें. पांडुरंगानें अंतर्ज्ञानानें साऱ्या गोष्टी आधींच जाणल्या होत्या. नामदेवाच्या या परिस्थितीचें पंढरीनाथाला मनस्वी हंसू आलें. पांडुरंगानेंहि सतांसारखाच निर्णय दिला; आणि संत विसोबा खेचर यांचेकडून गुरुपदेश घेण्याचा आदेश त्यानें नामदेवाना दिला. त्यावेळीं पांडुरंग नामदेवांना म्हणाला, "केवळ तुझ्या प्रेमाखातर मी तुझ्याशीं हे मायावी लटके खेळ खेळत आलो आहे. परंतु जोंपर्यंत तुझ्यावर सद्गुरुकृपा झालेली नाहीं तोंपर्यंत माझें खरें दर्शन तुला होणार नाहीं सद्गुरुच्या आज्ञेविना तुझीं ऐहिक बधनें कदापि तुटणार नाहींत."

त्यावेळीं नामदेवाना एक गोष्ट कळून चुकली कीं, सद्‌गुरुकृपेविना आपल्याला ज्ञानप्राप्ति कधींहि होणार नाहीं. त्या प्रसंगानें त्याचे डोळे पुरेपूर उघडले. त्याचा भक्ति-गर्व निरास झाला. अहंकार दशदिशा पळून गेला; आणि सत विसोबा खेचर याचा गुरुपदेश घेण्यासाठीं ते तडक आवढ्या नागनाथाकडे निघून गेले.

त्याच्या आयुष्यातील दुसरी क्रांति आता त्याठिकाणी घडणार होती. त्याच्या आयुष्यातील पहिली उपरती त्याना त्याच ठिकाणी झाली होती. त्यावेळी जागृत झालेल्या नागनाथानें त्याना पंढरीला जाण्याचा आदेश दिला होता; आणि आज पंढरीनाथ त्याना पुन्हा नागनाथाकडे जाण्याचा आदेश देत होता.

त्याठिकाणीं गेल्यानतर नामदेवानीं जें दृश्य बघितलें तें पाहून ते केवढ्यादा दचकले! शंकराच्या पिंडीवर खुशाल आपले पाय

टाकून त्यांचे भावी सद्गुरु त्याठिकाणीं पहुडले होते. त्याचें अत्यंत ओंगळ स्वरूप बघून नामदेवाच्या मनांत प्रथम शिसारी उत्पन्न झाली. त्यांच्या अंगावर असंख्य जखमा झाल्या होत्या आणि त्या जखमां-मधून एकसारखी धाण वहात होती. सर्वांगावर माशा घोंघावत होत्या आणि जिकडे तिकडे दुर्गंधी सुटली होती. विसोबाच्याच सांगण्या-वरून नामदेवानीं त्यांचे पाय शंकराच्या पिंडीवरून उचलले आणि दुसरीकडे ठेवले. तों काय आश्चर्य ? तेथेंहि त्यांच्या पायाखालीं दुसरी पिंडी उपस्थित झाली. नामदेवानीं पुन्हा आपल्या गुरूचे पाय उचलले नि पुन्हा त्याहि ठिकाणीं दुसरी पिंडी अवतीर्ण झाली. असें असंख्य वेळा झालें. या प्रसंगानंतर विसोबा खेचरानी नामदेवाना परमेश्वराच्या सर्वसाक्षित्वाचा उपदेश केलेला आहे. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, पिंड ब्रह्मांड व्यापून अणुरेणूतही सर्वत्र परमेश्वर साक्षीभूत आहे असें या सद्गुरूनीं त्यांच्या या सत्पात्र शिष्याला सांगितलें.

सद्गुरु उपदेशानें अगदीं काठोकाठ तृप्त झाल्यानंतर आणि आपलें परम सुख आपल्या डोळ्यानी प्रत्यक्ष पाहिल्यानंतर नामदेव पुन्हा पंढरीला परत आले. त्याठिकाणीं आल्यानंतर पांडुरंगानें त्यांची कुत्र्याच्या रूपानें परीक्षा घेतली आणि त्या परीक्षेस नामदेव पुरेपूर उतरले.

सद्गुरु उपदेशामुळें त्यांच्यामध्यें आतां कोणत्याहि प्रकारचे न्यून उरलें नव्हतें. त्याना खऱ्या संताची पूर्णावस्था प्राप्त झाली होती. परंतु ज्ञानेश्वराच्या बरोबर जेव्हां तीर्थयात्रेला निघण्याचा प्रसंग आला तेव्हा मात्र विठ्ठलाचे पाय सोडण्याची त्यांची सिद्धता होईना. नाम-देवाना-त्या भक्तीच्या प्रतिकाला-बरोबर घेऊन तीर्थयात्रेला निघण्याचा आपला मनोदय ज्ञानदेवानीं नामदेवापाशीं बोलून दाखविला. तेव्हा

नामदेव म्हणाले, " माझें सारें सुख या पांडुरंगाच्या पायाशीं आहे. मग दुसरीकडे तीर्थयात्रा करायला जाण्याची आवश्यकता काय ? "

मग तें ' भांडण ' पुन्हा पांडुरंगाकडे गेलें. याहिवेळीं पांडुरंगाचा निर्णय नामदेवाच्या विरुद्ध गेला. पांडुरंगानें हसत नामदेवाना सांगितलें, " अरे, केवढें तुझें भाग्य थोर आहे ! प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति ज्ञानेश्वर तुझ्या संगतीचा आदर करीत आहेत. तेव्हा या भाग्याचा जरूर स्वीकार कर ! "

त्यानंतर नामदेवाना सांभाळून आणण्याबद्दल पांडुरंगानें ज्ञानदेवाना विनंति केली; आणि अशा तऱ्हेनें मोठ्या प्रयासानें पांडुरंगानें नामदेवाना तीर्थयात्रेला पाठविलें.

परंतु विठ्ठलाची ही 'जोखीम' सांभाळतां सांभाळतां ज्ञानदेवाना पुरेवाट झाली. आपले गुरु विसोबा खेचर यानीं उपदेशिलेलें ईश्वराचें सर्वसाक्षित्व नामदेव केव्हांच विसरले. एखादें लहान मूल आपल्या आईची पुन: पुन्हा आठवण काढतें त्याप्रमाणें नामदेवांना विठ्ठलाची एकसारखी आठवण होऊं लागली. वस्तुत: त्यांच्या सांगातीं मूर्तिमंत ज्ञान चाललें होतें. परंतु त्याना आपल्या पंढरीच्या सख्याची वारंवार आठवण येऊं लागली. त्याचा जीव घाबरा होऊन गेला. नामदेव ज्ञानेश्वराच्या सांगातीं चालले होते. परंतु त्याचा सोयरा मात्र पंढरीला राह्यला होता, आणि त्याच्या वियोगानें नामदेवाचें अंत:करण फाटून चाललें होतें. " तुझा विठ्ठल सर्वदेशीं व्यापलेला आहे," असें ज्ञानदेवानी नामदेवाना पुन: पुन्हा सांगितलें; परंतु यात्रा मार्गांत अनेक प्रसंगीं नामदेवानीं विठ्ठलाचा धावा करून त्याला आपल्यासमोर उपस्थित केलेला आहे.

सारीं तीर्थक्षेत्रें संपवून जेव्हां हीं सारी संतमंडळी पुन्हा पंढरपूरला येऊन दाखल झालीं तेव्हा मातेपासून अनेक दिवस विलग केलेलें मूल

पुन्हा आपली माता दिसतांच तिला बिलगते त्याप्रमाणें नामदेव पंढरीनाथाला बिलगले. नामदेव आपल्या जिवलगाला भेटले तेव्हां त्याचा कंठ दाटून आला होता आणि डोळ्यातून एकसारख्या अश्रुधारा ओसंडत होत्या. पंढरीच्या चरणावर पुन. पुन्हा लोळण घेऊन नामदेवानीं त्याला सांगितलें कीं, "उदंड तीर्थांची मौढी मी ऐकली. पण ती ऐकत असताना मला तुझ्या चंद्रभागेची एकसारखी ओढ लागत होती."

मग नामदेवाच्या विरहानें पांडुरंगाची जी परिस्थिती झाली होती तीहि त्यानें नामदेवांना निवेदन केली. नामदेवांच्या चिंतेनें पांडुरंगाच्या डोळ्याला डोळा लागला नाहीं. एक क्षणभरहि त्याला नामदेवाचा विसर पडला नाहीं. नामदेवावाचून सारी पंढरी त्याला उदास भासत होती. एवढें सांगून पंढरीनाथानें नामदेवाकडे बघत म्हटलें,' " तुला जशी माझी तशीच मलाहि तुझी गोडी आहे. गुळाला ज्याप्रमाणें गोडी सोडीत नाही त्याप्रमाणें आपली परिस्थिती झालेली आहे ! "

प्रत्यक्ष पांडुरंगाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडल्यानंतर नामदेवाला धन्यता वाटली असल्यास त्यात काहीच नवल नव्हते.

मग या तीर्थयात्रेचे मोठें मावंदें झालें नि असंख्य जेवणावळी उठल्या. त्या जेवणावळीत प्रत्यक्ष पांडुरंगानें नि रुक्मीणीने भाग घेतला एवढेंच नव्हे तर पांडुरंगानें नामदेवाना आपल्या हातानें घास घातला नि त्यांचेंहि उष्टें स्वतः खाल्लें. चंद्रभागेच्या त्या परमपवित्र तीरावर ज्ञान नि भक्ति याचा जणूं संगम झाला होता. सारे महाराष्ट्रीय संत अशा तऱ्हेनें एकत्र येण्याचा तो अखेरचा सुयोग होता. तीर्थयात्रेच्या रूपानें सर्व संताचे हें फिरतें संमेलन या ठिकाणीं अखेरच्या क्षणीं येऊन दाखल झालें होतें. सर्व संत-

७७८५

मंडळींनीं या ठिकाणीं येऊन मनसुराद गप्पागोष्टी केल्या. तीर्थयात्रेच्या साऱ्या आठवणी या ठिकाणीं निघाल्या.

पांडुरंगाशीं गप्पा मारण्याची इतके दिवस अपुरी राहिलेली आपली हौस नामदेवानीं भागवून घेतली. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या नि नामदेवानीं भक्तीच्या कथा साऱ्या संताना ऐकविल्या. हरिनामाच्या गजरानें तर चंद्रभागेचें तीर नुसतें दुमदुमून निघालें.

परंतु संयोगानंतर वियोग येत असतो या गोष्टीची कल्पना त्यावेळीं कुणालाहि झाली नाहीं. थोड्याच दिवसात ज्ञानदेवांना 'घरचें' बोलावणें येईल या गोष्टीची प्रत्यक्ष पंढरीनाथालाहि कल्पना असेल कीं नाहीं कुणास ठाऊक ! पंढरीच्या पवित्र चंद्रभागेंत या ज्ञानसूर्याचें अखेरचें प्रतिबिंब उमटणार आहे ही कल्पनाहि यावेळीं कुणाला शिवली नसेल.

परंतु ती कल्पना जेव्हा आली तेव्हा दशदिशा दुःखानें भरल्या. प्रत्यक्ष दुःखाला दुःख झालें नि सुखाला सुख सोडून गेलें. पांडुरंगासह सारी संत मंडळी या महापुरुषाचें महाप्रयाण बघण्यासाठीं आळंदीला येऊन दाखल झालीं. तिकडे चंद्रभागेचें तीर सुनें झालें नि इकडे इंद्रायणीचें तीर फुलून गेलें. पांडुरंगाच्या पायाबरोबर चंद्रभागेचें पावित्र्यहि इंद्रायणीकडे चालत गेलें आणि त्या करुण प्रसंगाला साक्षीभूत राहिलें.

अखेरीस ज्ञानेश्वराच्या समाधीचा क्षण समीप आला. त्या प्रसंगानें जिकडेतिकडे पताका फडकत होत्या. टाळ-मृदुंगांचा गजर तर प्रत्यक्ष स्वर्गाला जाऊन भिडत होता. जिकडे तिकडे सडासंमार्जन करून रांगोळ्या घातलेल्या होत्या. सारे पशु-पक्षी या दारुण प्रसंगानें हरखून गेले होते. आळंदीच्या पंचक्रोशींतील मृत्तिका, पाषाण नि

खडे हे सचेतन बनले होते. या प्रसगानं जणू साऱ्या चराचर सृष्टीला दृष्टी प्राप्त झाली होती. भोवतालचे सारे वृक्ष ऋषीमुनींचें स्वरूप धारण करूनच कीं काय ज्ञानेश्वराच्या वाटेवर त्याचा अखेरचा सन्मान करण्यासाठीं उभे ठाकले होते. हातीं टाळ, झांजा नि मृदुग घेऊन आणि कपाळीं कृष्णवर्ण टिळा लावून सारे सत ज्ञानेश्वराच्या पुढें मागे हरिनामाची गर्जना करीत चालले होते. मुंग्यांच्या विवराला आग लागून असख्य मुंग्या बाहेर पडाव्यात त्याप्रमाणें आळदींतील लोक बाहेर पडले होते. त्यावेळीं तो सोहळा बघण्यासाठीं इद्रायणीचेंहि पाणी क्षणभर थबकलें नि वर आकाशात सूर्याचें परिभ्रमण कांहीं काळ स्थगित झालें.

त्या योगीराज ज्ञानेश्वराच्या महाप्रयाणाचा हा सोहळा बघून नामदेवाची परिस्थिती अत्यत विचित्र झाली. त्याच्या भक्तीला ज्ञानेश्वराच्या ज्ञानाचा नुकताच कुठें स्पर्श झालेला होता. त्या ज्ञान-परिसानें नामदेवाच्या भक्तीचें सोनें झालें होतें तरी त्या सोन्याला अजून त्या परिसाचा सहवास हवा होता. ज्ञानाविना त्याची भक्ति लगडी पडणार होती. ज्यावेळीं नामदेवाना ज्ञानाचें खरेंखुरें स्वरूप कळू लागलें त्याचवेळीं ज्ञानेश्वराना त्यांच्या माहेरचें बोलावणें आलें होतें. यावेळीं नामदेव अक्षरश. बावरून गेले. त्याचें दु'ख अनावर झालें. भावना त्याच्या आटोक्यात राहीनात. एखादें प्रचड धरण फुटून त्याचें पाणी रानोमाळ होऊन जावें त्याप्रमाणें त्याच्या अत.करणाची अवस्था होऊन गेली. दु.खानें त्याचें अतःकरण फाटलें.

या प्रसगानें नामदेव खरोखर बावरून गेले. शेषशायीनें एकदम पृथ्वीचा आधार काढून घ्यावा त्याप्रमाणें आपल्या भक्तीचें ज्ञानरूपी अधिष्ठानच कोणी काढून घेत आहे कीं काय असा भास त्यांना एक-

सारखा होऊं लागला. त्यांनीं सहाय्यासाठीं पांडुरंगाकडे नजर टाकली. परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. उलट त्यानेंच ज्ञानेश्वरांचा एक हात धरून त्याना समाधीस्थळाकडे नेण्यास प्रारंभहि केला होता. ज्ञानदेवाचा दुसरा हात निवृत्तिनाथांनीं धरला होता. ज्ञानेश्वराचें तें अखेरचें तेजस्वी रूप आपल्या डोळ्यात साठविण्याचा नामदेवानीं आटोकाट प्रयत्न केला. परंतु त्याच्या डोळ्यात अणुमात्रहि जागा उरली नव्हती. उलट जागेच्या अभावीं त्यांच्या डोळ्यांतील अश्रूच बाहेर ओसडत होते.

तिघे आत गेले नि बाहेर दोघे परत आले. ज्ञानदेवाना त्या ठिकाणीं एकट्यालाच सोडलें होतें. ज्ञानसूर्य दृष्टीआड झाला. जणू ज्ञान समाधिस्त झालें नि भक्ति मागें उरली. बाहेर आल्यानंतर निवृत्तिनाथांनीं ज्ञानेश्वराच्या समाधीवर स्वहस्ते शिळा ठेविली आणि तत्क्षणींच ज्ञान भक्तीला पारखें झालें.

परंतु त्यानंतर नामदेवानीं ज्ञानदेवाच्या भेटीचा एकसारखा ध्यास घेतला. त्याचा विरह नामदेवाना फारच जाणवू लागला. ज्ञानदेवांचें दर्शन झाल्याविना मी पंढरीला येणार नाहीं असें त्यानीं पांडुरंगाला स्पष्टपणें बजावलें. ज्ञानेश्वर हें माझें सौख्य सरोवर होतें. त्यामध्यें एखाद्या जलचरासारखा मी स्वस्थपणानें पडून होतों. परंतु दुर्दैवानें त्या सरोवराचें पाणी आटलें नि मी उघडा पडलो. आता आपला कृपामेघ वर्षवा नि तें सरोवर पुन्हा पाण्यानें काठोकांठ भरा, असा हट्ट त्यानीं विठ्ठलासमोर घेतला. मीच तो ज्ञानेश्वर आहे, असें उलट पांडुरंगानें त्याना सांगून पाहिलें. परंतु तो नामदेवाचा हट्ट होता–वय वाढलें असलें तरी दगडाच्या देवाला नैवेद्य खायला लावणाऱ्या लहान पोराचा तो हट्ट होता हें विठ्ठलानेंहि ताडलें. ' तुमचें सारें ब्रह्मज्ञान गुंडाळून ठेवा; आणि मला

ज्ञानदेवाची भेट घडवा;" असें जेव्हां नामदेवाचें निर्वाणीचें बोलणें आलें तेव्हा तर पांडुरंगाचें सारें तत्वज्ञान खुंटलें आणि मग त्यानें ज्ञानदेव नि नामदेव याची पुन्हा भेट करविली. ज्ञानदेवांना बघितल्यानंतर नामदेवाना परमावधीचा हर्ष झाला- त्यांनीं ज्ञानदेवाचे पाय घट्ट धरून ठेवले; आणि मोठ्या कळवळ्यानें ते ज्ञानेश्वराना म्हणाले, "तुम्हीं माझे सद्गुरु झालेले आहांत. मला सोडून तुम्ही आता जाऊं नका. मला दूर ठेवूं नका. खरंच, मला आतां अंतर देऊं नका. तुमच्या दुभत्या गायींच्या कासेला लागलेलं मी एक वासरू आहे. मला विलग हिसडूं नका. मला तुमचा वियोग सहन होणार नाहीं."

परंतु ज्ञानेश्वराच्या नंतर ५४ वर्षे नामदेव हयात होते. ही सारीं वर्षें भागवतधर्माचा प्रचार नि प्रसार करण्यासाठीं त्यानीं व्यतीत केलीं. या कालावधींत ते पुन्हा एकदां उत्तरेकडे गेले नि त्याठिकाणीं त्यानीं भागवत धर्माची ध्वजा डौलानें फडकाविली. जगाला भक्ति-मार्गाची शिकवण दिली. शतकोटी अभंग रचण्याची आपली प्रतिज्ञाहि त्यांनीं जवळजवळ पुरी केली. त्यानीं संसारिकास जो उपदेश केलेला आहे तो मात्र अत्यंत मोलाचा असा आहे. मानवी संसार हा केवळ दोन दिवसांचा पाहुणा आहे. त्याठिकाणीं नित्य नवी वासना निर्माण होत असते नि मानवी आयुष्य मात्र कणाकणानें कमी कमी होत जातें. संसाराची चिंता वहातां वहाता एक दिवस तुमचा जन्म असाच निघून जाईल. तुमच्या पायात जी वासनेची बेडी पडलेली आहे तिची प्रथम सोडवण करा. त्यासाठीं विठ्ठलाला शरण जा. पाण्यावर दिसणारा बुडबुडा बघता बघता एका क्षणात नाहीसा होतो. गारुड्याचा लटका खेळ केवळ एक क्षणभरच दिसतो. त्याप्रमाणें हा मानवी संसार आहे. केवळ एका क्षणाचा तो पसारा आहे. दुर्लभ

नरदेह तुम्हा आम्हाला प्राप्त झालेला आहे. या देहांत गोविंदाची प्राप्ति करून घ्या. जोपर्यंत तुमच्या देहाचें ममत्व सुटलें नाहीं आणि जोपर्यंत तुमचें मन विषय वासनेला विटलें नाहीं तोपर्यंत तुम्हाला खऱ्या खऱ्या सुखाची प्राप्ति कधींहि होणार नाहीं. खरोखर भक्तिविना तुमचें जिणें लाजिरवाणें आहे. इतर सारे जन्म भोगून दुर्लभ असा मनुष्य जन्म तुम्हाला अखेरीस प्राप्त झालेला आहे. तेव्हा या जन्मात सुगम संसार भोगून त्या आत्मारामाला पारखे होऊ नका. भक्तिविना तुम्हाला कधींहि मोक्षप्राप्ति होणार नाहीं.

प्रत्यक्ष अनुभवाविना मानवी संसाराचें हें असलें उदात्त तत्त्वज्ञान कोणाच्याहि तोंडातून बाहेर पडणार नाहीं. परंतु अगदीं अलीकडे नामदेवाच्या मनात पुढील विचार एकसारखे येऊ लागले होते.

या प्रपंचात कोणी कोणाचा नाहीं. जोपर्यंत आपल्याला काल अनुकूल आहे नि जोपर्यंत लोकांना आपला उपयोग होत आहे तोपर्यंतच इतर लोक आपणास विचारीत असतात. एकदा आपला उपयोग संपला, आपण लोकांच्या दृष्टीनें निरुपयोगी झालो म्हणजे तेच लोक आपला तिरस्कार करू लागतात. या जगात मनुष्य एकटा येत असतो नि अखेरीस एकटाच परत जात असतो. त्यानें जन्मभर खटपट करून मिळविलेलें द्रव्य तिजोरींत राहतें. जन्मभर जिच्यावर त्यानें प्रेम केलें नि ज्याच्यावर तिनें प्रेम केलें ती पत्नी आपला पती मेल्यानंतर फार तर त्याला दारापर्यंत पोचवायला येते, त्याचे इतर आप्तस्वकीय हे स्मशानापर्यंत त्याचा मृतदेह नेऊन सोडतात, त्याचा नश्वर देह चितेवर निजतो आणि त्याचा आत्मा मात्र एकाकी त्याच्या शरीराचा त्याग करून निजधामास जाऊन दाखल होतो. या ऐहिक जगात द्रव्य तरी माणसाला सोडतें किंवा माणूस तरी द्रव्याला सोडीत असतो.

हे सारे विचार आल्यानतर एके दिवशीं आषाढ शुद्ध एका-दशीला नामदेव पाडुरंगाकडे गेले नि त्याला म्हणाले, " महाराज, मला आपण आता समाधी घेण्याची आज्ञा द्या. कारण माझें आयुष्य आता अखेरीस आलें आहे. या आयुष्यात ज्ञानेश्वराची सगत मला लाभली. त्याच्या सगतीनें मी तीर्थयात्रा केली. अभगांचा सकल्पहि मी शेवटास नेला आहे. साऱ्या लोकाना भक्तीमार्गाला लावून भगवत्‌भक्ताच्या जन्माचें सार्थक केलें आहे. माझी आता कोणतीहि इच्छा उरलेली नाहीं. तुझ्या कृपेनें माझे सारे मनोरथ पार पडले. मला आतां तुझ्या चरणाशीं जागा मिळावी एवढीच माझी तुला विनति आहे."

एवढें सागून नामदेव थावले नाहींत. तर पाडुरगाला ते पुढें म्हणाले, " महाद्वारीं मला आपण समाधी द्या म्हणजे आषाढी-कार्तिकीला आपल्या दर्शनाला येणाऱ्या असख्य सताचे पाय माझ्या मस्तकीं लागतील नि मी धन्य होईन ' पढरी ही आमच्या वतनाची जागा आहे, तीच माझा वैकुठ आहे, आणि विठोबाचे घरीं आमची नित्य नादणूक आहे. तेव्हा त्या ठिकाणीं महाद्वाराशीं मला समाधी घेऊ द्या. आम्ही पायरीचे चिरे बनून राहू आणि संताचे पायरूपी हिरे आम्ही आमच्या मस्तकीं धारण करू. "

नामदेवाचा हट्ट कृतीविना कधीं मिटत नसतो हें पाडुरगाला पुरेपूर माहीत होतें. पांडुरगानें विश्वकर्म्यास लगेच पाचारण केलें नि चंद्रभागेच्या तीरीं महाद्वारात प्रचड मडप उभारण्याची आज्ञा त्याला दिली. सर्व देवाना निमत्रण करण्याबद्दल गरुडाला लगोलग पाडु-रगाच्या आज्ञा सुटल्या. पढरींत एकच धादल उडून गेली. एका क्षणांत महाद्वारीं दोन भव्य मडप उभारले गेले. त्या मडपाना रत्नाचे स्तभ होते नि त्या प्रत्येक स्तभावर सुदर चित्रें लावण्यांत आलीं

होती. छतास मोत्याचे घोस लावले होते नि रत्नदीपाचा लखलखीत प्रकाश सर्वत्र पडला होता. मंडपात सुगंधी वातावरण निर्माण करण्यासाठी केशर, कस्तुरीचे धूप तेथें लावले जात होते.

ही सारी सिद्धता होत आहे तोपर्यंत देव नि ऋषी आपल्या स्त्रियासहवर्तमान त्या ठिकाणीं येऊन दाखल झाले. गोप-गोपीहि आल्या. आषाढ वद्य प्रतिपदेपासून दशमीपर्यंत भोजनाचा कार्यक्रम मोठ्या थाटानें पार पडला. कोणत्याहि गोष्टीची त्या ठिकाणीं उणीव नव्हती. समृद्धीनें टचाईला पार हाकलून लावलें होतें. प्रत्यक्ष समृद्धी त्या ठिकाणीं सदेह होऊन नांदत होती असें म्हटलें तरी त्यांत कांहींच वावगे होणार नाहीं. एकादशीच्या दिवशीं उपवास पाळला गेला. द्वादशीला पुन्हा थाटाचा भोजन समारंभ झाला.

परंतु प्रत्यक्ष पांडुरंगाच्या मनाला मात्र यापैकीं एकही गोष्ट रुचत नव्हती. तो उदासवाणा बनला होता. कारण त्याचा परमप्रिय सखा लवकरच दृष्टीआड होणार होता. आषाढ कृष्ण त्रयोदशीच्या दिवशीं पांडुरंगाने नामदेवाची मुद्दाम भेट घेतली. आपली प्रिय कन्या सासरी जाणार म्हणून तिची माता जशी दुःखित होते त्याप्रमाणें पांडुरंगाची परिस्थिति झाली. नामदेवाच्या सगुण स्वरूपाचें दर्शन त्यांना आता पुन्हा कधी घडणार नव्हतें. या विचारानें त्याचा शोक अनावर झाला. पांडुरंगाने नामदेवांना कडकडून मिठी मारली नि ते मोठा गळा काढून रडूं लागले. रुक्मिणीलाहि तें दृश्य बघून आपला गहिंवर आवरता येईना. "नामदेव देहानें गेला तरी स्वरूपानें कधी जाणार नाहीं," असें तिनें पांडुरंगाला खूप सांगून बघितलें. परंतु त्याची समजूत काहीं केल्या पटेना. मग पांडुरंग रुक्मिणीला म्हणाला, "तुझें म्हणणें काही खोटें नाहीं. परंतु नामदेव हा माझा आरसा आहे; आणि त्या आरशांत माझें मुख पाहिल्या-

शिवाय मला कधीहि आनंद होणार नाही. नामदेवासारखा प्रेमळ भक्त आता पुन्हा कधी होणार नाहीं ! ”

मग नामदेवानीं मानवी देहाचें नश्वरत्व सांगून रुक्मिणी माते-जवळहि समाधीची अनुज्ञा मागितली; आणि तिनेंहि ती मोठ्या कष्टानें दिली. नंतर पूजादि समारंभ पार पडले. प्रत्यक्ष पांडुरंगानें नि शंकरानें नामदेव महाराजांची पूजा केली. मग इतर ऋषिमुनींनीं केली असल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं. हा समाधी सोहळा बघण्यासाठीं आकाशात देवांच्या विमानांची दाटी झाली. गंधर्वांचें गायन नि अप्सरांचे नाच प्रारंभित झाले. नामदेवांवर उधळण्यासाठीं इतर पूजासाहित्य नि कल्पवृक्षाचीं फुलें सिद्ध ठेवण्यात आलीं.

अखेरीस पांडुरंगाला नि इतर उपस्थितांना आदरपूर्वक वंदन करून नामदेव समाधीस्थलाकडे निघाले. भक्तमंडळींचा अफाट समुदाय त्याठिकाणीं जमला होता. हरिनामाचा गजर दशदिशा भरून गेला; इतकेंच नव्हे तर त्या पवित्र नामगजराचा शोध करीत करीत दशदिशा त्याठिकाणीं धावून आल्या. पताका फडकू लागल्या. टाळमृदंगाच्या ध्वनीनें सारें वातावरण ध्वनिमय बनून गेलें.

पायरीसमीप आल्यानंतर नामदेवांनी पांडुरंगाचे पाय घट्ट धरून ठेवले ते बराच वेळ सोडलेच नाहीत. पांडुरंगाच्या पायाला नाम-देवाच्या भावरूपी अश्रूंचा अभिषेक झाला. मग नामदेव पुन्हां उठले. पुन्हा त्यानीं सर्व संतांचा अखेरचा निरोप घेतला. नामदेव पायरीखालीं चालले तेव्हा विमानांत बसलेल्या देवानीं नि ऋषींनी त्यांचेवर पुष्पवृष्टी केली. त्यावेळीं नामदेवाचें रूप प्रत्यक्ष पांडुरंगासारखें भासूं लागलें. मग पांडुरंगाकडे वळून नामदेव म्हणाले, “ देवा, मी तुम्हाला मित्र समजून तुमच्याशीं अधिक सलगी केली. तुम्हांला उणेंअधिक बोललो याबद्दल आपण मला क्षमा करा. माझे सारे अपराध

घोटात घाला. " मग जमलेल्या सर्व संतांचीहि त्यानीं तशीच क्षमा मागितली. त्यावेळीं संताचे कंठ दाटून आले नि पांडुरंगाचे डोळे पाणावले.

नामदेव आता समाधीस्थलाकडे जाणार इतक्यात मोठा हुंबरडा फोडीत नामदेवाचे वडील दामशेटी, आई गोणाबाई, पत्नी राजाबाई, बहीण आऊताई, दासी जनाबाई, त्याचे सारे पुत्र नि त्याच्या बायका ही मंडळीं त्याठिकाणीं येऊन दाखल झाली. त्या साऱ्या मंडळींनीं नामदेवाच्या बरोबर समाधी घेण्याचा आपला मनोदय व्यक्तविला. नामदेव संकटात पडले. पण पुन्हा त्याच्या सहाय्यास पांडुरंग धावून आला. अगदीं अखेरच्या क्षणापर्यंत आपल्या या प्रिय सख्याला सहाय्य देण्याचा जणू त्यानें निर्धार केला होता. नामदेवाच्या बरोबर इतर सर्व मंडळींना समाधी देण्याचें पांडुरंगानें मान्य केलें नि सर्वांना नामदेवाच्या शेजारीं समाधीस बसण्यास सांगितलें.

अखेरचा क्षण आतां जवळ येत चालला होता. विठ्ठल-नामाचा गजर करीत नामदेव महाद्वाराच्या पायरीखाली गेले. त्या ठिकाणीं दर्भाचें आसन सिद्ध होतें. समोर पाच रत्नदीप लावले होते. मध्यासनावर नामदेव बसले नि आवतीं भोंवती इतर मंडळीं बसलीं. आतापर्यंत साऱ्या कुटुंबानें रचलेल्या अभंगाच्या वह्या समोर ठेवण्यात आल्या. समाधीस्थानाकडे फक्त एकटा पांडुरंग गेला होता. त्याहि ठिकाणी नामदेवानी नि इतर मंडळींनीं पांडुरंगाची पूजा केली नि त्याच्या पायावर डोकें ठेवलें. नामदेवाना अखेरचा आशीर्वाद देऊन पांडुरंग बाहेर पडला नि पायरीच्या तोंडाशीं त्यानें स्वहस्तें मोठा चिरा ठेवला. त्यावेळीं स्वर्गातून पुन्हा पुष्पवृष्टी झाली नि पृथ्वीवर नामदेवाच्या नावाचा जयजयकार झाला. अशा रीतीनें

शके १२७२ आषाढ वद्य त्रयोदशीस भक्तीचें हे मूर्तिमंत स्वरूप दृष्टीआड झालें.

नामदेवांच्या निर्याणानंतर कित्येक दिवस पांडुरंगाला आपला शोक आवरता आला नाहीं सगळीं संतमंडळीं निघून गेल्यानंतर चंद्रभागेच्या तीरावर उदासवाण्या वातावरणांत पांडुरंग एकटा बसला नि आपल्या या प्रिय भक्ताची आठवण काढून तो मनमुराद रडला. आपला शोक आवरायला पांडुरंगाला बरेच दिवस लागले. नामदेवाच्या त्या 'पायरी'वरील त्याचें लक्ष मात्र कधींहि कमी झालें नाहीं. जणूं आपली अनंत कालची दैवी दृष्टी त्या पायरीवर लावून बसलेला पांडुरंग आजही तुम्हाला दिसेल. नामदेवाच्या समाधी-स्थळाला सत्पुरुषाचे पाय लागावेत नि तें स्थळ पुनः पुन्हां पावन व्हावें यासाठी त्याच्याच इच्छेनुरूप त्याच्या समाधीवर ही पायरी बांधण्यांत आलेली आहे. परंतु त्या त्याच्या पवित्र पायरीला पदस्पर्श करण्याचा अधिकार मात्र आज कोणालाच उरलेला नाहीं. संतांची परंपरा आधुनिक काळांत खंडित झालेली आहे. मग नामदेवाच्या त्या पायरीला आपल्या पदस्पर्शानें कोण पावन करूं शकणार ? भगवान श्रीकृष्णांनी दिलेल्या निर्वाळ्यानुसार साधु-संतांचें रक्षण करण्यासाठी नि दुष्टांना निर्दाळण्यासाठी त्याचा पुनः पुन्हा जर अवतार होणार असेल तर याहि काळांत, मध्यंतरीं खंडित झालेली संतपरंपरा पुनरपि प्रस्थापित होईल आणि मग त्या संतांच्या पदस्पर्शानें नामदेवाची ती पायरी त्याच्या इच्छेनुसार पुनः पुन्हां अधिक पुनित केली जाईल. तोंपर्यंत मात्र त्या पायरीच्या रूपानें उलट नामदेवाचेच चरण-रज आपणास शिरोधार्य मानावे लागतील.

—०—

# अनाथांचा नाथ-एकनाथ : ३

आकाशवाणीचा गंभीर आवाज ऐकताच एकनाथांनी चमकून सभोंवार बघितलें. परंतु त्यांना कोणीहि दिसलें नाहीं. शिवालयाच्या बाहेर येऊन त्यांनीं सभोंवार आपली नजर टाकली. परंतु त्याहि ठिकाणीं त्यांना कोणी आढळलें नाहीं. रात्रीचा एक प्रहर उलटून गेला होता. सारें चराचर विश्व झोपलें होतें; आणि वास्तु पुरुषाच्या 'को जागर्ति' म्हणजे कोण जागें आहे या प्रश्नाला उत्तर देण्यास फक्त एकनाथच त्या ठिकाणीं जागे होते. किंबहुना त्यांची अंतर्बाह्य अशी जागृती झाली होती. परमेश्वर-प्राप्तीची त्यांना आत्यंतिक तळमळ लागून राहिली होती. केवळ एक वेळच्या नामस्मरणानें महापापी अजामिळाला प्राप्त झालेल्या परमेश्वराची त्यांच्या अंत:करणाला आस लागली होती. प्रल्हाद नि ध्रुव या दोघांना केवळ अल्पवयातच उत्कट भक्तीच्या बळावर भेटलेल्या परमेश्वराची भेट त्यांना हवी होती. नारद, अक्रुर, शुक नि सनत्कुमार यांना जशी निजस्वरूपात पांडुरंगानें भेट दिली तशा भेटीची इच्छा एकनाथांच्या मनात निर्माण झाली होती. त्यांना नुकतेंच आठवें वर्ष लागलें होतें. परंतु या अल्पवयातच फार मोठ्या साधनेची तपश्चर्या त्यांच्या पाठीमागें उभी होती. बालपणीं ज्या खेळांत वास्तविक

त्यांचें मन रमावयाचें ते सारे खेळ त्यानी केव्हाच सोडून दिले होतें. खरोखर गोट्या खेळण्याचें त्यांचें तें वय होतें. परतु त्या ऐवजीं त्या बैंदुलाच्या पाषाणाना त्यानीं परमेश्वराचें स्वरूप दिलें नि त्याची ते मोठ्या मनोभावानें पूजा करूं लागले. ज्यावेळीं त्याचे इतर सवगडी गोदातीरावर त्याचे बालपणींचे खेळ माडून बसलेले असत तेव्हा ही बालमूर्ति तास न् तास त्या पाषाणाची पूजा करण्यात गर्क होऊन गेलेली दिसे. कधीं कधी त्यानीं एकातात निघून जावें नि लटका तबोरा खाद्यावर टाकून त्या पाषाणाच्या परमेश्वरासमोर किती तरी वेळ आपल्या बोबड्या बोलानी भजन करीत राहावें. अशा प्रकारची त्यांच्या अत करणाची प्रवृत्ति या बालवयातच निर्माण झाली होती.

एकनाथाची बालवयातील ही भाविक वृत्ति पाहून कित्येकाना आश्चर्य वाटत असें. त्यांना घरीं शिक्षण देण्यासाठीं एका पुराणिक-बोवांना ठेवलें होतें. आपल्या तीव्र बुद्धिमत्तेच्या बळावर त्यानीं आपल्या या गुरुजींनाहि चकित करून सोडले परंतु वस्तुतः त्यांत चकित होण्यासारखें असें काहींहि नव्हतें. एखादी भूमी ज्याप्रमाणें विशेष तन्हेनें समृद्ध असते त्याप्रमाणें एखादा वशहि तसाच समृद्ध असतो. पर्जन्याचा नुसता स्पर्श होताक्षणींच ज्याप्रमाणें ती भूमी फुलाफळानीं बहरून जाते त्याप्रमाणें वैराग्य-वसताच्या नुसत्या स्पर्शाबरोबर तो वशहि तसाच फुलून निघत असतो. एकनाथांच्या पाठीशी अशीच उज्वल वैराग्य परपरा उभी होती. त्यांच्या कुटुबात एकामागून एक विरागी पुरुष निर्माण झाले नि ती उज्वल विरागी परपरा एकनाथाच्यापुढेहि कधी खडित झाली नाही. त्याचे पणजे भानुदास याचें नाव त्याहि काळात एका गोष्टीमुळे मोठें महशूर झालें होतें. एकदा विजयानगरच्या समर्थ राजानें पढरपूरला येऊन तेथील पाडुरंगाची मूर्ति पळवून नेली नि

त्या मूर्तीची विजयानगरला प्रतिष्ठापना केली. या प्रकारामुळें पंढरीचे भाविक भक्त मोठ्या विचारात पडले. त्याना पांडुरंगाचा विरह सहन होईना; आणि पांडुरंगाचें दर्शन होईपर्यंत पंढरीच्या दारात ठाण मांडून बसण्याचा निर्धार त्या भक्तगणानीं घोषित केला. त्यावेळीं एकनाथाचे पणजे भानुदास हे विजयानगरला गेले. नगराच्या परिसरात त्यानीं पाऊल टाकलें तत्क्षणींच पांडुरंगाच्या बंदीगृहाचीं कुलुपें आपोआप गळून पडलीं नि पांडुरंग मुक्त झाला. भानुदासानी मोठ्या समारंभाने ती मूर्ति लगोलग पंढरपूरला आणली नि भक्ताच्या स्वाधीन केली. त्यावेळीं चंद्रभागेच्या तीरावर लक्षावधि भाविकानीं भानुदासाच्या नावाचा प्रचंड जयजयकार केला. भाविक भक्ताच्या भक्ति-अश्रूनीं भानुदासाच्या पायावर अक्षरश अभिषेक झाला. पांडुरंगाची प्रेमळ मूर्ति पुनरपि देवळात जाऊन अधिष्ठित झाली, आणि त्याचवेळीं एकनाथाच्या कुटुंब-नामाचा वास्तुहि चंद्रभागेच्या तीरावर पहिल्या प्रथमच प्रस्थापित झाला. त्या दिवसापासून पंढरीचा सारा भक्तगण भानुदासाच्या ऋणात राहिला नि त्याचे गोडवे गाऊं लागला.

अशा उज्वल परंपरेच्या कुटुंबात एकनाथाचा जन्म झालेला होता. तेंव्हा अल्पवयात त्याना विरक्तीची आस लागली असल्यास त्यात कांहींच आश्चर्य नव्हतें. वृक्षाच्या जातीप्रमाणेंच त्या वृक्षाला फळ धरत असतें. "शुद्ध बीजापोटीं रसाळ गोमटीं फळेंच" निर्माण झाली पाहिजेत असा सृष्टीनियम आहे. त्यानुसार एकनाथाचें बालवयातील वर्तन घडत होतें. त्याहि वयांत त्याना मानवी आयुष्याचें खरें खुरें तत्वज्ञान पुरेपूर आकलन झालें होतें. योगवासिष्ठात सांगितल्याप्रमाणें या ऐहिक संसारात सर्व संग्रहाचा अखेरीस नाशच होत असतो. उच्च स्थितीला पोंचलेले लोकहि अखेरीस पतन

पावतात आणि संयोगाचा अंतिम परिणाम वियोग हाच असतो. या मानवी संसारातील सर्व सुखें हीं शेवटीं दु:सह दु:खेंच बनत असतात. या जगांत सुख पहावें तर अत्यल्प आहे आणि दु:ख पहावें तर अनंत आहे. अशी या मानवी संसारातील दैवगती मोठी विचित्र आहे. तेव्हा जें प्राप्त केलें असतां पुन्हा कांहीं एक प्राप्तव्य शिल्लक उरत नाहीं, असेंच पद मिळविण्याचा प्रत्येक मानवानें सतत प्रयत्न करावा मग त्यामध्यें कितीहि कष्ट पडले तरी चालतील. मात्र त्यासाठीं मनुष्यानें सारे देहबंध सोडले पाहिजेत. ' मी देहाचा कोणी नाहीं, देह माझा कोणी नाहीं व हा देह हें माझें खरें स्वरुप नव्हे, ' या भावनेनें जे परमात्म स्वरूपात स्थिर होतात, तेच उत्तम पुरुष होत. नाहींतर या जगात वृक्ष किंवा पशुपक्षी जगतच आहेत, परंतु तें जगणें खरें नव्हें. ज्याचें मन वासनाक्षयामुळें जिवंत नाहीं किंवा तत्वबोधामुळें जो मनाला तुच्छ लेखतो तोच मनुष्य खऱ्या अर्थानें जिवंत राहात असतो. सूर्याचा उदय झाला म्हणजे अपरिहार्यतेनें जसा त्याचा अस्त होत असतो त्याप्रमाणे जो प्राणी जन्मला तो आज ना उद्या निश्चित मरणारच असतो. ही गोष्ट ध्यानीं ठेवून जें जें नाश पावणार असेल त्या त्या गोष्टींची माणसानें उपेक्षा करावी.

मानवी आयुष्याचें हें महान् तत्वज्ञान एकनाथाच्या बालमनात स्थिर झालें होतें. संसार म्हणजे अनेक दु:खाची एक प्रदीर्घ मालिकाच आहे ही गोष्ट जर खरी असेल तर त्या संसारात आपल्याला सुखप्राप्ति कोठून होणार आहे ? ही गोष्ट त्याच्या बालमनानेंहि जाणली. आणि त्यामुळें एखाद्या समर्थ सिंहानें आत्मप्रतीति होताच आपला पिंजरा फोडून बाहेर पडावें त्याप्रमाणें मानवी वासनांचा पिंजरा फोडून एकनाथ त्यातून बाहेर पडले. परमेश्वर-भक्तीच्या विचारानीं त्याचें मन अक्षरश: दनकून निघालें.

त्याच्या अंतःकरणांत परमेश्वर भक्तीचा डोंब उसळला, आणि त्या-योगानें त्याच्या अंतःकरणातील नित्कृष्ट वासना जळून खाक झाल्या.

कधीं कधीं त्याच्या अंतःकरणातील हा भक्तीचा पूर ओसंडून येई आणि मग त्या पुराला बांध घालण्यासाठी ते एखाद्या दूरच्या शिवालयात जाऊन तेथें तासन् तास बसून राहात. तेथें गेल्यानंतर तेथील धीरगंभीर वातावरणात त्याच्या वृत्ति अधिकच उचंबळून येत. मग शिवालयाच्या गाभार्‍यातून लवकर बाहेर पडण्याचें भान त्यांना उरत नसे. जणू पाषाणाची ती शिवमूर्ति सचेतन बनून आपल्या या बाल भक्ताला भावी कालातील काहीं संदेश देत होती कीं कुणास ठाऊक! पैठण गावाच्या शिवेबाहेर, दूर अंतरावर एकांत स्थळीं एक शिवालय आहे. त्या शिवालयात दिवसाच्या अगर रात्रींच्या कोणत्याहि प्रहरी जाऊन बसण्याचा एकनाथाचा नित्याचा शिरस्ता होता. ज्या ठिकाणी मोठे लोक दिवसा ढवळ्या जाण्यास भीत असत त्याठिकाणीं एकनाथ मध्यरात्रींहि जाण्यास भीत नसत. त्याच्या अंतःकरणातील भक्तीनें भीतीचें पार उच्चाटन केलें होतें.

त्या दिवशी रात्रीं पहिला प्रहर उलटून गेल्यानंतर एकनाथ त्या शिवालयात असेच ध्यानमग्न स्थितींत बसले होते. त्याच्या वृत्तीची पुरेपूर एकतानता झाली होती, आणि इतक्यात त्याच्या कानावर आकाशवाणीचा आवाज पडला नि ते एकदम दचकले. त्यानीं बाहेर येऊन बघितलें. पण रात्रीच्या त्या शांत प्रहरी त्याठिकाणी कोण असणार ? शिवालयासमोर असलेला प्रचंड बिल्ववृक्ष एखाद्या तपस्व्या-प्रमाणें ध्यानमग्न स्थितीत निश्चल उभा होता. सारी सृष्टी जणू स्वरूपा-कार बनून गेली होती. मग एकनाथाच्या कानावर पडलेला आवाज कोठून आला असावा ? पुन्हा शिवालयाच्या गाभार्‍यांत परत येऊन

ते ध्यानस्त बसले. पुन्हा त्याना शब्द ऐकू आले, "देवगडावर जनार्दनपत नावाचा सत्पुरुष यवन बादशहाच्या पदरीं नोकरीला आहे. त्याला तू गुरु कर. म्हणजे तुझे इष्ट हेतु सिद्धीस जातील।"

हे शब्द जेव्हा त्याच्या कानावर पुन्हा पडले तेव्हा एकनाथाच्या मनात एक कल्पना उभी राहिली. आपण वाचलेल्या पुराणातून पुन' पुन्हा आढळून येणारी ही दैवी वाणी तर नव्हे ना? आणि ही कल्पना मनात येताच त्याचें सारें अग शहारलें अपार आनदाचे रोमाच त्याच्या उभ्या शरीरावर उभे राहिले. एक प्रकारच्या दिव्य आनदाचा पूर त्याच्या अत करणातून वाहू लागला. आपणास हवें तें मिळालें. आता आपण धन्य धन्य झालो असें त्याना वाटू लागलें. समोर असलेल्या शिवाच्या मगल मूर्तीकडे त्यानीं एकवार बघितले. एका क्षणांत आनदाश्रूंनी त्याची दृष्टी झाकाळून गेली गालावरून आनदाश्रूंचा नि अत करणातून अपार भक्तीचा पूर वाहू लागला. पुराणातून सागितलेल्या परमेश्वराच्या कथा खोट्या खचित नाहीत याची त्याना खात्री पटली, आणि समोर स्थित असलेला भगवान शंकर जणू साकार होऊन आपल्याला आशीर्वाद देत आहे असा स्पष्ट भास त्यांना होऊ लागला.

त्याच भावस्थितीत ते बाहेर आले. त्यांच्या अत करणातील आनद आंत मावेनासा झाला. आनद नि गहिंवर यांचें एकप्रकारचें चमत्कारिक मिश्रण त्याच्या हृदयात उत्पन्न झालें. एकनाथाची अत सृष्टी जरी अशा तऱ्हेनें जागृत झाली होती तरी बाहेरची सृष्टी अजून निद्राधीनच होती. एकनाथ शिवालयाबाहेर आले. त्यानीं समोरच्या बिल्ववृक्षाची साल हळुच काढून घेतली आणि बेलाच्याच काट्यानें त्यावर आकाशवाणीचा तो सदेश त्यानीं भराभर लिहून काढला.

त्या दिवसापासून एकनाथांच्या चित्तवृत्तींत एकदम कमालीचा फरक पडला. आपल्या आयुष्यातील एका फार मोठ्या प्रश्नाचा निर्णय लागला म्हणून एकीकडे त्यांच्या मनाला उत्कट समाधान वाटत होतें, तर घर सोडण्याचा प्रसंग मनात येतांच त्यांच्या पोटात भीतीचा गोळा उठत होता. आकाशवाणीला अनुसरून देवगडावर जाण्याचें एकनाथानीं ठरविलें खरें. परंतु सुखाचें घर सोडून निघून जाणें सोपें नव्हतें. त्यांच्या डोळ्यासमोर त्यांच्या आजीची नि आजोबाची मूर्ति उभी राहिली. त्यांना अशा रीतीनें एकाकी नि एकाएकी सोडून जाणें त्याना शक्य होतें काय? आपल्या आयुष्याच्या अखेरीस आलेली ती वृद्ध माणसे होती. त्यांच्या आयुष्याच्या सायंकाळीं एकनाथाच्या सद्गुणाचीं कोंवळीं किरणें त्याना सुख देत होतीं. आपलें हें पोरकें पोर आजी-आजोबाच्या हातीं देऊन एकनाथाचे वडील सूर्यनारायण नि त्यांची आई रुक्मिणीबाई हीं दोघें केव्हांच देवाघरी निघून गेलीं होतीं. एकनाथाचा जन्म शके १४५५ च्या सुमारास पैठण येथें मूळ नक्षत्रावर झाला, आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम घडला. त्यांची मातापितरें त्यांना बालपणातच सोडून देवाघरीं निघून गेलीं. तेंव्हांपासून आपल्या आजा-आजीच्या प्रेमळ सावलींत ते वाढले होते, आणि आता त्यांच्या वृद्ध आजी-आजोबाना त्यांच्या प्रेमाची सावली हवी होती. त्या दोघांचे सारे लक्ष सहाजिकच एकनाथाच्यावर केंद्रिभूत झाले होतें.

आपल्या या नातवाकडे बघून पुत्रवियोगाचें दारुण दुःख त्यानीं दृष्टीआड केले होतं. मूळ नक्षत्रावर जन्मल्याकारणानें एकनाथानीं आपल्या मातापितराचें निखदन केलें होतें तरी आपल्या कुळाचें नाव तेच उज्वल करतील ही एकच आस त्या दोघा वृद्धांच्या

अंत:करणाला लागलेली होती. तेव्हा अशा सुखी घराचा आश्रय सोडून नि त्या दोन वृद्ध देवमाणसांना दु:खसागरात बुडवून निघून जाणें ही गोष्ट एकनाथाच्या दृष्टीनें खास सोपी नव्हती. एका बाजूनें त्यांना त्यांचे हे ऐहिक पाश ओढीत होते आणि दुसऱ्या बाजूनें त्यांना त्यांचे पारमार्थिक बंध खेचित होते आणि अखेरीस त्यांच्या अंत:करणाच्या मूळ प्रवृत्तीचा विजय झाला. ते पारमार्थिक बंधनाकडे ओढले गेले.

आकाशवाणीनें आदेश दिल्याप्रमाणें देवगडावर जाण्यासाठीं एकनाथांनीं जेव्हा घर सोडलें तेव्हा त्यांच्यामागें घरांत एकच कल्लोळ उडाला. त्यांच्या आजीच्या दु:खाला पारावार उरला नाहीं. त्यांचे आजोबा तर दु:खसागरात अक्षरश: बुडून गेले. सर्व परिस्थितीचा साकल्यानें विचार केल्यानंतर एके दिवशीं ऐन पहाटें एकनाथांनीं घर सोडलें होतें. ज्या दिवशीं त्यांनीं बाहेर जाण्यासाठीं घराची कवाडें उघडलीं त्याच दिवशीं त्यांच्या घरात दु:ख घुसलें. त्याच दिवशी त्या वृद्धांच्याहि अंत:करणाचीं कवाडें उघडली व त्यांतून सुख बाहेर पडलें नि तें परागंदा झालें. जो जो मनुष्य भेटेल त्याला त्याला त्या दोघांनीं मोठ्या काकुळतीनें विचारावें, " माझा नाथ कोणी पाहिला आहे का हो सांगा ? " परंतु या त्यांच्या प्रश्नाला पैठणकरांकडून उत्तर मिळत नसें. कारण त्यांच्याहि मनात तोच प्रश्न उभा होता आणि तो कोणाला विचारावा या विचारात ते स्वत:च पडलेले होते. उभ्या पैठण गावाचें प्रेम या बाल-नाथानें प्राप्त करून घेतलेलें होतें. त्यामुळें पैठण गावाचा प्राणच जणू कोणीतरी हिरावून नेलेला होता. म्हणून नाथाचा शोध करण्यासाठीं सारा पैठण गांव सैरावैरा धावू लागला. सारीं जुनीं जुनीं देवालयें तपासलीं. भयानक दऱ्याखोऱ्या पाहिल्या. भुयारें धुंडली, खेड्यासोब-

त्याना विचारलें. गावागावातून पुसलें. गोदा नदीचें वाळवट तुड-विलें. विहिरी-विहिरींतून वेड्याप्रमाणें डोकावून बघितलें. पण "माझा नाथ कोणी पाहिला आहे का हो सांगा?" हा पैठणकराचा प्रश्न मात्र तसाच कायम राहिला. नाथाच्या ओळखीचा एक पुराणिक-बोवा होता. त्याच्याकडेहि माणसें शोधार्थ पाठविलीं. पण तो पुरा-णिक बोवाच जागेवर नव्हता. मग नाथाचा पत्ता तो कोठून सांग-णार? अशा तऱ्हेनें सारा तपास व्यर्थ ठरला, आणि सर्वांना झालेलें दु:ख मात्र खरें ठरलें.

एकनाथाचे आजी-आजोबा आधीच वृद्ध झाले होते. ते या ताज्या दु:खानें अधिकच वृद्ध दिसू लागले. त्याच्या नेत्रांचें पाणी खळेना; आणि पुढें जें खळलें तें पुन्हा त्याच्या नेत्राना मुळींच पाणी येईना. झालेल्या दु:खानें त्याचे अश्रु आटले; आणि त्याच्या अंत:करणाप्रमाणें त्याचे नेत्रहि शुष्क होऊन गेले. त्याच्यापुढें भीषण भविष्यकाळ जणू काळ-पुरुषाच्या रूपानें उभा राहिला.

परंतु इकडे एकनाथ मात्र उज्वल भवितव्याच्या उंबरठ्यापाशी येऊन उभे राहिले होते. पैठण गावाची वेस ओलांडीपर्यंत ऐहिक बंध त्याचा पाय मागें खेचीत होते. परंतु पैठण गांवाची वेस एकदा त्यानीं ओलांडली मात्र! त्यांचे ते सारे बंध मागेंच राहिले. जणू ऐहिक बंधांची सीमारेषा त्यानीं त्या दिवशीं ओलांडली होती; आणि पारमार्थिक पथावरील पदन्यास ते करू लागले होते. त्या मार्गांत त्याना घनदाट अरण्यें भेटलीं. पण ते भेदरले नाहींत. त्यांच्या कोंवळ्या लुसलुशीत पायाना ठिकठिकाणीं कांटे बोचले. पण ते विव्हळले नाहीत. ग्रीष्म ऋतूतील सूर्याच्या संतप्त किरणानीं त्यांची नाजुक अंग-त्वजा भाजून काढली. पण ते डगमगले नाहीत. त्याना त्यांचा रास्त मार्ग दर्शविण्यासाठीं त्यांच्या

सागातीं बिल्ववृक्षाची तीं साल होती. त्या सालीवर मजकूर लिहिला होता, " देवगडावर जनार्दनपत नावाचा सत्पुरुष यवन बादशहाच्या पदरीं नोकरीला आहे. त्याला तू गुरू कर. म्हणजे तुझे इष्ट हेतु सिद्धीस जातील!" त्याच्या ध्येय-पथावरील अखेरचा टप्पा दर्शविणारा जणू तो दीप-स्तभ होता. त्या दीपस्तभाकडे आपली सतत दृष्टी ठेवून हा बालसाधक सिद्ध बनण्यासाठीं मोठ्या धैर्यानें आपला मार्ग आक्रमित चालला होता. बालध्रुवाचें दर्शन त्याच्या अतश्चक्षूसमोर उभें होतें. भक्त प्रल्हादाची परम निष्ठा त्याच्या अत करणात जागृत होती.

आणि जेव्हा या बालसाधकाच्या हातीं त्याचें साध्य-साधन येऊन पडलें तेव्हा त्याला खरोखर परमावधीचा हर्ष झाला. आकाशवाणीचा सदेश खरा ठरला होता. देवगडावर त्याचे सद्गुरु जनार्दनस्वामी त्याच्या समोर उभे होते. त्याचा आनद गगनात मावेनासा झाला; आणि त्याना यापूर्वीच वाटणारी धन्यता या गुरु-दर्शनानें अधिकच धन्य झाली. जणूं एक भक्तवत्सल गुरु सत्पात्र शिष्योत्तमाची वाट बघत बसला होता आणि एक उत्कट भक्तीचा शिष्य एका गुरुश्रेष्ठाकडे मार्ग आक्रमीत येत होता.

एकनाथाचें बालरवीप्रमाणें दिसणारें आल्हाददायक रूप बघून जनार्दनपताना त्यांच्याविषयीं उत्कट प्रेम वाटू लागलें; आणि प्रदीर्घ तपस्येमुळें माध्यान्हीच्या सूर्याप्रमाणें दिसणारें जनार्दनपंताचें स्वरूप बघून एकनाथाना त्याचेविषयीं परमादर वाटू लागला.

सद्गुरु कृपेविना माणसाला पूर्णावस्था प्राप्त होत नसते ही गोष्ट सतत ध्यानात ठेवून एकनाथांनी एक तप भरेपर्यंत आपल्या या सद्गुरुंची उत्कट सेवा केली. ती करीत असताना त्यानीं देहकष्टाची मुळींच पर्वा केली नाही. आपल्या गुरुजींना सुख लाभावें नि तें लाभ-

त्यानंतर संतोष पावून त्यांनीं आपल्याला गुरुपदेश द्यावा यासाठीं त्यांनी अनंत देहकष्ट सोसले. गुरुसेवेंत त्यांनीं अणुमात्रहि कधीं कमी पडूं दिलें नाहीं. "तुझ्या अंगीं पात्रता आल्यानंतर तुला आपोआपच उपदेश घडेल" या गुरुच्या वचनावर त्यांनीं आपली सतत दृष्टी ठेवली. आपल्या गुरुजवळून सारें अध्यात्मज्ञान त्यांनीं संपादन करून घेतलें. चित्ताची निर्विषयता कशी राखावी या विषयींत एकनाथ निष्णात झाले. प्राणायाम कसा करावा, समाधी कशी लावावी, चित्ताची शुद्धी कशी राखावी या गोष्टीहि त्यांनीं अल्पावधींतच आत्मसात केल्या. महर्षी वाल्मिकींनीं सांगितल्याप्रमाणें अध्यात्मशास्त्र नि सत्संग यांच्या योगानें मानवी मनांत विवेक जागृत होतो, विवेकाच्या योगानें इंद्रियांना जिंकतां येतें आणि एकदा मनुष्य जितेंद्रिय बनला म्हणजे तो या सर्व दृश्य जगाच्या अत्यंताभाव अशा अनुभवाप्रत जाऊन दाखल होतो; त्याप्रमाणें गुरुगृहीं एकनाथाची स्थिति झालेली होती. एकनाथाच्या या उत्कट स्थितीचें वर्णन करतांना त्यांच्या एका श्रेष्ठ चरित्रकारानें म्हटलें आहे कीं, गुरुसेवा करतां करतां नाथांचे सारे विकार मावळले, क्षुधातृषादि प्राणधर्म सुटले, राग लोभादि रिपु त्यांचें शरीर सोडून गेले, इंद्रियें निर्वासन झालीं, काया लखलखीत झाली व अंत समाधानाचें तेज देहावर फाकलें. गुरुसेवेनें नाथ देहाभिमानशून्य झाले. अशा परम उच्च स्थितींतच त्यांनीं ज्ञानेश्वरी, अमृतानुभव नि भागवत या थोर थोर ग्रंथांचें विवरण गुरुमुखांतून ऐकलें. मग काय आधींच्याच अमृतांत नवीनच गोडी मिसळली नि तें अमृत अधिकच स्वर्गीय बनलें.

एकनाथाची ही परिस्थिति बघून जनार्दनपंतांना आपल्या या शिष्याविषयीं धन्यता वाटूं लागली. पुढें एका प्रसंगानें जनार्दनपंताच्या मनांत एकनाथाच्याबद्दल अधिकच प्रेम निर्माण झालें.

एकदा बादशहावर अकस्मात् परचक्र आलें नि दौलताबाद शहराला शत्रूचा वेढा पडला. त्यावेळीं एकनाथाचे गुरु जनार्दन स्वामी हे ध्यानस्त बसले होते. रणांगणांत शत्रु धुमाकूळ घालीत होता. त्यावेळीं जनार्दन स्वामींचें ध्यान ऐन रंगात आलें होतें. त्यामुळें समरांगणांत जाऊन शत्रूशीं दोन हात कोणी करावयाचे हा प्रश्न येऊन पडला. त्यावेळीं नाथाच्या अंगांतील स्फुरण एमदम जागृत झालें. आत्मबोध झालेल्या या सिद्धाचें लगेच सैनिकांत रूपांतर झालें. त्याच्यामधील ब्रह्म-तेजाने क्षात्ररूप धारण केलें. लगेच नाथ समरांगणांत येऊन दाखल झाले नि त्यांनीं जनार्दनस्वामींचा पोषाख अंगावर चढवून परचक्र परतविलें. तिकडे यावनी दरबारांत जनार्दनपंताची ख्याति झाली नि इकडे जनार्दनपंताच्या अंत -करणांत आपल्या या शिष्योत्तमाविषयीं परमावधीचें प्रेम वृद्धिंगत झालें.

आपला हा शिष्य गुरुपदेशाला पात्र होत चाललेला आहे अशी जनार्दन स्वामींची खात्री होऊन चुकली, आणि मग तोहि प्रसंग लवकरच प्राप्त झाला. शास्त्राज्ञेनुसार शिष्याची परीक्षा न घेता नि त्याची योग्यता न जाणता जो गुरु त्याला ज्ञानोपदेश करतो, तो गुरु चिरकाल नरकवासाचें दु ख भोगीत असतो ही गोष्ट जनार्दन-स्वामींना पुरेपूर माहीत होती म्हणून परीक्षेचा तो क्षण येईपर्यंत ते थांबले पण त्यांना फार दिवस थांबावें लागलें नाहीं.

एकदा रात्रीच्या वेळीं हिशेब तपासतांना पाव आण्याची चूक एकनाथाना कांहीं केल्या सांपडेना. उत्तर रात्र होऊन गेली. समईभर तेल फस्त झाले, असह्य ताण पडल्यामुळें नाथांचे नेत्र आरक्तवर्ण झाले, घशाला कोरड पडली, मान ताटकळून गेली आणि बसून पाठीचा कणा ढिला झाला तरी पाव आण्याची चूक सांपडेना

नि नाथाचें संशोधनहि संपेना. अखेरीस अविरत प्रयत्नांनीं ती चूक सापडली नि नाथांनीं आनंदाच्या भरात टाळ्या पिटल्या. जणू गुरुजींच्या परीक्षेला ते उतरले होते नि त्याचक्षणीं ते गुरुपदेशाला पात्र ठरले होते.

एकनाथाची ती सारी परिस्थिति जनार्दन स्वामींनी अवलोकन केली होती जेव्हा परस्पराची दृष्टादृष्ट झाली तेव्हा जनार्दनस्वामी एकनाथाना म्हणाले, " पाव आण्याची चूक शोधून काढण्यासाठीं तुझें चित्त ज्याप्रमाणें एकाग्र पावलें होतें त्याप्रमाणें ही मायारूपी चूक शोधून काढण्यासाठी तू आपल्या चित्ताची अशीच एकाग्रता कर. या क्षणिक मायावी संसार-सुखाचें ठिकाणीं आपण आसक्त होतो नि खऱ्या ब्रह्मानंदास आपण पारखे होतो. परमार्थ साधण्याकरिता संसार-त्यागाची नि अरण्यात बसून उग्र तपाचरणाची मुळीच आवश्यकता नाहीं. मोक्ष हा काहीं कोठें आकाशात, पाताळात वा पृथ्वीवर आहे असें नाहीं. तर आत्मज्ञान झाल्यानंतर मनाला जी निर्मलावस्था प्राप्त होतें तिलाच मोक्ष म्हणतात. असा मोक्ष संसारात राहूनहि संपादिता येतो. तुझ्या गुरुभक्तीचें तप आज फळाला आलें आहे आणि आता लवकरच तुला दत्त दर्शन होणार आहे."

एवढें बोलून जनार्दनस्वामींनीं एकनाथाच्या कानात ब्रह्मविद्येचा गुरुमंत्र फाल्गुन कृष्ण षष्ठीस सांगितला.

गुरुपदेशाची ती अमृतवाणी कानी पडतांच एकनाथाच्या वृत्ति नुसत्या फुलून निघाल्या. अध्यात्मविद्येचें अलौकिक भांडार त्याच्या समोर उघडें झाले. झालेला आनंद त्याच्या अंत:करणात मावेना. उभ्या त्रैलोक्याचें धनित्व त्याच्या हातीं आलें. साऱ्या देहावर रोमांचसाम्राज्य पसरलें नि आपण आज खरोखरच धन्य धन्य झालो असें त्याना वाटू लागलें. त्यानीं आपल्या गुरुजींच्या पायावर लोटा-

गण घातलें नि आनंदाश्रूंनीं गुरुचरणाना अक्षरशः अभिषेक केला.

जनार्दनस्वामींच्या अभिवचनानुसार एकनाथाना पुढें लवकरच प्रत्यक्ष दत्तदर्शनहि घडलें. दौलताबादेपासून चार मैलावर असलेल्या एका पर्वतावर जनार्दनपंतानीं आपल्या या शिष्यवराला त्याच्या नित्याच्या पवित्र तपोभूमींत दत्तदर्शन घडविलें. त्या दिवशीं गुरुवार होता. प्रातःकाळची वेळ होती. जागृत पक्षीगणाची गोड किलबिल कानीं येत होती. वनातील वृक्षपल्लवाचा नि विकासित पुष्पाचा परिमळ इतस्ततः पसरला होता. पर्वताच्या अंगाप्रत्यंगा-वरून वहाणाऱ्या निर्झराचें सुरेल संगीत कानावर पडत होतें.

अशा रमणीय समयीं त्या पर्वतावरील एका गर्द छायेखालीं एकनाथाना मलंग वेषात श्री दत्तात्रयाचें दर्शन झालें. मलंगाचें उग्र स्वरूप पाहून एकनाथांच्या उरात प्रथम थोडी धडकी भरली. परंतु थोड्याच अवधींत भगवंतानीं मलंगाचें तें उग्र रूप त्यागून प्रत्यक्ष दत्तात्रयाचें सुंदर स्वरूप धारण केलें. त्यावेळीं त्या स्वरू-पाच्या तेजानें एकनाथाचे डोळे दिपले. सहस्ररश्मीच्या सान्निध्यानें व्हाव्यात त्याप्रमाणें दशदिशा प्रकाशित झाल्या. एका हातात त्रिशूल नि दुसऱ्या हातात कमंडलू, कपाळीं कस्तुरी गंध, सतेज नेत्र नि कौपिन परिधान केलेली दत्तात्रयाची ती रम्य मूर्ति बघून एकनाथाच्या नेत्राचें पारणें अक्षरशः फिटलें. या जगतात त्याना आतां बघावयाचें असें काहीं उरलें नाहीं. अनुभवावयाचें असें काहीं राहिलें नाहीं. त्याचें अंतर्बाह्य शरीर आनंद-सागरात डुबू लागलें. दत्तात्रयाच्या त्या मनोहर मूर्तीकडे अनिमिष नेत्रानी ते नुसते बघत राहिले. त्याच्या साऱ्या वृत्ति स्थिर झाल्या. एकनाथाच्या मस्तकावर दत्तात्रयांचा हात पडला नि कानावर त्याचे शब्द पडले. श्री दत्त-महाराज एकनाथाना उद्देशून म्हणाले, " तू महापुरुष होशील.

तुझ्या अंगीं मोठें वक्तृत्व नि कवित्व बाणेल; नि त्याच्या योगानें तुझी कीर्ति दिगतीं पसरेल. तुझी भागवतावरील नि रामायणावरील टीका लोकोत्तर होईल आणि जनतेचे आचारविचार सुधारण्याचें फार मोठें यश तुझ्या पदरांत पडेल. "

दत्तात्रयानीं जणू एक रम्य भविष्यवाणी उच्चारली होती नि जनार्दनपताच्या या शिष्योत्तमाला धन्य करून सोडलें होतें. त्यानतर ती गुरुशिष्याची अनुपम जोडी पुन्हा देवगडावर येऊन दाखल झाली.

काही दिवस देवगडावर राहिल्यानतर एकनाथाना घेऊन जनार्दनपत नाशिक-त्र्यंबकेश्वराच्या यात्रेस निघाले. नाशिक क्षेत्राचें दर्शन होताच नाथाना अपरंपार आनंद झाला. पवित्र गोदातीरावरील तो मनोरम घाट, त्या घाटावर त्रिकाळ स्नानसंध्या करणारे ते तपस्वी जन, गोदेच्या पवित्र तीर्थांत स्नान करून पावन होणारे सहस्रावधी लोक नि त्या तीरावर सनातन कालापासून स्थित असलेलें श्रीरामाचें तें भव्य नि परम पवित्र देवालय, या साऱ्या गोष्टी बघून एकनाथाच्या अंत:करणाला अत्यंत संतोष वाटला. मार्गांत चद्रभट नावाच्या विद्वान गृहस्थाचा त्याच्याशी परिचय झाला. परिचयाचें रूपांतर लवकरच स्नेहांत झालें. मग त्या तिघानीं पंचवटींतील देवाचीं दर्शनें घेतलीं. नतर तीं मडळीं त्र्यंबकेश्वरीं येऊन दाखल झालीं. गोदावरीचें उगमस्थान ब्रह्मगिरी या डोंगरात आहे. त्या डोंगराला प्रदक्षिणा घालून त्या गुरुशिष्यानी निवृत्तिनाथाच्या समाधीचें दर्शन घेतलें; आणि एकनाथ त्या दर्शनानें कृतकृत्य झाले. कुशावर्तात स्नान केल्यानतर त्याना अधिकच धन्यता वाटली.

चंद्रभट याचा भागवतावर पुराण सागण्याचा अगदीं हातखंडा होता. त्याविषयी उभ्या पचक्रोशींत त्याची ख्याती झाली होती. भागवता-

सारखा महान् ग्रंथ संस्कृत भाषेंत असल्यामुळें सामान्य जनाच्या बुद्धीपलीकडचा तो ग्रंथ आहे, त्यामुळें त्या ग्रंथावर प्राकृत टीका होणें आवश्यक वाटल्यावरून जनार्दनस्वामींनी तें कार्य एकनाथावर सोंपविलें. त्यांच्या आज्ञेनुसार एकनाथांनी आपल्या गुरुसन्निध बसून आपली चतुःश्लोकी भागवतावरील प्राकृत टीका पुरी केली नि तो ग्रंथ गुरुजींना अर्पण केला. अशा रीतीनें नाथ गुरु ऋणांतून अंशतः मुक्त झाले. त्यानंतर चंद्रभटासह तीं मंडळी पुन्हा देव-गडावर येऊन दाखल झालीं. त्याठिकाणीं आल्यानंतर चंद्रभटाची जीवनज्योत अकल्पित रीतीनें पंचत्वात विलीन झाली. जणू भागवत पुराणाचा वारसा एकनाथांनी आतां उचलला आहे. आतां आपलें जीवन समाप्त करायला कांहीं एक प्रत्यवाय दिसत नाहीं, अशी कल्पना करूनच कीं काय चंद्रभटांनी आपली जीवितगंगा पंच-महाभूतांच्या सागरांत विलीन केली.

त्यानंतर एकनाथाच्या आयुष्यांतील एका तेजस्वी पर्वास प्रारंभ झाला तो प्रारंभ होण्यापूर्वी गुरुविरहाचें महान् मूल्य त्यांना द्यावें लागलें. भारताच्या पूर्वापार चालत आलेल्या परंपरेनुसार जनार्दन-स्वामींनी त्यांना तीर्थयात्रेकरितां जाण्यास आज्ञापिलें. गेली बारा वर्षे त्यांच्या गुरुसेवेंत नि गुरुसहवासांत मुळींच खंड पडला नव्हता. परंतु जेव्हां गुरुविरहाचा प्रत्यक्ष क्षण येऊन ठेपला तेव्हां नाथांना अपरंपार दुःख झालें. गुरुसहवासांत व्यतीत केलेले असंख्य सुवर्ण-क्षण त्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहिले नि त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या रूपानें ते बाहेर पडूं लागले. गेलीं कित्येक वर्षे जनार्दन-स्वामींनीं एखाद्या पोटच्या पोराप्रमाणें त्यांचें पालनपोषण करून त्यांना गुरुपदेश दिला होता. अखंड ज्ञानामृत पाजून आत्मबोधाचा परमानंद नाथांना प्राप्त करून दिला होता, आणि दुर्लभ असें

दत्तात्रयदर्शन त्याना घडविलें होतें. एकनाथाच्या आयुष्यातील गुरुचें कार्य सपलें होतें ही गोष्ट जरी खरी असली तरी होणाऱ्या विरहामुळें नाथाच्या नेत्रातून येणारें पाणी मात्र सपलें नव्हतें. ज्या वेळीं कन्येचें पितृगृहीं वास्तव्याचें कार्य सपतें त्याचवेळीं तिला माहेरचा उबरठा ओलाडावा लागतो नि सासरच्या उबरठ्यावरील माप आपल्या पदस्पर्शानें सांडावें लागतें. परतु ही गोष्ट जरी सत्य असली तरी माहेरचा उबरठा पहिल्याप्रथमच ओलाडणारी सुकन्या हसत मुखानें सासरच्या गृहात कधींच प्रवेश करीत नसते. सासरीं जाताना माहेरच्या साऱ्या गोड स्मृति तिच्या अंत करणात अपरि-हार्यतेनें दाटून येतात, तिचे नेत्र पाणावतात नि माहेरून बाहेर पडताना पुनः पुन्हा मागें बघूनच ती आपला श्वशुरगृहाचा पुढील मार्ग आक्रमित असते. एकनाथाची अगदी हीच अवस्था झाली.

परतु गुरुआज्ञेपुढें इलाज नव्हता. आपल्या अत.करणात आपल्या गुरुमूर्तीची प्रतिष्ठापना करून एकनाथ वैराग्याच्या वेषांत तीर्थयात्रेचा मार्ग आक्रमू लागले. उत्तरेकडील साऱ्या तीर्थ क्षेत्रांचें त्यानी दर्शन घेतलें. मग ते दक्षिण-तीर्थांना वदन करण्यासाठीं निघाले. जुनागड येथे जाऊन त्यानीं नरसी महंत याचेंहि दर्शन घेतलें नि नतर त्यानीं डाकुराचें प्रस्थान ठेवलें. तीर्थाटनें करीत करीत एकनाथ जेव्हा गोदातीरीच्या आसमंतात आले तेव्हा त्याना स्वगृहाचें उत्कटतेनें स्मरण झालें. स्वगृह सोडून त्याना एक तपाच्यावर कालावधी लोटला होता नि तीर्थयात्रेंतहि दोन अडीच वर्षे त्याची भ्रमती झाली होती. परतु तीर्थयात्रेचा सकल्प अपुरा ठेवून स्वगृहीं जाणें त्याना शक्य नव्हतें.

आणि म्हणून पैठणच्या परिसीमेंत आल्यानतर स्वगृहाचा मोह टाळण्यासाठी त्यानी पिंपळेश्वराच्या मदिरातच आपला

मुक्काम ठोकला नि भिक्षावृत्तीनें ते राहू लागले. त्या चिरपरिचित शिवालयात आल्यानंतर एकनाथांनीं समोरच्या बिल्ववृक्षाकडे आपली नजर टाकली. केवढा फरक पडला होता त्या बिल्ववृक्षात! किती प्रदीर्घ कालावधी मध्यतरीं लोटला होता? एका मध्यरात्रीं एकनाथांना आकाशवाणीचा संदेश याच शिवालयात मिळाला होता नि आपल्या घराचे सारे प्रेमपाश सोडून ते जनार्दनस्वामींकडे निघून गेले होते. त्यानंतर दिवसामागून दिवस निघून गेले. ऋतूमागून ऋतू पालटले. शकसख्या झपाट्यानें बदलत गेली; आणि तेराचौदा वर्षांचा प्रदीर्घ काळ मध्यतरी लोटला. या कालावधात एकनाथाच्या ज्ञानवृक्षाचा अफाट पसारा झाला होता नि असंख्य लोकांच्या अभिवृद्धीसाठीं त्याच्या ज्ञानाची सावली निर्माण झाली होती. याच बिल्ववृक्षाच्या सालीवर एकनाथांनी आकाशवाणीचा तो संदेश लिहिला होता आणि त्या संदेशानें त्यांना दीपस्तंभाप्रमाणें मार्गदर्शन केलें होतें अजूनहि असंख्य लोकांना जणू असेंच मार्गदर्शन करण्यासाठीं स्थित असलेल्या त्या प्रचंड वृक्षराजाकडे बघून एकनाथाचें अंत:करण सनातन स्मृतींनीं सद्गदीत होऊन गेलें.

याच ठिकाणीं भिक्षावृत्तीनें राहात असतांना एके दिवशीं अकस्मात् रीतीनें एकनाथाची नि त्याच्या आजोबाची रस्त्यात प्रथम भेट झाली. आपल्या नातवाचा शोध करण्याचा एकच नाद या आजोबाना लागलेला होता. अखेरीस एक दिवस त्यांची तपश्चर्या फळाला आली. वाटेतच परस्परांची भेट झाली. दीर्घ कालाच्या अंतरानें दोघांच्या पोषाखात नि वृत्तीत बराच फरक पडला होता. परंतु परस्परांचीं मनें परस्परांना ओळखीत होतीं. अदृश्य झालेला आपला नातू मी त्रिभुवनातूनहि शोधून आणीन असा जणू पैजेचा विडा चक्रपाणींना उचलला होता. त्यानुसार त्यांनी आपल्या नातवाला

खरोखरच हुडकून काढलें. नाथाची ओळख पटताच म्हातारा कळवळला नि गहिंवरून म्हणाला, "एकया, अरे मला सोडून तू कुठे रे निघून गेला होतास ? माझ्या या वयाकडे नि निराधार अवस्थेकडे तरी तू बघायला हवें होतेंस. तूं नाहींसा झालास तेव्हा भानुदासाचा वंश संपला अशीच माझी कल्पना झाली. तू गेल्यापासून हीं तेरा वर्षे आम्ही तेरा युगाप्रमाणें अत्यंत दु:खात काढलीं."

चक्रपाणींनीं नाथाना पोटाशीं धरलें नि त्याच्या मस्तकावर आपल्या आनंदाश्रूंचा अक्षरश: अभिषेक केला. मध्यतरी सरस्वतीच्या रूपानें गुप्त झालेली नाथाची जीवित-सरिता पुनरपि आपल्या कुटुंबाला येऊन मिळाली नि कुटुंब ओघात पुढें चालू लागली. घराचें घरपण पुन्हा अवतीर्ण झालें. घराच्या वास्तूला हर्ष झाला आणि आजी-आजोबाच्या दु:खाश्रूंचें आनंदाश्रूंत रूपांतर झालें.

आपल्या नाथाला फूस लावून पळवून नेलें असा एका पुराणिक-बुवावर चक्रपाणीचा प्रथम वहीम होता. त्याच पुराणिकबुवाच्या सहाय्यानें त्यांनीं जनार्दनस्वामींकडून नाथासाठी एक आज्ञापत्र आणलें होतें. वृद्ध झालेल्या आजा-आजींची पैठणात राहून सेवा करण्याचा नि गृहस्थाश्रम स्वीकारण्याचा आदेश स्वामीजींनी त्या पत्रिकेंत दिला होता. नाथांनीं ती आज्ञा शिरसावंद्य मानून तीर्थयात्रेचा पुढील बेत स्थगित केला; आणि पैठणात राहून त्यांनीं गुरुजींच्या आज्ञेनुसार गृहस्थाश्रम स्वीकारला.

एकदा गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतर नाथांनीं खरोखरच आदर्श असा संसार करून दाखविला. आदर्श संसाराची सारीं पदचिन्हें त्यांच्या संसारात पदोपदीं दिसत असत. या जगताच्या विशाल रंगभूमीवर साजरें होणारें संसार हें एक सनातन असें नाटक आहे. हें नाटक आनंदपर्यवसायी करण्यासाठीं मानवाला वेगवेगळ्या

प्रकारच्या भूमिका वठवाव्या लागतात. तशा त्या एकनाथानींहि पुरेपूर वठविल्या. या सनातन नाटकांत विश्वास नि त्याग या दोन प्रमुख पुरुष भूमिका असतात तर नीति व मन शांति या दोन प्रमुख स्त्री-भूमिका असतात. संशय नि स्वार्थ या दोन खलपुरुषाना आणि अनीति नि अशांतता या दोन खलस्त्रियाना या संसार-नाटकात थाराहि देता कामा नये. म्हणजे मग संसार-नाटकातील आनंदाचें भांडार खुलें होऊन तो संसार आनंदपर्यवसायी होत असतो असाच संसार नेहमीं आदर्श असा मानला जातो. याच उच्च भूमिकेवरून एकनाथानीं आपला संसार केला; आणि त्याच्या पत्नी गिरजाबाई यानींहि त्याना चांगलीच साथ दिली. सुरात सूर मिसळून सुरेल संगीत निर्माण व्हावें त्या-प्रमाणें त्याचें संसार-संगीत निर्माण झालें होतें. शांति-सागर एकनाथ नि शांति-सरिता गिरजाबाई यांचें पुरेपूर मीलन झाल्यामुळें त्यांच्या संसारात जिकडे तिकडे शांतीचें साम्राज्य नांदू लागलें. भुकेल्या लोकाना अन्नदान करावें नि ज्ञानपिपासू लोकाना ज्ञानदान करावें अशा प्रकारच्या दुहेरी दानाचें अविरत सत्र नाथाच्या घरात जणू उघडलें होतें. सर्व दानात सर्वश्रेष्ठ असें जें अन्नदान तें त्यानीं केलें नि त्याहीपेक्षा अतिश्रेष्ठ असें स्वस्वरूप दान तेंहि त्यानीं अनेकाना मुक्तहस्तानीं दिलें. हें दान-कार्य करीत असताना तशी जाणीव मात्र त्यानीं आपल्या अंत करणाला कधींहि होऊ दिली नाहीं. महासमुद्राला मिळण्यासाठी जाणारी गंगा आपल्या तीरावरील वृक्षाचें सहजतेनें पोषण करीत आपला मार्ग अनुसरत असते त्याप्रमाणें जातां जाता जगाचें हित करावें अशा धोरणानें ते अखेरपर्यंत वागले. आपल्या अमोघ वक्तृत्वाच्या योगानें त्यानीं अखिल विश्वाला शहाणें करून सोडलें नि आपल्या दातृत्वाच्या योगानें त्यानीं अवघ्या

विश्वाचें प्रेम नि आदर या गोष्टी संपादन केल्या. ज्याप्रमाणें त्याच्या संसारांत अन्नशांति नांदत होती त्याप्रमाणें त्याच्या देह-घर-संसारांत मन:शांति नांदत होती. त्या सद्गुणानें त्याच्याकडे कधींहि पाठ फिरविली नाहीं. त्याच्या अंत:करणांत राग उत्पन्न व्हावा नि त्याची मन:शांति ढासळावी यासाठीं अनेकानीं अनेक प्रयत्न केले. एक यवन त्याच्या अंगावर असंख्य वेळा थुंकला. एकदा त्याच्या घरीं आलेला आयाचित पाहुणा नाथांना राग आणण्यासाठीं त्याच्या पत्नीच्या पाठीवर विराजमान झाला. त्याच्या घरांत शिरून तस्करानें त्याचें धन लांबविलें. प्रत्यक्ष पोटच्या पोरानें—हरिपंडितानें एकनाथ प्राकृत भाषेंत पुराण सांगतात म्हणून त्याच्यावर गहजब केला. परंतु त्याच्या मनाची शांति कधी ढळली नाहीं. प्रत्येक वेळीं त्याच्या मनानें हाच विचार करावा कीं हे सारे अंत:करणाच्या अपूर्णावस्थेंत असलेले स्खलनशील असे मानव आहेत. तेव्हां त्यांच्यावर न रागावतां त्यांना रास्त मार्गाला आपणच लावलें पाहिजे.

पुढें एका प्रसंगानें तर त्यांच्या मन:सामर्थ्याची सर्वांना चांगलीच जाणीव झाली.

महाराष्ट्र भाषेंत त्यांनीं भागवतार्थ प्रगट केला म्हणून काशीच्या कांहीं पंडितांनी त्याचा तो ग्रंथ गंगार्पण केला. असें सांगतात कीं प्रत्यक्ष भागीरथी आपल्या करकमलावर तो ग्रंथ ठेवून जलाच्या पृष्ठभागावर अवतीर्ण झाली नि तिनें त्या ग्रंथाचें शुचित्व मान्य केलें. मग काशी क्षेत्रांत नाथाच्या त्या प्रासादिक ग्रंथाची पालखींतून मोठी मिरवणूक निघाली नि नाथाच्या नावाचा प्रचंड जयजयकार गंगातीरावर करण्यांत आला. त्याच्या त्या महान् ग्रंथावर आक्षेप आला म्हणून कधी त्याच्या मनाची शांति ढळलीं नाहीं किंवा तो आक्षेप उठून त्या ग्रंथाचें प्रासादिकत्व मान्य झालें म्हणून कधीं

हर्षानें त्याच्या मनाचा तोल सुटला नाहीं. सर्व गोष्टींकडे समाहित अंतःकरणानें बघण्याची त्याच्या मनाची प्रवृत्ति होती.

कालांतरानें त्याच्यावर काहीं कौटुंबिक आघात कोसळले. अत्यंत वृद्ध झालेले त्याचे आजोबा नि आजी हीं दोन परमप्रिय माणसें भरल्या संसारातून मोठ्या सुखासमाधानानें चालती झालीं. परंतु एकनाथांना त्यांच्या निर्याणाचें मुळींच दुःख झालें नाहीं. जणूं एका जुनाट कुटुंब वृक्षाचीं दोन जीर्ण पर्णे अनंत कालाच्या ओघांत अपाततः पतित झालीं. मानवी जीवनाला नेहमीच मर्यादा असते तशीच मर्यादा त्या उभयतांच्या जीविताना पडली होती एवढेंच !

पुढेंहि थोड्याच कालावधींत अशाच प्रकारचें समाधान मानण्याचा त्याच्यावर प्रसंग आला. त्यांचें परम दैवत जनार्दन स्वामी एका फाल्गुन कृष्ण षष्ठीस देवगडावर स्वस्वरूपीं विलीन झाले. नाथांनी ती दुःखद वार्ता ऐकली आणि त्याहिवेळीं मानवी जीवनाची मर्यादा त्यांनीं पुन्हा एकदा ध्यानीं आणली.

एकनाथाच्या या सुखी नि समाधानी संसाराला त्यांचा आप्त उद्धव यानेंहि चांगलाच हातभार लावलेला आहे. आनंदाच्या तशाच दुःखाच्या प्रसंगीं तो नाथांचा सतत पाठीराखा राहिलेला आहे.

परंतु त्याच्यापेक्षाहि प्रत्यक्ष भगवंतानें एकनाथाच्या घरीं सतत बारा वर्षें वास्तव्य करून त्यांच्या घरांत आनंदाचें साम्राज्य निर्माण केलें. श्रीखंड्याचें रूप धारण करून भगवंतांनीं नाथाघरीं कावडीनें गंगेचें पाणी भरलें आणि दासाचा दास जो श्रीहरी त्यांनीं नाथाच्या घरीं पूजेचें चंदन घासलें. हा श्रीखंड्या जसा अकस्मात् नाथांच्या घरीं आला तसाच तो अकस्मात् नाथाच्या घरांतून एकें दिवशीं निघून गेला. प्रत्यक्ष परमेश्वराची आपण बारा वर्षें सेवा घेतली ही गोष्ट पुढें

जेव्हां नाथाच्या ध्यानांत आली तेंव्हा त्यांना परमावधीचें दुःख होऊन ते ढसढसा रडले. गिरजाबाईहि त्या त्याच्या दुःखांत सहभागी झाल्या. त्या उभयतांनीं परमेश्वराचा धावा आरंभिला नि त्याचें प्रत्यक्ष दर्शन करवून घेतलें.

ज्याला याप्रमाणें परमेश्वराचा अखंड शेजार होता अशा या महापुरुषानें अखिल मानव जातीचा शतकानुशतकें उद्धार करणारे असे अनेक तेजस्वी ग्रंथ निर्माण केले. नाथाची ग्रंथ-निष्पत्ति पाहून खरोखर डोळे दिपून जातात आणि अंतःकरण अपरंपार आदरानें भरून जातें.

त्याचें भावार्थ रामायण नि रुक्मिणी स्वयंवर हे चरित्र विषयक ग्रंथ नि चतुःश्लोकी भागवत टीका, स्वात्मसुख, हस्तामलक, आनंद लहरी हे धर्मविषयक नि अध्यात्मविषयक ग्रंथ पाहून मानवी मन खरोखर थक्क होऊन जातें.परंतु या सर्व ग्रंथाचा तेजस्वी मुकुटमणी जें एकनाथी भागवत तें वाचल्यानंतर मात्र त्या ग्रंथातून वाचकाला प्रत्यक्ष परमेश्वरी साक्षात्कार झाल्याविना राहात नाहीं, आणि म्हणूनच भक्तिपंथाच्या प्रभावळींत भगवद्गीतेच्या जोडीनें बसण्याचा मान या महान् ग्रंथाला लाभलेला आहे. हा पवित्र ग्रंथ पवित्र काशी क्षेत्रांत सोमवार कार्तिक शुद्ध १५ शके १४९५ या दिवशीं समाप्त झाला; नि त्या दिवशींच्या पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राप्रमाणें त्या ग्रंथाचें अपूर्व तेज दिगंतीं पसरलें तें अजूनहि कायम आहे. याच तेजस्वी ग्रंथानें जगाला भागवत धर्म शिकविला नि तो सांप्रदाय प्रस्थापित केला.

एकनाथांनीं आपल्या भागवत ग्रंथांत प्रवर्तित केलेला भागवत धर्म हा वस्तुतः सनातन असा धर्म आहे. ज्या दिवशीं मानवी अंतःकरणांत परमेश्वराविषयीं भक्ति उदय पावली त्याचवेळीं या भागवत धर्माची प्रस्थापना झाली नि भक्तिमार्गाला प्रारंभ झाला. असें

सांगतात की, या धर्मांची सुव्यवस्थित मांडणी करून हा धर्म प्रथम नारद मुनींनीं कलियुगाच्या संधीकालांत वसुदेवाला समजाऊन सांगितला. पुढें जनक राजानें यज्ञ केला तेव्हां वृषभऋषींनीं याच धर्मांचा जनकासमोर पुनरुच्चार केला. तदनंतर श्री व्यास महर्षींनी तो धर्म शुकाचार्यांला नि शुकाचार्यांनीं तो परिक्षिती राजाला निवेदन केला. पुढें परिक्षितीचा आजा अर्जुन भारतीय युद्धाच्या वेळीं ऐन समरांगणांत हतप्रभ झाला तेव्हां भगवान श्रीकृष्णानीं याच धर्माच्या संजीवनी मंत्रानें त्याच्या अंगांत चैतन्य खेळविलें. परंतु त्यावेळेपर्यंत या धर्माचें ज्ञानभांडार केवळ देवभाषेंत बंदिस्त होतें. परंतु प्रतिपरमेश्वर ज्ञानदेव यांनीं संस्कृत भाषेचें तें भांडार फोडून त्या धर्माला पहिल्या प्रथमच महाराष्ट्र भाषेंत अवतीर्ण केलें. जणू सह्याद्रिच्या परिसरांतील एखादा गुप्त क्षीरसमुद्र फोडून त्याचेच पाट सह्य पर्वताच्या अंगाप्रत्यंगावरून ज्ञानेश्वरानीं खेळविले; आणि पुढें यावनी राज्यांत एकनाथांनीं त्या सरेला याच धर्मांच्या बळावर स्पष्टपणानें दरडावून सांगितलें कीं, " आम्ही मृत मातेचें दूध प्यायलो नाहीं. ज्ञानेश्वर माउलींनीं आम्हाला ज्ञानामृत पाजलें आहे. "

आपल्या उभ्या आयुष्यांत याच धर्मांचा प्रचार नि प्रसार कर-ण्याचें कार्य एकनाथांनीं अंगिकारिलें. त्या धर्माच्या पूर्वपरंपरेनुसार त्यांना अशा धर्मांचा प्रचार करावयाचा होता कीं ज्यामध्यें वर्ण-भेदाला वाव उरणार नाहीं नि लिंग भेदाला अवसर राहणार नाहीं. ज्या धर्मामध्यें परधर्माविषयीं द्वेष नाहीं, मात्र वेळप्रसंगीं परधर्मांशीं दोन हात करण्याचें सामर्थ्य आहे. जो लोकव्यवहार कनिष्ठापासून वरिष्ठापर्यंत अशी सर्वांची सारखीच काळजी वहात असतो त्यालाच धर्म ही संज्ञा आहे. नाथांच्या भागवत धर्मानें उच्च-नीच भाव न स्वीकारतां अशीच सर्वांची काळजी घेतलेली आहे. त्यांच्या या धर्मांत त्यामुळें निरा-

शेला कोठेही जागा नाहीं. उलट आशेचीं प्रफुल्लित कमळें या धर्मांत सदैव सर्वत्र फुललेली आढळतील. या धर्माची प्रतिष्ठापना एखाद्या व्यक्तीवर अधिष्ठित नसून महान् तेजस्वी तत्वावर तो धर्म अधिष्ठित झालेला आहे. त्यामुळेंच तो महाराष्ट्राचा अत्यंत आवडता धर्म होऊन बसलेला आहे या धर्मानें अखिल विश्वाला अशी शिकवण दिलेली आहे कीं साधूंच्या रक्षणार्थ नि दुष्टाच्या संहारार्थ पुन:पुन्हा जन्म घेणारा भगवान विष्णु तो मीच; रथाच्या ध्वजस्तंभावर हनुमताच्या रूपानें स्थित राहून प्रत्यक्ष विष्णुचें संरक्षण करणारा महारुद्र तो मीच; त्रिपुरासुराचें पारिपत्य करणारा गणपती तो मीच; विष्णु, शिव, सूर्य यांच्या पराक्रमाचें आदिस्थान जी कालिमाता तीहि मीच आणि अखिल विश्वाला प्रकाशदान करणारा सहस्ररश्मी सूर्य तोहि मीच !

नाथांच्या या भागवत धर्मानें याप्रमाणें एकेश्वरत्व शिकविल्यामुळें सर्व भांडणाचें मूळच नष्ट झालें. केवळ एकेश्वरत्वच शिकवून हा धर्म त्या ठिकाणी थांबलेला नाहीं तर उपासक नि उपास्य-दैवत यांच्यामधील भेदाभेद या धर्मानें पार नाहींसा करून टाकलेला आहे नि परमेश्वराचें सर्वव्यापकत्व सिद्ध करून दाखविलेलें आहे.

पुरुषसूक्तादी मंत्राची शास्त्रकारांनीं जी योजना केलेली आहे तिचें रहस्य विषद करून सांगताना भागवताच्या एका श्रेष्ठ प्रस्तावनाकारानीं म्हटलें आहे कीं, “ज्या देवाच्या डोक्याला तू गंध लावीत आहेस, त्या देवाचें डोकें एक नसून तो सहस्रशीर्ष आहे. ज्या देवाच्या डोळ्याकडे तू पहात आहेस, त्या देवाचे डोळे दोन नसून तो सहस्राक्ष आहे. ज्या देवाच्या पायावर तूं मस्तक ठेवीत आहेस तो देव दोन पायाचा नसून, सहस्रपाद आहे. ज्या देवाला तू देवळात एकदेशी व मर्यादित पहात आहेस, तो देव

एकदेशी व मर्यादित नसून अवघें चराचर विश्व व्यापून दशांगुळें उरलेला आहे." अशा तऱ्हेनें सर्व जग विष्णुमय आहे. यांत परमेश्वराचें सर्वव्यापकत्व सांगितलें आहे, आणि भागवत धर्माचे सारे अनुयायी तें परमेश्वरी सर्वव्यापकत्व मानतात. एकनाथानीं आपल्या महान् तेजस्वी भागवत ग्रंथांतून महाराष्ट्राच्या या आवडत्या धर्माची शिकवण जगाला दिली नि जगावर फार मोठे उपकार करून ठेवले. जोंपर्यंत मानवी अंतःकरणात परमेश्वर भक्तीची पद-चिन्हें दृग्गोचर होत राहतील तोंपर्यंत नाथाचा हा धर्म आपल्या विशाल कर्तृत्वानें तळपत राहील यांत कसलाहि संदेह नाहीं.

हा तेजस्वी ग्रंथ जगाच्या स्वाधीन केल्यानंतर काहीं वर्षांनीं या धर्माची ध्वजा घेऊन नाथ पंढरपूरला गेले. भक्तगणांचा अफाट समुदाय त्यांच्या बरोबर पंढरीला गेला. दिंड्या पताका हातांत घेऊन विठ्ठलाचें भजन करीत एक विशाल मानवी सागर जेव्हा पंढरपूरला येऊन दाखल झाला तेव्हा तेथील सहस्रावधी नागरिकांनीं त्या मेळाव्याचें प्रचंड स्वागत केलें. हरिनामानें सारी पंढरी नादित झाली एवढेंच नव्हे तर तो नाद पृथ्वीचे दिक्कोन फोडून त्रिभुवनात पसरला. त्यावेळीं नाथानी लोकाग्रहास्तव आपले पणजोबा भानुदास यांचें चरित्र-कीर्तन केलें. तें ऐकत असताना पंढरीची भूमि भाविकांच्या भावाश्रूंनीं न्हाऊन निघाली. आतापर्यंत नाथानीं अनेक तीर्थक्षेत्रें बघितलीं होती. परंतु पंढरपूर हें भूवैकुंठ आहे अशी त्यांची खात्री पटली. त्यांची रसाळ वाणी त्या क्षेत्रात अधिकच पावन झाली. तेथील गरुडध्वजावर दृष्टी जाताच आपल्या जन्माचें साफल्य झालें असें त्यांना वाटलें. भीमातटाकीं विठ्ठलाची मूर्ति बघताच आपला जीवनौघ जणुं काहीं काळ स्थिरावला असा भास त्यांना झाला.

त्यानंतर शके १५०५ मध्यें आळंदीला जाऊन नाथांनीं ज्ञानेश्वराचें दर्शन घेतलें. असें सांगतात कीं ज्ञानदेवांनीं नाथांच्या स्वप्नात येऊन त्यांना दृष्टांत दिला नि सांगितलें कीं, "अजानवृक्षाची मुळी माझ्या मानेस लागली आहे. आळंदीस येऊन तू ती काढ."

त्यानंतर असंख्य भक्तगणांसह एकनाथ आळंदीला आले; आणि थटदाट वृक्षराजीमध्यें जाऊन त्यांनीं ती मुळी दूर केली नि ज्ञानेश्वरांना त्या त्रासातून मुक्त केलें. समाधीद्वार उघडून नाथ जेव्हां आंत शिरले तेव्हां ज्ञानेश्वरमहाराज वज्रासन घालून बसले होतें. त्यांचें तें दिव्य स्वरूप अत्यंत तेज:पुंज दिसत होतें.

ज्ञानेश्वरीचा जनतेंत प्रसार करण्याची आज्ञा ज्ञानेश्वरांनी नाथांना दिली. आधींच सिद्ध बनलेले एकनाथ ज्ञानेश्वरांच्या या दर्शनानें धन्य झाले नि त्यांच्या आज्ञेनुसार नाथांनीं ज्ञानेश्वरीची प्रत संशोधून ती सुधारली व जनतेंत त्या महान् तेजस्वी ग्रंथाचा पुष्कळ प्रसार केला.

त्यानंतर नाथांनीं आपला 'भावार्थ रामायण' हा अखेरचा ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. त्या ग्रंथाची पहिली पांच कांडें व पुढील कांहीं अध्याय त्यांनीं लिहिले; आणि त्यांचा अखेरचा क्षण समीप आला. मग लिहिण्याचें काम थांबलें. आपला वेडसर शिष्य गावबा याच्या हातीं तो ग्रंथ संपविण्याचें कार्य सोंपवून ते अखेरच्या मार्गाची वाटचाल करूं लागले.

एके दिवशीं त्यांना थोडीशी ग्लानी आली. यापेक्षा दुसरें कांहींहि घडलें नाहीं. पण मृत्युची ती चोरटी चाहूल त्यांनीं तात्काळ ओळखली. त्या दिवशीं त्यांनीं उद्धवासह सर्वांना सांगितलें कीं, "माझा प्रयाण-काळ नजिक आलेला आहे. उद्या प्रात:काळीं

गोदातीरावरील वाळवटात माझे कीर्तन होईल नि नंतर दुपारी दोन प्रहरीं आम्ही आमच्या देहाचा त्याग करू. ”

हें वृत्त ऐकताच सारे लोक शोकाकुल होऊन गेले. एका क्षणात ही वार्ता पैठणच्या परिसरात पसरली, आणि त्या क्षणापासून लोकांचे थवेच्या थवे या महापुरुषाचें अखेरचें दर्शन घेण्यासाठी लोटू लागले. सारें पैठण शहर लोकांनी अगदीं गजबजून गेलें.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं गोदातीरावरील भव्य वाळवटात नाथाचें कीर्तन आरंभित झालें. त्यावेळी ते धूत वस्त्र नेसले होते, गोपीचंदनाचे टिळे त्यांनी आपल्या कपाळीं लावले होते नि गळ्यात तुळशीमाळा घातल्या होत्या. त्यांच्या तोंडातून कीर्तनातील शब्द बाहेर पडू लागले. नि लोकांच्या नेत्रातून अश्रू ओघळूं लागले. थोड्याच वेळात जिकडे तिकडे एकच आक्रोश ऐकू येऊ लागला,- “ नाथ, आम्हाला मागें टाकून तुम्ही कुठें हो चाललात ? ”

परंतु लोकांच्या त्या आक्रोशानें एकनाथाचें मन मात्र मुळीच विचलित झालें नाहीं. पर्जन्याच्या धारा नभांगणातून कोसळल्या म्हणजे पृथ्वीवर येऊन पडण्याविना त्यांना अन्य गतीच नसते त्याप्रमाणें मानवी जीवित एकदा आरंभित झालें म्हणजे अपरिहार्यतेनें त्याचा अंत हा होतच असतो ही गोष्ट त्यांना माहीत होती. आकाशातील वीज किंवा शरदऋतूतील मेघ यांची ज्याप्रमाणें शाश्वती नसते त्याप्रमाणें मानवी जीवित हें अशाश्वत आहे ही गोष्ट त्यांच्या चांगलीच परिचयाची होती. अनंत काळची तपस्या त्यांच्या पाठीशीं उभी असल्यामुळें त्यांचें अंतःकरण निर्वात ठिकाणी ठेवलेल्या दीप-ज्योतिप्रमाणें अखेरच्या क्षणापर्यंत अगदी स्थिर होतें. त्यामुळे इत-रांचे दुःखाश्रू त्यांना दिसले नाहींत किंवा त्यांचे उसासे नाथाच्या कानापर्यंत येऊन पोंचलें नाहींत आपल्या उभ्या आयुष्यात केवळ

सद्गुणाचीच पूजा त्यानीं बाधली होती; अध्यात्मश्रवणाचें प्रेम त्यानी बाळगलें होतें आणि सत्याचें व्यसन त्यानी स्वत ला लावून घेतलें होतें. अशा परिस्थितींत या अखेच्या क्षणीं इतर सामान्य माणसाप्रमाणें व्याकूळ होण्याचें वा घाबरून जाण्याचें त्याना काहींच कारण नव्हतें. त्यानीं शांत चित्तानें कीर्तनाला प्रारंभ केला त्या कीर्तनात मध्यतरीं ते पुरेपूर रगले नि अखेरीस समाहित अत करणानें त्यानी तें पुरें केलें. कीर्तनानतर आरती करण्यात आली. मग खिरापत वाटली गेली. जमलेल्या लोकानीं त्याच्यावर बुक्का नि फुलें उधळलीं. त्यानतर विठ्ठलनामाचा गजर करून मद मद पावलें टाकीत नाथानी गगेंत पदार्पण केलें. पाण्यातून ते पुढे पुढे चालले. मग जमलेल्या सर्व लोकाकडे त्यानीं एकवार बघितलें नि आपले दोन्ही हात जोडून ते त्याना म्हणाले, " आता आम्हावरती सर्वांनीं कृपा असो द्यावी. " असें म्हणून गगेच्या विशाल पात्रात त्यानी प्रवेश केला. " चालले आम्हाला सोडून नाथ निघाले! " असे लोकाचे दुःखोद्गार निघत असतानाच नाथानीं मुखातून " जय-जनार्दन " अशी प्रचड गर्जना केली आणि बघता बघता नाथाचा तो तेज.पुज पवित्र देह गोदा मातेच्या उदरात क्षणार्धात गडप होऊन गेला. अनाथाचा नाथ निघून गेला नि लोक अनाथ झाले. नाथ दृष्टीआड झाल्यानतर मागे राहिलेल्या लोकानीं गोदातीरींच्या वाळवटावर अश्रूचा सडा शिंपडला नि तें वाळवट त्याच्या त्या दु.खाश्रूनीं धुवून काढलें.

अशा रीतीनें ज्या फाल्गुन कृष्ण षष्ठीस नाथाचे सद्गुरु जनार्दन स्वामी यांचा जन्म झाला, ज्या दिवशीं जनार्दन स्वामींना दत्तदर्शन घडलें, ज्या दिवशी जनार्दन स्वामींचा नाथावर अनुग्रह झाला आणि ज्या दिवशी स्वामींनीं आपला देह ठेवला, बरोबर त्याच दिवशीं

शके १५२१ च्या फाल्गुन वद्य षष्ठीस या महापुरुषानें परमेश्वराकडे प्रयाण केलें.

नाथाचा देह गंगेतून बाहेर काढल्यानंतर धर्मशास्त्रानुसार सारे और्ध्वदेहिक संस्कार उरकण्यात आले. दुसरे दिवशीं नाथाच्या अस्थि रक्षेतून गोळा करण्यासाठीं म्हणून त्याचा शिष्यपरिवार त्या ठिकाणी गेला. तेव्हा त्याच्या त्या देहरक्षेत एक तुळशीचें नि दुसरें पिंपळाचें अशीं दोन सुंदर रोपटीं दृष्टोत्पत्तीस आलीं. जणू ज्ञानेश्वरी नि भागवत या दोन महान् ग्रंथाचीं तीं दोन प्रतीकेंच त्या ठिकाणीं अवतीर्ण झालेलीं होतीं. त्या ठिकाणीं लगेच एक वृंदावन बांधण्यात आलें.

म्लेंच्छाक्रांत राज्य झाल्यानंतर गाणगापुरस्थ गुरुनाथ नृसिंह सरस्वती गंगाप्रवाहावर दिव्यासन घालून श्रीशैल्य पर्वताकडे एके दिवशी असेंच निघून गेले होते. त्याच्याहि प्रयाणानंतर गंगेच्या प्रवाहांत त्याचीं प्रसादपुष्पें वहात वहात आलीं होती. त्याच्या शिष्यांनीं तो पुष्पप्रसाद गोळा केला नि तो शिरोधार्य मानला. त्याचप्रमाणें नाथाच्या त्या शिष्यसमूहानें त्याच्या रक्षाबंधनात आढळलेलीं तीं दोन रोपटीं पवित्र मानलीं नि त्यांना वंदन केलें. या जगतात नाथसांप्रदाय जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत त्या वृंदावनाचें नि त्या दोन रोपट्याचें परमपावित्र्य कधींहि कमी होणार नाहीं !

—×—

# भक्तिमार्ग प्रदीप—तुकाराम : ४

तो एक परमेश्वरी योगायोगच होता की काय कुणास ठाऊक ! वस्तुत तुकाराम महाराजांच्या मातेला जेव्हा डोहाळे लागले तेव्हाच त्या योगायोगाचीं पदचिन्हें दृग्गोचर झालेलीं होतीं. त्यावेळीं कनकाईला विरक्तीचे डोहाळे होऊं लागले. कोणाशीं न बोलता एकांतात बसून राहावें, प्रपंचाकडे उदासीन वृत्तीनें बघावें, नामदेवाचे अभंग ऐकण्याची अनावर इच्छा व्हावी, कीर्तन ऐकत राहावें किंवा विठ्ठल मंदिरात जाऊन विठ्ठल-रखुमाईच्या प्रेमळ मूर्तीकडे टक लावून तासन् तास बघत बसावें या गोष्टींचे डोहाळे तुकोबांच्या जन्मापूर्वी कनकाईला लागलेले होते. त्यामुळें कनकाईच्या पोटीं कोणीतरी महान् वैष्णव जन्म पावणार यांविषयीं निश्चिती झाली होती. युगप्रवर्तक असे संतमहात्मे या धरित्रीवर प्रत्यक्ष अवतार घेण्यापूर्वी त्यांच्या अवताराचीं प्रसादचिन्हें अशींच दृष्टोत्पत्तीस येत असतात. प्रभु रामचंद्रांच्या अवतारापूर्वी अशींच प्रसादचिन्हें दृष्टोत्पत्तीस आलेलीं होतीं आणि भगवान श्रीकृष्णांच्या जन्मापूर्वी अशाच प्रकारच्या लोकोत्तर प्रसादचिन्हांचा आविष्कार झालेला होता. तीच गोष्ट या महान् वैष्णवाच्या जन्मापूर्वी घडली. आणि अशा तऱ्हेनें आपल्या जन्मापूर्वींच आपल्या श्रेष्ठतेच्या साऱ्या खुणा पटवून शके १५३० मध्यें इंद्रायणीच्या पवित्र तीरीं देहू येथें तुकाराम महाराज या जगतात अवतीर्ण झाले. जणू महान् वैष्णवाला साजेशी वैराग्याची सारी सामुग्री बरोबर घेऊनच ते जन्मले होते.

तुकोबाचा जेव्हा जन्म झाला तेव्हा त्याच्या घरात धनधान्य चांगल्या प्रकारें नांदत होतें. घरीं महाजनकीचें वतन होतें. त्यामुळें लोकांत चांगली प्रतिष्ठा होती. व्यापारांत चांगलीच तेजी असल्यामुळें त्याच्या घरांत धनश्रीचें वास्तव होतें. तदनुषंगानें हाताशीं चार नोकरचाकर होते. गोठ्यांतील दावणीला बरींच गुरेंढोरें होतीं; त्यामुळें धनाच्या मागून अपरिहार्यतेनें येणारे सारे भोग त्याच्या घरात नांदत होते. तुकोबाचें पहिलें लग्न त्याच्या वयाच्या चौदाव्या वर्षी झालें. परंतु अवघ्या एक वर्षानंतर त्याच्या घराला दुर्दैवानें आपली पहिली चुणूक दर्शविली. तुकोबाच्या पत्नीला दम्याची व्यथा जडली. नाईलाजानें त्याचें दुसरें लग्न करावें लागलें. तुकोबाची द्वितीय पत्नी जिजाबाई उर्फ आवळी ही पुण्याच्या अप्पाजी गुळवे नांवाच्या धनवंत सावकाराची मुलगी होती. तुकोबाच्या आई-वडिलांच्या दृष्टीनें हा नवा संबंध मोठ्या धन्यतेचा होता. यावेळीं त्याचें सारें कुटुंब एकप्रकारच्या ऐहिक सौख्याच्या शीगेला पोंचलें होतें.

आणि मग तेथूनच उतरणीला प्रारंभ झाला. तुकोबाचे वडील बोल्होबा यांच्या मनात विरक्तीच्या गोष्टी खेळू लागल्या. मुलाच्या गळ्यात संसाराची जोखड अडकवून आपण मोकळें व्हावें व हरिचिंतन करून आपल्या पार्थिव देहाचें सार्थक करावें असे विचार त्यांच्या मनांत येऊं लागले. त्यांनीं आपल्या थोरल्या मुलास बोलावून घेतलें आणि संसाराची धुरा वहाण्यास त्याला सांगितलें. परंतु त्याचा थोरला पुत्र सावजी हा यापूर्वीच विरक्त झाला होता. या ऐहिक संसाराकडे त्यांनीं केव्हाच पाठ फिरविली होती. मग नाईलाजानें बोल्होबाचें लक्ष तुकोबाच्याकडे गेलें.

केवळ पितृआज्ञा म्हणून तुकोबानी संसाराची नि घरच्या व्यापाराची ती जबाबदारी आपल्या अंगावर घेण्याचें मान्य केलें.

त्यावेळी तुकोबाचें वय फार तर चौदा-पधरा वर्षांचें असेल. त्यांना व्यापाराचा अनुभव नव्हता नि ससाराची त्यांना जात्याच गोडी नव्हती. ज्या गोष्टींशीं त्यांची कधीच ओळख नव्हती किंबहुना ज्या गोष्टींचा त्याना मनापासून तिटकारा होता त्याच गोष्टी नेमक्या त्याच्या गळ्यात येऊन पडल्या होत्या.

आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम घडला. व्यापारांत प्रत्येक वेळी त्याचा पाय मागें आला आणि ससारांत त्यांचें पाऊल कधींच पुढें पडलें नाहीं. प्रत्येक वेळीं व्यापार तोट्याचा होऊ लागला आणि संपत्तीचें साचलेलें तळें आटू लागलें.

परंतु इतकें झालें तरी तुकोबानी ससारातील नि व्यापारातील आपली तत्परता कधीं सोडली नाही. या दोन्हीहि गोष्टी त्यांच्या ओळखीच्या नव्हत्या. आवडीच्या तर नव्हत्याच नव्हत्या ! तथापि पित्याची आज्ञा आणि परिस्थितीची अपरिहार्यता यामुळें त्यानीं त्या दोन्हीहि गोष्टी करण्याचा अटोकाट प्रयत्न केला. पण अखेरीस ससारानेंच त्याच्याकडे पाठ फिरविली नि तो त्यांना पारखा झाला. हा खरोखर परमेश्वरी योगायोगच म्हटला पाहिजे !

दिवसें दिवस त्याच्या ससार-दुर्गाचे बुरुज ढासळू लागले. प्रत्येक नवा दिवस कोणत्या तरी नव्या दु.खाला जन्म देऊनच उगवावा असें घडू लागलें. तुकोबाचे वडील, त्याची आई, वडिल भावजय हीं त्यांच्या ससारातील मडळी जीवनाचें भरलें ताट अर्धवट टाकून खुशाल निघून गेलीं. या साऱ्या गोष्टी पाहून सावजीला उद्वेग आला आणि या अशाश्वत ससाराकडे पाठ करून तोहि देशाटणाला निघून गेला.

अशा तऱ्हेनें त्याचा ससार उजाड बनला. ससाराच्या त्या उजाड माळरानावरून त्यानी सभोंवती नजर टाकली तेव्हा त्याहि

ठिकाणीं त्याना तापदायक गोष्टी दिसूं लागल्या. व्यापारात त्यांचें दिवाळें निघालें होतें. त्याच्या दुकानात दिवा लागला होता. व्यापारातील त्याची पत पार नष्ट होऊन गेली होती. नवें द्रव्य मिळेनासें झालें होतें आणि जवळचें सारें सपलें होतें.

या सर्वांच्या जोडीला शके १५५१ सालीं उभ्या महाराष्ट्रात दुष्काळानें कहर उडवून दिला. कोरभर भाकरीसाठीं मुला-माणसाचा बाजार माडला गेला. झोळींत भाकरी पडली म्हणजे ती देणाऱ्याच्या पदरात मुलें पडूं लागलीं. भाकरीच्या तुकड्यासाठीं उघड उघड अशा तऱ्हेनें मानवी देहाचा बाजार आरभित झाला. मृत माणसाची हाडें वाया जाऊं न देता त्याचें पीठ होऊं लागलें नि तें भाकरीच्या पिठात मिसळूं लागलें. माणसें माणसाना खाऊं लागलीं इतकेंच नाहीं तर पिते प्रत्यक्ष आपल्या पुत्रानाच खाऊं लागले. दारो दार माणसाच्या प्रेताचा नुसता खच पडला. साराश, माणसें नि मानवता या दोन गोष्टी त्या दुष्काळात पुरेपूर नष्ट होऊन गेल्या होत्या.

ही सारी परिस्थिति तुकोबाच्या नजरेंतून सुटणें शक्य नव्हतें. कारण त्या दारुण परिस्थितीची झळ प्रत्यक्ष त्याच्या उबरठ्यापर्यंत येऊन ठेपली होती. त्याच्या सस्कारक्षम मनावर या परिस्थितीचा भयकर परिणाम झाला. बाहेर दिसणाऱ्या या असल्या गोष्टींनीं मन विटलें म्हणजे ते घरात येत. घरीं त्याच परिस्थितीचें ताट त्याच्यासमोर उभें असे. खायला न मिळाल्यामुळें त्यांच्या दाव-णीचीं गुरे केव्हाच दावण सोडून निघून गेलीं होतीं. घरात दाण्याचा एकहि कण शिल्लक नसे. अशावेळीं खाण्यासाठीं मुलें तडफडत आणि आपल्या आईचा जीव तडातड तोडीत. तेव्हा तिला वाटे कीं हीं सारीं पोरें एकदां मरून जातील तर बरें होईल. परठिकाणीं

त्याच्यासाठीं करावी लागणारी ही लाजिरवाणी याचना तरी संपेल. हा विचार आला म्हणजे ती दुःखीकष्टी होई आणि तिचे डोळे अश्रूंनीं काठोकाठ भरून येत. गुरें गोठ्याला सोडून गेल्यामुळें गोठ्यात शेणाचा अंशहि शिल्लक उरलेला नव्हता. मग घर सारवून स्वच्छ कसें राहणार? भोंवतालच्या परिस्थितीप्रमाणें घराचेंहि स्वरूप ओंगळ बनलें होतें.

आणि या सुमारासच तुकोबांच्या अंतःकरणावर एका दारुण दुःखानें प्रचंड प्रहार केला. 'अन्न' 'अन्न' करीत त्यांच्या पहिल्या पत्नीची जीवन ज्योत समाप्त झाली. त्यानंतर त्यांचा थोरला मुलगा संतोबा हाहि मरण पावला. या दारुण दुःखाच्या प्रहारानें तुकोबा अगदीं शरमिंधे होऊन गेले. ऐहिक संसारातील पुरुषार्थाचें प्राथमिक कर्तव्य जें अन्नदान त्याहि कर्तव्याला ते मुकले होते. या गोष्टीची त्यांच्या मनाला वाटणारी खंत कांहीं केल्या कमी होईना. दिवसें दिवस त्यांच्या मनातील उद्वेग वाढू लागला. त्यांच्या चित्तांत भयंकर आग पेटली. परंतु कालांतरानें त्या आगीनें हळुं हळू निराळेंच स्वरूप धारण केलें.

या उद्वेगातूनच त्यांच्या अंगीं विरक्तीचा जन्म झाला. त्यांच्या घराण्यात अनेक पिढ्यातून हरिभक्ती चालत आलेली होती. तीच त्यांनी पुढें चालू केली. सारे गृहपाश त्यांनीं तोडले. होतें नव्हतें तें सारें ब्राह्मणांना दान करून टाकलें. घरातील सावकारीची अर्धी खतपत्रें आपल्या भावाला वाटून दिली आणि आपल्या वाट्याची उरलेलीं खतपत्रें खुशाल इंद्रायणीच्या डोहात बुडवून टाकलीं. अशा तऱ्हेनें हरिभक्तीच्या आड येणाऱ्या द्रव्यपाशातून ते मुक्त झाले. हरिभक्तीची कास धरल्यानंतर लौकिक संसाराचें वाटोळें झाल्याविना कधीं राहात नाहीं. किंबहुना त्याच एका गोष्टीनें तुको-

यांचा संसार उध्वस्त झालेला आहे. तेव्हां त्यांनीं हरिभक्तीच्या नादीं लागू नये, असा अनाहूत उपदेश अनेकांनी त्यांना केला. पण तुकोबा आपल्या त्या मार्गापासून कधींहि ढळले नाहींत. ज्या धनावर नि ज्या मानवी जीवनावर आपली सत्ता चालत नाही त्या धनाची नि त्या मानवी जीवनाची कास धरण्यात कांहीच अर्थ नाहीं, ही गोष्ट त्यांनीं तेव्हांच ताडली. या जगतात केवळ प्रारब्धाच्या योगानें धन जोडलें जातें; प्रारब्धाच्या योगानें माणसाला मानमान्यता मिळत असतें, सुख दुःख या गोष्टी देखील त्याच प्रारब्धाच्या हातीं असतात. किंबहुना हें सारें मानवी जीवितच प्रारब्धाच्या हातीं असतें, या गोष्टी तुकाराम महाराजांना केव्हांच कळून चुकल्या होत्या. त्यामुळें लोकांनीं केलेला कोरडा उपदेश त्यांनीं मानला नाहीं नि आपली हरिभक्ति त्यांनीं कधीं सोडली नाहीं.

तुकाराम महाराजांनीं संसाराचा प्रत्यक्ष त्याग कधींच केला नाहीं. सारें मानवी जीवित प्रारब्धाच्या हातीं आहे ही गोष्ट एकदां मान्य केल्यानंतर केवळ दैववशात् अंगावर पडलेला संसार हा देखील त्या प्रारब्धाचाच एक अपरिहार्य असा भाग आहे ही गोष्ट त्यांना पुरेपूर माहीत होती त्यामुळें संसाराचा प्रत्यक्ष त्याग करून जाणें त्यांना केव्हांहि शक्य नव्हतें. पण दुसरी एक गोष्ट त्यांच्या हातीं होती. संसारांत राहून ते परमार्थ करू लागले. मात्र त्यांनीं संसाराची आसक्ती पार सोडली आणि परमार्थावर ती आसक्ती जडविली. एखाद्या कमलपत्रानें जलाशयात आपला संसार थाटावा त्याप्रमाणें निरपेक्षतेनें नि निर्लेप स्थितींत त्यांनीं आपला संसार थाटला; आणि संसारातील साऱ्या गोष्टींचा भार त्यांनीं प्रारब्धावर खुशाल टाकून दिला.

संसाराविषयीं तुकोबाच्या मनांत जेव्हां ही अनासक्ति निर्माण झाली तेव्हां त्याचें मन थोडेंसें स्थिर होऊं लागलें. संसारांतील संकटांच्या तुफानानें अंतर्बाह्य ढवळून निघालेला त्याचा मन सागर हळुहळू शांत होऊं लागला. मानवी जीवनाचें अंतिम ध्येय जें परमेश्वराचें सख्यत्व यासाठी कांहींतरी त्याग हा करावाच लागतो. प्रल्हादानें हरिभक्तीसाठीं प्रत्यक्ष आपल्या पित्याचा त्याग केला तेव्हांच लाकडी स्तंभांतून नरसिंहाचा अवतार झाला. बालध्रुवानें हरिभक्तीसाठीं रान धुडविलें तेव्हांच त्याला भगवत्प्रसादानें अढळपद प्राप्त झालें. धर्मात्मा बिभीषण यानीं चौदा चौकड्याचा धनी जो रावण त्या आपल्या बंधूचा त्याग केला तेव्हांच लंकेचें धर्माधिष्ठित सिंहासन त्याच्या हातीं आलें. भरतानें प्रत्यक्ष राज्यलक्ष्मीचा त्याग केला म्हणूनच परमात्मा भगवान श्रीराम यानी त्याला वंदन केलें. या साऱ्या गोष्टी तुकाराम महाराजांच्या दृष्टीसमोर होत्या.

हरिचरणाची प्राप्ति हाच परम धर्म आहे आणि दुःख निवारण्याचें तेंच एकमेव साधन आहे, ही गोष्ट त्याच्या मनानें पक्की केल्यानंतर ते लगेच परमेश्वर प्राप्तीच्या मार्गाला लागले. आतापर्यंत अनुभवलेल्या अनेक दुःखामुळें वर्षा ऋतुपूर्वी तप्त होणाऱ्या भूमिप्रमाणें त्याची मनोभूमी तप्त झालेली होती. त्या भूमीवर आता हरिभक्तीचा पाऊस पडणार होता आणि मग त्या भूमीमधून हरित तृणांकुराप्रमाणें प्रत्यक्ष हरिजन्म होणार होता.

अशा तऱ्हेनें तुकाराम महाराज जेव्हां परमार्थाच्या उंबरठ्यापाशीं येऊन दाखल झाले तेव्हां तो प्रांत त्यांना ओळखीचा वाटूं लागला. वस्तुतः त्याच प्रांतांत सततची वस्ती करण्यासाठीं त्याचा जन्म झालेला होता. परमार्थाचा व्यापार नि परमार्थाचाच संसार करण्यासाठीं जणू त्याचा अवतार झालेला होता. तें अवतार कार्य

समोर येताच त्याना परमावधीचा हर्ष झाला. विश्वप्रयत्न करून लौकिक ससाराचें यश त्याच्या पदरीं पडलें नव्हतें तरी पारमार्थिक ससाराच्या यशाची वाटचाल ते करू लागले.

त्या ससारातील सखा जो एकातवास त्याला त्यांनीं प्रथम जवळ केलें. सकाळी उठून स्नान नि पूजाअर्चा आटोपून ते भाम-नाथ, भंडारा किंवा गोराडा यापैकीं कोणत्या तरी डोंगरावर जाऊन बसत. त्याठिकाणीं बसल्यानंतर मग त्याचें पाडुरगाचें ध्यान सुरू होई. त्या ध्यानांत ते तास न् तास रगून जात. याच एकातवासात त्यानी ज्ञानेश्वरीची नि नाथभागवताची असख्य पारायणें केलीं. रात्र पडली नि सारी पृथ्वी अंधकारात बुडाली म्हणजे तुकाराम महाराज घरीं येत आणि देवळातील कीर्तनरगांत सामील होत. त्याचा शास्त्रसमत युक्ताहारविहार असल्यामुळें निद्रा किंवा आळस याच्या आहारीं ते कधींच गेले नाहींत. त्यामुळें रात्रीं थोडी निद्रा घेतल्यानतर ते पुन्हा नामस्मरणात दग होऊन जात. निद्रावस्थेंत देखील अतःकरणाच्या अवकाशातून अविरत नामस्मरण सुरुच असें. जणू अखड जपयज्ञ त्यानीं आरभित केला होता. पहाटे पूर्व दिशा तांबूस झाली म्हणजे स्नान नि पूजाविधी उरकल्यानतर एखाद्या डोंगराचा आश्रय करून त्याठिकाणी एकातात त्याचें नामस्मरण पुन्हा सुरु होई हा त्याचा नित्याचा परिपाठ झालेला होता. एकातवास हा जणू त्याचा परमप्रिय सखा झाला होता आणि अखड नामस्मरण हा जणू त्याचा देहधर्म बनला होता.

या त्याच्या एकातवासाचें वर्णन करताना त्यानी स्वतःच असें सागितले आहे कीं, नाना प्रकारचे वेल नि वृक्ष, वनात वावरणारे वनचर आणि सुस्वर कठानें गायन करणारे पक्षी हे आमचे सगे-सोयरे झालेले आहेत. त्यामुळें आम्हाला हा एकातवास फार

सुखाचा वाटतो. याठिकाणीं कोणताहि गुणदोष आपल्या अंगी लागत नाहीं. वर असलेलें अनंत आकाश हा मंडप आहे व ही धरित्री हें आमचें बसण्याचें आसन आहे. जेथें आमचें मन रमतें त्याठिकाणीं आम्ही क्रीडा करतो. गोधडी व कमंडलू हीं आमच्या देहरक्षणाचीं साधनें आहेत वाहाणारा वारा आम्हाला वेळ कळवितो. हरिकथेच्या भोजनाची रुची एका पंक्तीनें बसून आम्ही अनेक प्रकारानीं घेतो. एकांतामध्यें आम्ही आपल्याच मनाशीं संवाद करतों.

तुकाराम महाराजाचें हें एकांताचें नि नामस्मरणाचें व्यसन दिवसें दिवस वाढतच चाललें या गोष्टीचा त्याच्या संसारावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं जिजाईला या गोष्टीचा उपसर्ग होऊं लागला घरात चार खातीं तोंडें होती. माणसानें परमार्थ केला तरी दुपारची वेळ ही रोज होतच असते आणि त्यावेळीं माणसासमोर पोटापाण्याचा प्रश्न उभा राहात असतो. स्वत. तुकाराम महाराजाची भूक नि तहान हरिभक्तीनें खाल्ली होती तरी घरीं त्याची पत्नी आणि मुलें भुकेली होतीं. त्याच्या खाण्या-पिण्याची मुळींच व्यवस्था नसे.

परमेश्वरावर सारा भार टाकून अयाचित वृत्तीनें राहिल्यानंतर देवाचे देह देवच सांभाळतो. आम्हाला ज्या वेळेस काहीं संकट येईल त्यावेळेस हे देवा, आम्ही तुझ्या चरणाचें स्मरण करून मोठ्यानें हंबरडा फोडू. आम्हांला काही तहान-भुकेची पीडा झाली किंवा अन्य दु ख झालें तरी तुझा आठव करू. हें तुकाराम महा-राजाचें तत्वज्ञान जिजाईला प्रत्यक्षात कधींच उपयोगी पडत नसे. हरिभक्तीचा मार्ग पत्करल्यानंतर धनोत्पादनाचे सारे मार्ग तुकोबानीं केव्हाच बंद करून टाकले होते. इतकेंच नव्हे तर घरीं

चालून आलेलें वैभव त्यानीं अनेक वेळा नाकारलें होतें. त्यानीं द्रव्याचा अक्षरशः विटाळ मानला. या महावैष्णवानें द्रव्य गोमासासमान लेखलें. पुढें प्रत्यक्ष शिवाजी महाराजानीं त्याना वैभव देऊ केलें. त्यावेळींहि तुकाराम महाराजानीं जी वैराग्यशील वृत्ति दर्शविली ती त्याच्यासारख्या महान् विष्णुभक्तालाच शोभेल अशी होती. त्यानीं शिवाजी महाराजाना स्पष्टपणानें सांगितलें कीं, दिवट्या, छत्री, घोडे, हें ऐश्वर्य चांगल्यापैकीं नव्हे आम्ही हें वैभव डुकराच्या विष्ठेप्रमाणें मानतो. कारण उभ्या त्रैलोक्यातील अपार ऐश्वर्याचें आम्ही धनी आहोत. सोनें आणि माती आम्ही सारख्याच मोलानें मापतो. कारण आमच्या ओटीवर प्रत्यक्ष श्रीहरी—त्या ऐश्वर्याचे धनीच येऊन बसलेले आहेत.

तें कांहीं असलें तरी तुकाराम महाराजांच्या या विरागी वृत्तीचा जिजाईला मनस्वी जाच झाला. भुकेनें तडफडत असलेलीं नागडीं-उघडीं पोरें घरांत बघितलीं म्हणजे तिचा संताप अनावर होई. ती आपला राग तुकोबांच्यावर काढी. पण तुकोबा केव्हांच शांतिरूप परब्रह्म होऊन गेले होते. त्यांच्यावर या गोष्टींचा परिणाम कधींच घडत नसे. मग ती आपलें गाऱ्हाणें पांडुरंगाकडे घेऊन जाई. परंतु पांडुरंगाला असलीं गाऱ्हाणीं ऐकण्याची आता सवय झाली होती. नामदेवाच्या मातेनें नि पत्नीनें तेंच केलें होतें. परंतु नामदेव पांडुरंगमय होण्याचें त्यामुळें राहिलें नव्हतें. तुकाराम महाराज हे नामदेवाचेच अवतार होते आणि नामदेवाचेंच अपुरें कार्य त्याना पुरें करावयाचें होतें. त्यामुळें पांडुरंग ही गोष्ट जाणून होता कीं, ही इतिहासाची पुनरावृत्ति होत आहे. राजाईनें जें केलें, गोणाईनें जें केलें तेंच आता जिजाई करीत आहे. फक्त स्थल काल-व्यक्ति या गोष्टी बदललेल्या आहेत एवढेंच ! त्यामुळें जिजाईची गाऱ्हाणीं

७७०५



वाऱ्यावर विरून गेली. पांडुरंग देवळात राहिला. तुकोबा नाम-स्मरणात दंग राहिले आणि जिजाई मात्र आपली उघडी नागडी भुकेली मुलें बघत आपल्या उजाड संसारांत आदळआपट करीत राहिली. ही आदळआपट करण्यात वास्तविक तिची कोणतीच चूक नव्हती. किंबहुना तुकाराम नि जिजाई यांच्या रूपानें त्यांच्या संसारात दोन भिन्न प्रवृत्तींचा लढा निर्माण झालेला होता. तुकाराम निवृत्तीपर होते तर जिजाई प्रवृत्तीपर होती. सतत संघर्ष होऊन-देखील दोघांनीहि आपल्या वृत्ति कधीं सोडल्या नाहीत. दोन भिन्न दिशांनीं वहात जाणाऱ्या प्रवाहाचें ज्याप्रमाणें कधीच मीलन घडत नसतें किंवा घडलेंच तर अंतिमावस्थेंत महासागराला मिळताना तें घडतें त्याप्रमाणें तुकाराम नि जिजाई यांचें झालें होतें.

या आपल्या परस्पर विरोधी वृत्ति टिकविण्यासाठी दोघानाहि अपार कष्ट पडले. रात्रंदिवस संसाराची काळजी वाहून देखील जिजाईला आपला संसार उभा करता येईना आणि ध्यानीं पांडुरंग, मनी पांडुरंग, जागृतीस्वप्नी पांडुरंग करून देखील तुकाराम महारा-जाना आपल्यासमोर प्रत्यक्ष पांडुरंगाला उभा करता येईना. त्यानीं स्वत:च म्हटल्याप्रमाणें काहीं एका सिद्धीच्या बळावर प्रचंड पर्वत सुवर्णाचे करता येतील. रानातील सर्व वृक्षाचें कल्पतरूत रूपांतर करता येईल. दगडधोंडे सोन्याचे बनविता येतील. पण पांडुरंगाचे चरण प्राप्त होण्याला फार कठीण आहेत. एकवेळ अमृतानें समुद्र काठोकाठ भरता येतील. गंगादि नद्याहि त्याचप्रमाणें भरता येतील. यमदंड घेऊन आलेल्या प्रत्यक्ष मृत्युला मागें सारता येईल. माण-साला त्रिकालदर्शन सुलभतेनें एकवेळ घडू शकेल. अष्टमहासिद्धी नि सकळ ऐश्वर्य आपलेसें करून घेता येईल. स्थान व त्याचें मान

आदिकरून योगाचिन्हें करून येतील व प्राणवायु ब्रह्मांडास नेता येईल. पण पांडुरंगाची प्राप्ती मात्र सुलभतेनें कधींच होणार नाहीं.

परंतु एकदा आरंभिलेला उद्योग तुकाराम महाराजानीं कधींच सोडला नाहीं परमेश्वर साधनेचे सारे मार्ग त्यानीं हाताळले. परमेश्वर सेवा घडावी म्हणून देवाचें भंगलेलें देऊळ बांधलें, व्रतवैकल्यें केलीं; अनेक पवित्र धर्म ग्रंथाचें त्यानीं वाचन नि मनन केलें, संत वचनावर परम विश्वास ठेवला, नामस्मरण तर सतत चालूच होतें, कीर्तनांत कधीं खंड पडला नाहीं आणि ध्यानधारणा करण्यास कधीं ते चुकले नाहींत. अनेक संतानीं आपल्या चरण-धूलीनें नि वास्तव्यानें पावन केलेल्या अनेक तीर्थक्षेत्राचें त्यानीं दर्शन घेतलें. ज्ञानेश्वराच्या चरणीं त्याची अपार निष्ठा असल्यामुळें देहू नजिकच असलेल्या आळंदी क्षेत्रीं त्याचें सतत जाणें येणें असे. त्र्यंबकेश्वरीं जाऊन त्यानीं निवृत्तिनाथाच्या समाधीचें दर्शन घेतलें. पुणतांब्यास जाऊन चांगदेवाच्या समाधीचें नि पैठणास जाऊन नाथाच्या समाधीचें दर्शन घेण्यास ते विसरले नाहींत. काशी, गया नि द्वारका या पवित्र क्षेत्रांना देखील त्यानीं वंदन केलें. पृथ्वीवरील साक्षात् वैकुंठ जें पंढरपूर याठिकाणीं तर त्याच्या घरचीच वारी होती, ती त्यानीं पुढें चालविली. संसार हा केवळ मनाच्या कल्पनेचा पसारा आहे नि त्या संसारांतील सुखदु:खें हीं त्या कल्पनेचीं फळें आहेत म्हणून त्यानीं कमालीचा मनोनिग्रह केला. चित्त शुद्धीचे जे जे उपाय होते ते ते सर्व त्यानीं करून पाहिले. मन हें ओढाळ गुरूसारखें असल्यामुळें त्याला विवेकाच्या दावणीला बांधण्यासाठीं अपार कष्ट सोसले. त्यासाठीं आपल्या मनाशी त्यांना अनेक झटापटी कराव्या लागल्या त्याहि त्यानीं केल्या. अशा तऱ्हेनें मनाला नित्य अंकुश ठेवून त्याला जागृत राखण्याचा सतत उद्योग केला.

भगवत्प्राप्तिसाठीं तुकाराम महाराजानी याप्रमाणें पराकाष्ठेचे प्रयत्न केले. परतु त्याना परमेश्वराचा साक्षात्कार झाला नाहीं. त्याची साधना सुरूच होती. परतु परमेश्वराच्या दर्शनाची उत्कठा मात्र एकसारखी वाढू लागली. नाना प्रकारानीं त्यानीं परमेश्वराला आळविलें. कधीं पाडुरगावर आग पाखडली. कधीं त्याविषयीं त्यानीं त्याच्याजवळ क्षमायाचना केली. कधीं लोभानें त्याला हाक दिली. कधीं लडिवाळपणा केला. पण पाडुरग काहीं केल्या पावेना.

पाडुरगाचें श्यामसुदर स्वरूप निदान आपल्याला स्वप्नात तरी दिसावें म्हणून तुकाराम महाराजानी पाडुरगाचा धावा केला. गळ्यामध्यें एकेरी मोत्याची माळ आहे, कपाळावर कस्तुरीचा मळवट आहे, हातामध्यें शख, चक्र, गदा, पद्म हीं आयुधें आहेत आणि कर्णयुगुलामध्यें कुडले शोभत आहेत अशी पाडुरगाची दयाळू मूर्ति स्वप्नात का होईना पण एकदा तरी आपल्याला दिसावी अशी उत्कठा त्याच्या अत करणाला लागली. तुकाराम महाराजानी त्यासाठीं पाडुरगाचा धावा सुरू केला. तुकाराम महाराज म्हणाले, " हे पाडुरगा, आतापर्यंत तू अनेक पतित पातकी तारले आहेस, म्हणून तर तुला दीनाचा स्वामी ही सज्ञा प्राप्त झाली. गणिका नामक कुटीण ही व्यभिचारी स्त्री होती. परंतु नामस्मरणाच्या योगानें त्या पापिणीला विमानात घालून अचलभुवन जें वैकुठ त्याच्या ठिकाणीं तूं तिला नेऊन ठेविलेंस. सकटग्रस्त गजेंद्रानें तुझा धांवा केला म्हणून त्वरेनें धांवत जाऊन गजेंद्र व मगर या दोघांनाहि तू तारिलेंस. कोणाच्या अपराधाकडे व जातिकुळाकडे कांहीं लक्ष न देतां, अजामेळ नि भिल्लीणी यासारख्या पातकी माणसाना तू हात दिलास. ध्रुव बाळाला अढळपदीं स्थापन केलेंस. उपमन्यु बालकास दूध पिण्याकरितां दुधाचा समुद्र तूं दिलास. प्रल्हादाचें अग्निपासून नि पाण्यापासून

तूं रक्षण केलेंस. अशा रीतीनें तुझ्या नामचिंतनानें विषाचें अमृत झालेलें आहे. पांडवाचा तर तूं सतत पाठपुरावा केलेला आहेस. अशा तुला शरण येऊन मी तुझा आज्ञांकित झालों आहे. पतितांना पावन करणें हें जर तुझें ब्रीद असेल तर माझी निराशा करून मला तूं उदास करूं नकोस. तुझ्या दाराशीं मी ही भिक्षा मागत आहे. मला तू कृपादान दे.

" आणि देवा, तू मनामध्यें आणलेंस तर तुला काय अवघड आहे ? डोंगराची मोहरी व रंकाचा राजा करण्याचें तू मनांत आणलेंस तर तें सहज होईल. हे पांडुरंगा, अशुभाचें शुभ करणें, हें तुला कांहीं अवघड नाहीं. सोळा सहस्र स्त्रिया असून देव ब्रह्मचारी कसा आहे, ह्याचें साठ खंड्या अन्न खाऊन निराहारी असणाऱ्या दुर्वासास नवल नाहीं. पांच पांडवांची पत्नी एक द्रौपदी असून ती पतिव्रता व सर्व गोत्रजांचा नाश करणारा धर्म हा पुण्यवान आहे. दशरथ ब्रह्महत्या करणारा पातकी असून देवा, त्याच्या पोटीं तुम्ही जन्म घेतला हें नवल आहे. मुनीश्वरांनीं पुत्राचें भांडण लावून जो परस्पराचा वध केला, त्या संबधाचा त्यांना अणुमात्र दोष लागला नाहीं. तेव्हां हे देवा, अशांच्यापुढें माझे दोष ते कितीसे असणार ? मलाहि पावन करून आपल्या पदरात घे ! "

गोविंदाच्या दर्शनाची जेव्हां त्याच्या नेत्रांना याप्रमाणें अत्यंत भूक लागली आणि परमेश्वरावर सारा भार टाकून जेव्हां तुकाराम महाराजांनीं त्या भेटीचा खराखुरा संकल्प सोडला तेव्हां सत्यसंकल्पाचा दाता जो नारायण त्यानें त्याचे इच्छित मनोरथ पूर्ण करण्याचें ठरविलें.

तुकाराम महाराजाची साधना आतां पुरी होत आली होती. केलेल्या तपश्चर्येचें फळ पदरांत पडण्याचा समय समीप येऊन

ठेपलेला होता. त्याना आता सद्गुरुकृपेचा प्रसाद हवा होता. सद्गुरुकृपेवाचून कृतार्थता होत नाहीं हा शास्त्रसिद्धात तुकोबांना माहीत होता. नराचा नारायण याच गुरुकृपेच्या योगानें होत असतो. त्याच्या पूर्वींचे सारे संत गुरुकृपेची कास धरूनच साधकाचे सिद्ध बनले होते. गुरुचा अनुग्रह धारण करण्यास जेव्हा तुकाराम महाराजाची मनोभूमिका सिद्ध झाली तेव्हा बाबाजी चैतन्य या सद्गुरुनीं स्वप्नांत येऊन त्याना 'राम कृष्ण हरि'चा षडक्षरी मन्त्र सागितला. तेव्हा शके १५५४ माघ शुद्ध दशमी गुरुवार हा दिवस होता. त्या दिवशी त्याना एक स्वप्न पडलें. स्वप्नात तुकाराम महाराज त्याच्या नित्यनियमाप्रमाणें इंद्रायणीच्या स्नानाला चालले होते. त्यावेळीं सद्गुरुनीं येऊन त्याच्या मस्तकावर हात ठेवला नि तुकोबाना त्यांच्या आवडीचा वरील सोपा मन्त्र दिला.

अशा तऱ्हेनें गुरुप्रसादानें तुकाराम धन्य झाले. त्यानंतर शके १५५६ च्या सुमारास एकें दिवशीं पाडुरगासहवर्तमान नामदेव तुकोबाच्या स्वप्नात आले आणि व्यर्थ बडबड न करता कवित्व कर असा आदेश त्यानीं तुकोबाना दिला. नामदेवानी शतकोटी अभगाची प्रतिज्ञा केली होती. त्यापैकी शहाण्णव कोटी अभग त्यानीं रचले होते. उरलेले चार कोटी अभग रचण्याचें कार्य तुकोबांच्यावर सोंपविण्यात आलें.

तेव्हापासून कीर्तनाला उभे राहिल्यानतर तुकाराम महाराजाच्या मुखातून अखड अमृतवाणी पाझरू लागली. जणू प्रत्यक्ष पाडुरगानें सरस्वती नि लक्ष्मी या दोघीनाहि तुकाराम महाराजाच्या जिव्हेवर अवतीर्ण होण्यास सागितलें होतें. सरस्वतीच्या सान्निध्यानें त्याच्या अभंगाना विद्येचा अलकार चढला आणि लक्ष्मीच्या वास्तव्यानें त्या अभगाना अर्थरूपी धनसंपदा प्राप्त झाली. पाडुरंग त्याच्या

प्रत्यक्ष पाठीशी उभा असल्यामुळें त्या त्याच्या अभंगातून परमेश्वरी स्वरूपाचा आविष्कार झाला असल्यास त्यात कांहीच आश्चर्य नव्हतें. त्यामुळें त्याच्या अभंगाना खऱ्या अर्थानें 'अभंगत्व' प्राप्त झालें. त्या अभंगाच्या अमृत वर्षावात केवळ त्या काळची जनता न्हाऊन निघाली नि धन्य झाली असें नव्हे, तर आजहि त्या अभंगाचें तेंच कार्य चाललेलें आहे. त्याचें ते अभंग नि अमृत रूप आजहि कायम आहे. जेव्हा आषाढी-कार्तिकीला सारी पंढरी लक्षावधी भाविक भक्तानीं फुलून निघतें तेव्हा तुकोबांच्या याच अमर अभंगातून विठ्ठल नामाचा गजर भाविक भक्ताना ऐकू येतो नि त्या गोड गजरानें अवघी पंढरी दुमदुमते. त्याच अमृतवर्षावाचा सनातन अनुभव श्रोत्याना अजूनहि उपभोगायला सापडतो. खरोखर जें कधींहि भंग पावत नाहीं तें अभंग होय. या न्यायानें तुकाराम महाराजाचे अभंग खरोखरच 'अभंग' आहेत नि भविष्यकाळातहि ते तसेच राहतील. पुराणातरीं वर्ण-विलेला कलियुगाच्या अखेरचा प्रलयकाल जेव्हा होईल तेव्हा या धरित्रीवरील सारें वस्तुमात्र पुरेपूर पुसून जाईल. पण त्याहिवेळीं अभंग नि ओव्या याच्या रूपानें सह्याद्रिच्या परिसरात दुमदुमलेली ज्ञानोबाची, नामदेवाची, नाथांची नि तुकोबाची ही अमृतवाणी कधीं पुसली जाणार नाहीं. त्यावेळीं त्या अमर अमृतवाणीला स्वर्गात नेऊन ती सतत जतन करण्याचें कार्य प्रत्यक्ष पांडुरंगाला करावें लागेल; आणि ज्या ठिकाणाहून ती अमृतवाणी उदय पावली त्याच ठिकाणीं ती परत रक्षण केली जाईल यात कांहींच शंका नाहीं. अभंग नि अमर वस्तु या कधीं नष्ट झालेल्या आहेत काय ?

परंतु त्याच्या अभंगाचें अभंगत्व नष्ट करण्याचा प्रयत्न

त्याकाळीं एका महापंडितानें केला. तुकोबाची अभंगवाणी ऐकून त्याचा महिमा दिवसें दिवस वाढत चालला. सूर्योदयानंतर त्याच्या किरणाचें तेज ज्याप्रमाणें सर्वत्र फाकतें त्याप्रमाणें दैवी काव्यस्फूर्तीच्या उदयानंतर तुकोबाच्या अभंगाचें तेज सर्वत्र पसरलें. ही गोष्ट वाघोलीच्या रामेश्वर भटांना मुळींच रुचली नाहीं. तुकाराम जातीनें शूद्र असून आपल्या अभंगातून श्रुतीच्या अर्थाचें विवरण करतात आणि ब्राह्मणाचा आदर संपादन करतात ही गोष्ट शास्त्रसंमत नाहीं असें त्यांचें मत पडलें. त्यातूनच त्यांचा विरोध जन्म पावला. स्थल-काल-व्यक्ति बदलून इतिहासाची पुनरावृत्ति घडत होती. ज्ञानेश्वरांना याच मुद्यावर आळंदीच्या व पैठणच्या ब्राह्मणांनीं विरोध केला होता. एकनाथांना तर प्रत्यक्ष पोटच्या पोराच्या विरोधाला तोंड द्यावें लागलें होतें. शके १५६० च्या सुमारास रामेश्वर भटाच्या विरोधानें तुकोबाच्या समोर तोच प्रसंग उभा होता.

ज्ञानेश्वर, एकनाथ किंवा तुकाराम यांच्यासारखे जे द्रष्टे पुरुष असतात त्यांना आपल्यासमोरचा भविष्यकाळ स्पष्टपणानें दिसत असतो. त्यानुसार त्यांना नव्या परंपरा घडवावयाच्या असतात. अर्थात् सनातन परंपराच्या आधारावरच हें कार्य त्यांना घडवून आणावयाचें असतें. ' जुनें तें सारें त्याज्य ' असें म्हणून त्यांचा कार्यभाग होत नाहीं किंवा ' जुनें तें सोनें ' असेंहि म्हणणें त्यांना शक्य होत नाहीं. सुवर्ण मध्यावरच आपली नजर ठेवून त्यांना तें कार्य करावें लागतें. अर्थात् पुरातन परंपरेचे जे वारसदार असतात त्यांना परंपरा-रक्षणाचें कार्य करावयाचें असल्यामुळें त्यांचेशींच या द्रष्ट्या पुरुषाचा प्रथम संघर्ष येतो. परंतु या ठिकाणीं एक गोष्ट अवश्य ध्यानांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, सनातन परंपरा अभिमान्यानीं या संतांना—नव्या युगाच्या प्रवर्तकांना—विरोध केला म्हणून

ते लोक दुष्ट होते असें मानणें केव्हाहि युक्त होणार नाही. त्याच्याशीं प्रत्यक्ष संघर्ष करणाऱ्या संतानीं त्यांना कधींहि दुष्ट म्हणून संबोधलें नाहीं. आपणहि त्याना तसें संबोधून भागणार नाहीं. तुकाराम महाराजानींहि या प्रकरणीं तेंच केलें. त्यांनीं आपल्यापुरता एक निराळाच मार्ग शोधून काढला. त्यानी प्रत्यक्ष पांडुरंगाला कौल लावला.

यापुढें तुकोबानीं कवित्व करू नये नि आतापर्यंत केलेलें कवित्व त्यांनीं स्वहस्तें इंद्रायणींत नेऊन बुडवावें अशी आज्ञा रामेश्वर भटानीं तुकाराम महाराजाना केली आणि त्यांनींहि ती निमुटपणानें मानली. देहूस परत येऊन त्यांनीं पांडुरंगाचें दर्शन घेतलें. पांडुरंगाकडे पाहून त्यांच्या डोळ्यात अश्रु उभे राहिले. वस्तुतः त्याच्याच आज्ञेनें त्यानी हें कवित्व केलें होतें; आणि आतां पांडुरंगाची त्याबद्दल काय आज्ञा होती कुणास ठाऊक !

पांडुरंगाच्या आज्ञेसाठीं तुकोबा थांबले नाहीत. ते तडक घरीं गेले. एका वस्त्रात त्यांनीं आपल्या साऱ्या अभंगाच्या वह्या बांधल्या आणि इंद्रायणीच्या तीरीं येऊन ते दाखल झाले. ज्या भगवत्प्रसादानें त्यांनीं हे अभंग रचले होते त्या अभंगाना पारखे होताना त्याना परमावधीचें दुःख झालें. परंतु ती गोष्ट करण्यावाचून दुसरा इलाज नव्हता. त्यांनीं त्या वह्याच्या वस्त्रात दगड घातला मुखानें "पुंडलीक वरदा हरिविठ्ठल" हा पवित्र नामगजर केला आणि रामेश्वर भटाच्या आज्ञेनुसार त्यांनीं अभंगाच्या त्या वह्या इंद्रायणीच्या डोहांत बुडवून टाकल्या. याच इंद्रायणीच्या डोहात त्यांनीं पूर्वीं आपल्या कुळाचीं खतपत्रें बुडविलीं होतीं आणि ते आपल्या लौकिक संसाराला पारखे झाले होते आणि त्या दिवशीं त्याच इंद्रायणीच्या डोहात

तुकोबाच्या अभंगाच्या वह्या बुडत होत्या आणि आपल्या पारमार्थिक संसाराला ते पारखे होत होते.

परंतु योगायोग वेगळा होता. पांडुरंगाला त्यांच्या लौकिक संसारापेक्षा त्यांच्या पारमार्थिक संसाराची फार काळजी होती. तुकोबांनीं देखील आपल्या काळजीचा सारा भार पांडुरंगावर टाकला होता. हा प्रसंग घडल्यापासून त्यांनीं अन्नपाणी वर्ज्य केलें आणि विठ्ठलमंदिरासमोर तुळशीवृंदावनाशेजारी असलेल्या एका दगडावर ते पडून राहिले. त्या ठिकाणाहून ते तेरा दिवस उठले नाहींत. जणूं विठ्ठलाच्या पवित्र पायाशीं त्यांनीं सत्याग्रह सुरू केला होता. वस्तुतः सत्याग्रहाचा प्रारंभ पहिल्याप्रथमच या महाराष्ट्र भूमींत देहू गावात इंद्रायणीच्या तीरीं झाला; आणि तुकोबांना त्या सत्याग्रहाचें फळहि प्राप्त झालें. त्यांच्या त्या सत्याग्रहाच्या मागे फार बलिष्ट अशी धारणा होती अशा धारणेला फळ आल्याशिवाय कधींहि राहात नसतें.

तेरा दिवस पोटात अन्नपाणी न गेल्यामुळें तुकोबांचा पार्थिव देह प्रतिक्षणीं क्षीण होत चालला. श्वास घेण्याचीहि शक्ति त्यांच्या अंगीं उरली नाहीं. अखेरचा क्षण समीप आला असें वाटूं लागलें. परंतु तुकोबांच्या अंतःकरणातील परमेश्वर भक्ति मात्र क्षीण पावलेली नव्हती. मुखातून अखंड नामस्मरण सुरूच होतें. अखेरीस बाल मुकुंदानें प्रत्यक्ष दर्शन देऊन त्यांना धन्य केलें. परमात्म्याच्या आलिंगनाचा स्पर्श होताक्षणीच तुकोबांचीं सारीं गात्रें फुलून निघालीं. अंगाप्रत्यंगातून आनंद बाहेर पाझरू लागला. मुखावर अप्रतिम तेज विलसूं लागलें. इतक्यात त्यांच्या कानावर शब्द पडले, "राम कृष्ण हरि" आणि पुढें तर तो शब्दोच्चार इतका मोठा होत गेला की जणू इंद्रायणीच्या परिसरातील साऱ्या जड वस्तूंना जिव्हा फुटून त्यांच्याकडूनच तो शब्दोच्चार होत आहे कीं काय

असा स्पष्ट भास होऊं लागला. कांहीं वेळानें तुकोबानी आपले नेत्र उघडले. तों काय आश्चर्य ! त्याच्या अभंगाच्या वह्या पाण्या-वर तरंगत होत्या आणि तें दृश्य पाहून त्यांच्या भाविक भक्तानीं आनंदानें बेहोष होऊन ' राम कृष्ण हरी 'च्या गजरानें इंद्रायणीचें तीर दुमदुमून टाकलें होतें. खरोखर त्या दिवशीं इंद्रायणीच्या उदकाला तीर्थरूप प्राप्त झालें.

पांडुरंगानें या बाबतींत तुकोबाच्या बाजूनें जरी कौल दिलेला होता तरी रामेश्वर भटाशीं त्यानीं पुढें कधी वैर केलें नाहीं; आणि रामेश्वर भटानींहि या प्रसंगानंतर तुकाराम महाराजाचें ' संतपण ' मान्य केलें आणि ते त्याचे शिष्य बनले. केवळ रामेश्वर भटाच्या बाबतींतच नव्हे तर तुकोबाची एकंदर अवस्थाच निर्द्वंद्व अशी झालेली होती. यापूर्वीहि नि यापुढेंहि अनेकानीं अनेक प्रसंगीं त्याचेंशीं वैर केलें होतें. मंबाजी गोसाव्यानें त्याना एकदा माराचा प्रसाद दिला होता. कित्येक छलकानीं त्याचा असह्य छळ केला. परंतु तुकोबानीं आपल्या मनाचा तोल कधीं सोडला नाहीं. सगुण-साक्षात्कार झाल्यानंतर तर त्याच्या मनाची ही साम्यावस्था आधिकच वृद्धिंगत झाली. केवळ मानवी स्वरूपातच नव्हे तर सर्व भूताचे ठिकाणीं ते हरिचेंच रूप बघू लागले. माण-साचें चित्त शुद्ध असेल तर शत्रूचे देखील मित्र होऊं शकतात असा विश्वास त्याच्या मनात निर्माण झाला. चित्तशुद्धीच्या पोटीं विषाचेंसुद्धा अमृत होत असतें ही गोष्ट त्याच्या अंतःकरणांत बाणली होती. सर्व चराचर विश्व विष्णुमय आहे अशी केवळ महा-वैष्णवालाच साजेलशी भूमिका या महापुरुषाच्या ठिकाणीं उत्पन्न झालेली होती. त्याच्या मनाची ही साम्यावस्था अखेरीस इतक्या पराकोटीला पोंचली कीं प्रत्यक्ष शिवाजी महाराजाची नि त्याची

भेट होताच त्यांनीं सांगितलें, "आम्हाला मुंगीपासून राजापर्यंत सारे जीव सारखेच आहेत" शिवाजी महाराजानीं देऊं केलेल्या धनदौलतीकडे त्यानीं क्षणभरदेखील बघितलें नाहीं. त्याना त्या धन-दौलतीची काय आवश्यकता होती ? प्रत्यक्ष हरिदर्शनानंतर त्याचें मन आता कोठें धाव घेणार होतें? अखिल विश्वाची खरीखुरी संपत्ति त्यांच्या हातीं लागलेली होती आणि त्या संपत्तीचे धनी आता त्यांच्या ओटीवर येऊन बसलेले होते. त्यामुळें ऐहिक अभ्युदयाच्या वाटेला जावयाचें त्याना कांहींच कारण नव्हतें. तो मार्ग शिवाजी महाराजाचा होता. पुढें लोहगावीं तुकोबाची कीर्तनें ऐकून शिवाजी महाराजाच्या मनात विरक्तीचे विचार येऊं लागले. तेव्हां त्याना राजधर्माचें वर्म सांगून तुकोबानीं पुन्हा कर्तव्यतत्पर केलें. सारांश, ज्याप्रमाणें ते ऐहिक अभ्युदयाच्या वाटेला गेले नाहींत त्याप्रमाणें आपल्या नि श्रेयस मार्गाला त्यानीं शिवबांना येऊं दिलें नाहीं. या जगतात ज्याच्या त्याच्या भूमिका परमेश्वरानीं वाटून दिलेल्या आहेत. त्या त्या भूमिका त्या सर्वांनीं उत्तम रीतीनें नि निश्चयानें पार पाडल्याच पाहिजेत असें त्याचें मत होतें. शिवाजी महाराजाना वेळोवेळीं त्याची भूमिका स्पष्टपणानें सांगून हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या कार्मी समर्थ रामदासाच्याप्रमाणेंच तुकोबानींहि आपला फार मोठा हात-भार लावलेला आहे. शके १५६८ ते १५७१ या तीन वर्षांच्या कालावधींत तुकाराम महाराज, समर्थ रामदास नि शिवाजी महाराज यांच्या ज्या भेटीगाठी झाल्या असतील त्याच्या योगानें महाराष्ट्राच्या इतिहासाला निश्चित वेगळें वळण लागलें असलेंच पाहिजे. कोण-त्याहि कार्यांत भगवताचें अधिष्ठान लागतें ही गोष्ट शिवबाच्या रक्तात मूलत च भिनलेली होती. परतु त्याठिकाणी ती पक्की करण्याचें कार्य या दोन्ही महान् संतानीं केलेलें आहे. उभ्या महाराष्ट्राचें मान-

चित्र या तीन थोर महात्म्यानीं पार बदलून टाकलें नि महाराष्ट्राला मोठ्या मानाचें स्थान प्राप्त करून दिलें. युगायुगाच्या अवकाशातून इतके समर्थ महापुरुष क्वचितप्रसंगींच एकत्र नांदत असतात. परंतु महाराष्ट्र भूमि धन्य म्हणूनच तो अमृतयोग त्यावेळीं घडून आला.

या त्यांच्या उज्वल कार्यामुळेंच वारकरी संप्रदायांत तुकाराम महाराजांचें फार महत्व मानलें जातें. वारकरी संप्रदायाचे सारे नीतिनियम अगदीं काटेकोरपणानें स्वतः आचरणांत आणून त्यांनीं त्या संप्रदायावर सुवर्ण कळस चढविला आहे. ज्या परमपवित्र भक्ति-मंदिराचा भरभक्कम पाया ज्ञानदेवांनीं भरला त्या इमारतीवर तो सुवर्ण कळस चढवून तुकोबांनीं आपलें नांव अजरामर करून ठेवलेलें आहे. 'बोले तैसा चाले' या नियमानुसार वागणारे तुकोबा हे महान् संत होते आणि म्हणूनच त्यांचे चरण आजहि वंद्य मानले जातात. वारकरी संप्रदायाचीं तत्वें सांगूनच ते केवळ थांबले नाहींत तर तीं सारीं तत्वें त्यांनीं स्वतःच्या प्रथम आचरणांत आणलीं आणि नंतरच तीं सांगितलीं. खऱ्या नमुनेदार वारकऱ्याला शोभेल असेंच वर्तन त्यांनीं अखेरपर्यंत ठेवलें. पंढरीच्या पांडुरंगाची पाठ त्यांनीं कधीं सोडली नाहीं. 'रामकृष्ण हरी'चा महामंत्र ते कधीं विसरले नाहीत. सत्य भाषणाची कास त्यांनी अखेरपर्यंत धरली. परस्त्री मातेसमान मानली. पंढरीची वारी ते कधीं चुकले नाहींत. आपल्या कंठीं त्यांनीं सतत तुळसीमाळा धारण केल्या. मद्यमांसाचा त्याग केला. मनानें देखील कधीं हिंसा केली नाहीं. मानापमानाच्या वृथा लौकिक कल्पना उराशीं बाळगल्या नाहींत; आणि सर्वभूतीं परमेश्वराची वस्ती कल्पिली. भजनपूजन नि कीर्तन हे तर त्यांच्या आवडीचे नि परमादराचे विषय बनलेले होते. सर्व जगत् हें

विष्णुमय आहे असें मानण्याचा जो वैष्णवाचा धर्म आहे त्या धर्माकडे त्यानीं कधींहि पाठ फिरविली नाही. प्रत्यक्ष परमेश्वर-दर्शन झाल्यानंतर नि एवढ्या सार्‍या गोष्टी स्वत: पाळल्यानंतर जगाला त्या गोष्टी शिकविण्याचा अधिकार त्याना आपोआपच प्राप्त झाला. भक्तिमार्गाचे ते जणू प्रदीप बनले. शतावधी वर्षे लोटलीं तरी त्या त्याच्या अधिकारापासून ते अजून खालीं आलेले नाहींत आणि सहस्त्रावधी वर्षें याहिपुढें लोटलीं तरी त्या थोर अधिकारापासून ते कधींहि खालीं येणार नाहींत. त्याच्या अभंगवाणींत जितकी तेजस्विता होती तितकीच किंबहुना अधिक तेजस्विता त्यांच्या स्वत:च्या आचरणात होती. जीव सुखानें रंगलेले असोत अगर दु:खानें ते गाजलेले असोत, त्याना हे सर्व आपले आहेत असे जो मानतो तोच खरा साधु होय. या त्याच्याच साधुत्वाच्या व्याख्येनुसार तुकाराम महाराज हे खरेखुरे साधु होते.

आणि म्हणूनच त्याची अभंगवाणी पवित्र मानली जाते. त्या त्याच्या अभंगवाणींतून जे विचार बाहेर पडले ते स्वानुभवाच्या निकषावर घासलेले असत. त्यामुळें त्याना सत्याची बैठक होती. मानवी देहाविषयीं केवढें मोलाचें तत्त्वज्ञान त्याच्या मुखातून बाहेर पडलेलें आहे? आधी मानवी देह हाच मुळीं खरा नाहीं. तर देहसंबधीं स्त्रीपुत्रगृहादिक हें कोठून खरें असणार? त्याचें दिसणें शेतातील बुजगावणें जसें चोरास रक्षक आहे असें सत्य भासतें त्या-प्रमाणें होय. केवळ आभासात्मक असणार्‍या मानवी देहाविषयीं एवढें सखोल तत्त्वज्ञान सांगितल्यानंतर तुकाराम महाराजानीं पुढें असें म्हटलें आहे कीं, ज्याचा याप्रमाणें देहाविषयी सर्व अहंकार गेला आहे आणि निंदा, हिंसा, कपटादिक व्यवहार ज्याचेमध्यें नाहीं आणि देहबुद्धीही नाहीं तो निर्मळ स्फटिकासारखा स्वच्छ आहे.

फार काय सांगावें त्याचें सर्व शरीर चिंतामणीरूपच आहे. मोक्ष देणारें तीर्थ जी काशी तिची अशा लोकांना जरूरी नाहीं. सर्व जग वरती निर्दिष्ट केलेल्या पुरुषापाशींच येतें. कारण जेवढीं म्हणून पावन करणारीं तीर्थें आहेत त्या सर्व तीर्थांना पावन करणारा हा तीर्थच होय. त्याला बाह्य चिन्हाची काहीच आवश्यकता नाहीं. केवळ मन शुद्ध असल्यानें सर्व अलंकारानीं तो मंडित होतो; आणि जे निरंतर हरीच्या गुणानुवादाची गर्जना करितात त्यांच्या मनांत निरंतर आनंद वसत असतो. असा जो पुरुष आहे तो परिसापेक्षांहि अधिक मोलाचा आहे

वैष्णव धर्माचें रहस्य थोडक्यांत विषद करून सांगतांना त्यांनीं असें सांगितलें आहे कीं सर्व जगत् विष्णुमय जाणणें हाच वैष्णवाचा धर्म आहे. भेदाभेद, मतविचार हा केवळ अमंगळ भ्रम आहे. तेव्हां कोणाच्याहि जीवाचा मत्सर करू नका. हेंच सर्वेश्वर-पूजनाचें वर्म आहे. त्याचबरोबर हेंहि सांगायला ते विसरले नाहींत कीं, जे कोणी कुतर्कवादी आहेत त्यांची संगती सोडा व पांडुरंगाचें स्मरण करा. अनेक मतमतांतराच्या शोधांत पडू नका. कारण त्यातील खरें मत तुम्हाला कळणार नाहीं व तुम्ही व्यर्थ बुडाल

अशा तऱ्हेनें उभ्या जगाला नि आपल्या असंख्य भक्तसमुदायाला आपल्या अमोल अमृतवाणीनें नानाविध उपदेश करून झाल्यानंतर तुकाराम महाराजांनीं स्वर्गाचें प्रस्थान ठेवलें. स्वस्वरूप भावना जेव्हां त्यांच्या अंतःकरणांत प्रगट झाली तेव्हांच त्यांचे सारे नवस पूर्ण झाले आणि त्यांच्या अंतःकरणांतील आशेचा अंत झाला. एखाद्या जीवनमुक्ताप्रमाणें त्यांची स्थिति झाली. बीज भाजून त्याची लाही करावी त्याप्रमाणें जन्ममरणाचें बीज जें कर्म त्याची ज्ञानाग्निनें

माजून लाही झाली होती. त्यादृष्टीनें तुकाराम महाराज हे जन्ममरणाच्या फेऱ्यातून केव्हाच मुक्त झाले होते. त्यामुळें जरावस्था कानामध्यें मृत्युचा प्रसग जवळ आला अशी हकीगत जेव्हां त्यांना साागावयास आली तेव्हा चकित न होता ते तात्काळ सावध झाले.कारण आपल्या स्वत च्या मरणाचा म्हणजे देहबुद्धिनाशाचा उत्कृष्ट सोहळा त्यानी आपल्या आत्मबोधाच्या दृष्टीनें यापूर्वीच प्रत्यक्ष बघितलेला होता. त्यानीं आपला देह यापूर्वीच आत्मानात्मविवेकाच्या हातानें ब्रह्मरूप स्मशानांत पोंचविला होता. त्याच्या पार्थिव शरीराचे धर्म केव्हाच प्रेतरूप झाले होते. इतकेंच नव्हे तर देहपिंडाचेच पिंडदान आणि त्याचें मूळ जे त्रिगुण त्याचीहि तिलाजली त्यानीं यापूर्वी दिलेली होती. साराश, तुकाराम-महाराज आधीच पाडुरगमय बनले होते. मग पार्थिव देहत्यागाचें दु ख त्यांना काय म्हणून वाटणार ?

त्यामुळें त्याचा प्रयाणकाल जेव्हा समीप येऊन ठेपला तेव्हां त्याचें मन मुळींच विचालित झालें नाही. अखेरीस फाल्गुन मास उगवला. द्वादशीच्या दिवशी तुकाराम महाराजानीं जिजाईस पूर्ण बोध केला. त्यानीं जिजाईला सागितलें कीं, " सारें ममत्व सोडून तूं सर्वसगपरित्याग कर. घरातील साऱ्या चीजवस्तूंचें ब्राह्मणाना दान करून टाक नि गृहपाशातून मुक्त हो. आपण बरोबरच वैकुंठाला जाऊ ! " शके १५७१ फाल्गुन वद्य प्रतिपदेला त्यानीं कीर्तनाला प्रारंभ केला. देहूला गोपाळपुरा येथें नादुरगीच्या वृक्षाखालीं त्यांचें अखंड कीर्तन सुरू झालें. द्वितियेला शनिवार होता. त्यादिवशी त्याच्या पवित्र मुखातून एका मागून एक अभग बाहेर पडू लागले. आपल्या अभग वाणीनें ते परमेश्वराला म्हणाले, " हे देवा, कोणत्याहि तऱ्हेनें तुमचा शोध मला करता येत नाहीं,

म्हणून मी तुमच्या पायाचा आश्रय करीत आहे. हे नारायणा, आतां लोकाना मी दिसू नये असें करा "

यानतर ते म्हणूं लागले, "अहो सनकादिके सतहो, तुम्ही आपणास कृपावत म्हणविता देवाना तुम्ही माझा नमस्कार सागा. एवढा मजवर उपकार करा. नि मजविषयीं वैकुठाच्या स्वामीजवळ कीव, काकूळती करून विनति करा नि देवाला सागा कीं, माझी आठवण करून मला बोलावणें पाठवा. मन स्थिर करून मी वाट पाहात आहे. मला आता कटकट सोसत नाहीं. माझें सर्व चित्त तिकडे लागलें आहे."

इतक्यात गरुडाच्या पखाचा फडत्कार त्याना ऐकू येऊं लागला. हातीं शख, चक्र, गदा, पद्म धारण करून प्रत्यक्ष श्रीहरिला त्या गरुडावर बसून येताना त्यानीं बघितलें. त्याच्या मस्तकावरील मुकुटाच्या नि कानातील कुडलाच्या तेजानें सूर्य निस्तेज बनला होता. श्रीहरीचा वर्ण शामवर्ण मेघासारखा असून त्याची मूर्ति सुंदर सुशोभित दिसत होती. त्यानें आपल्या गळयात वैजयती माळ धारण केली होती. त्याच्या पिताबराच्या प्रकाशानें दशदिशा प्रकाशित झाल्या. तुकाराम महाराजाच्या दिशेनें येत असताना दुरूनच पुरुषोत्तमानें म्हटलें, "हे भक्तराजा जिवलगा, तू भिऊ नकोस, भिऊ नकोस. मी त्वरेनें येत आहे." श्रीहरीच्या त्या शब्दानीं तुकाराम महाराजाना केवढा धीर आला? गरुड वहानाच्या पलीकडे असंख्य वीणे व पताका यासह वैष्णवाचे समुदाय येताना दिसत होते. तें दृश्य पाहून तर तुकाराम महाराजाची खात्रीच पटली कीं प्रत्यक्ष परमात्मा पुरुषोत्तम आपणास त्याच्याबरोबर नेण्यासाठीं इकडे येत आहे. त्याना धन्यता वाटली. त्यानी निरवानिरवीचीं बोलणीं सुरू केलीं. त्या ठिकाणीं लोटलेल्या अमर्याद जनसमुदायाला

उद्देशून ते म्हणाले, "तुम्ही सर्वजण मला पोहोचवूनच परत आपल्या घरीं जा. तुम्हां सर्वांचें कल्याण असो. माझें पालनपोषण करून तुम्ही मला देवाच्या स्वाधीन केलेंत. त्यायोगानें माझी सर्व चिंता दूर झाली. मला प्राणाच्या स्वामीबरोबर जावयाचें आहे. आमची हीच अखेरची भेट आहे असें समजा. आता आमचें पुन्हा येणें जाणें, बोलणें-बसणें होणार नाहीं. आम्ही जातो. तुमची आमच्यावर कृपा असावी अशा प्रकारची सर्वांना माझी विनंति सांगावी."

"आम्ही जातो आमुच्या गावा, आमुचा रामराम घ्यावा," याप्रमाणें जमलेल्या असंख्य लोकांचा अखेरचा निरोप घेऊन ते गरुडासनावर आरूढ झाले. भजन-कीर्तनाची धमाल उडून गेली. त्या आवेगानें भाविकांच्या हातातील झांज फुटते कीं काय अशी भीति वाटू लागली. सगळ्या भक्तांनी तुकाराम महाराजांच्या अंगावर बुक्का नि फुलें उधळलीं. त्यावेळी त्यांचें रूप तेजःपुंज दिसत होतें. अंतःकरणातील समाधानाचा ठसा त्यांच्या मुद्रेवर स्पष्टपणानें उमटलेला दिसत होता. ते परमात्मास्वरुप बनून गेले होते. त्यांच्याकडे बघून अंतःस्फूर्तीनें "पुंडलीक वरदा हरिविठ्ठल" या नामाचा प्रचंड गजर होऊं लागला. 'रामकृष्णहरि' या मंत्राचाहि गगनभेदी घोष झाला. गरुड वहान वर उचललें गेलें तेव्हा लोकांच्याहि नजरा वर गेल्या. परंतु त्यांचे डोळे आनंदाश्रूनीं नि दुःखाश्रूनीं भरून गेल्यामुळें त्यांना कांहींच दिसेनासें झालें. त्यांनी आपली नजर वहात्या इंद्रायणीकडे टाकली. पण त्याहि ठिकाणीं तुकोबांना नेणाऱ्या त्या गरुड वहानाचें प्रतिबिंब उमटलेलें त्यांना दिसलें नाहीं. त्यांच्या कानावर फक्त सुस्वर शब्द पडत होते, "आम्ही जातो आमुच्या गावा, आमुचा रामराम घ्यावा." कांहीं वेळानें तेहि शब्द विरले. परंतु मध्यंतरीं कांहीं

क्षण लोटले आणि मग एकदम स्वर्ग मंडलात तुकाराम महाराजांच्या पवित्र नावाचा जयजयकार झालेला ऐकू येऊं लागला नि त्याचे पडसाद पृथ्वीवर उमटू लागले.

अनंत युगें लोटलीं तरी त्या त्यांच्या स्वर्गीय जयजयकाराचे पडसाद या पृथ्वीवरून कधींहि पुसले जाणार नाहींत। तुकाराम महाराजाचें नाव अजरामर झालेलें आहे.

—×—

संत-मुखांतून बाहेर पडलेली

—अ—

—म—

—र—

—अ—

—मृ—

—त—

—वा—

—णी—

# श्री. भा. द. खेर यांचें वाङ्मय

## प्र–का–शि–त

**चरित्र-विषयक**

* आषाढी–कार्तिकी.
* क्रांतिकारक खटले

**कादंबऱ्या**

* विजय
* सुखाचा लपंडाव
* प्रायश्चित्त
* क्रांतीच्या वाटेवर
* शुभांगी
* शुभमंगल
* गुलाबाचं फूल.

**कथासंग्रह**

* नादलहरी
* ऐतिहासिक गुजगोष्टी

## आ–गा–मी

★ रामनवमी ( रामायणातील नऊ उत्कृष्ट कथा )
★ गोकुळअष्टमी (कृष्णचरित्रातील आठ मनोवेधक कथा)

ज–य–श्री–प्र–का–श–न, २ नारायण पुणें २.

---

## महाराष्ट्राचें आवडतें मासिक

# —रोहिणी—

गोखले हॉल समोर, लक्ष्मीरोड, पुणें २.

उच्च दर्जाचें बहुमोल साहित्य पुरविणारें

श्रेष्ठ मासिक

वा. व. रु. १०

या मासिकाचा भारतीय संत विशेषांक दिवाळी अंका-नंतर प्रसिद्ध होईल.

वर्गणीदारांना त्याच वर्गणीत हा अंक मिळेल.

# आरत्या

१

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रुक्माई दिसे दिव्य शोभा॥
पुंडलिका भेटीं परब्रह्म आलें गा । चरणीं वाहे भीमा उद्धरी
जगा ॥ १ ॥

जयदेव जयदेव जय पांडुरंगा । रुक्माई वल्लभा राहीच्या वल्लभा
पावे जिवलगा ॥ ध्रु. ॥

तुळसीमाला गळां कर ठेऊनी कटीं । कांसे पितांबर कस्तुरी
ल्लाटीं ॥
देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढें उभे रहाती ॥२॥
आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्रभागेमाजी स्नान जे
करिती ।
दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ती । केशवासी नामदेव भावें
ओंवाळिती ॥ ३ ॥

२

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ॥ ध्रु० ॥
लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नांव ठेविलें ज्ञानी ॥ १ ॥
प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ।
रामा जनार्दनीं । पायीं टकाचि ठेलें ॥ २ ॥

३

जड मूढ उद्धरिले । सकळ जीवांसी तारिलें
होउनी सकळांचा । अवघे ब्रह्मरूप केलें ॥ १ ॥
आरती तुकारामा । स्वामी सद्‌गुरुधामा ।
सच्चिदानंदमूर्ति । पाय दाखवी आम्हां ॥ ध्रु० ॥

राघवें सागरांत । पाषाण तारिले ।
तैसे तुकोबाचे । उदकीं अभंग रक्षिले ॥ २ ॥
तुकितां तुळणेसी । ब्रह्म तुकासी आलें
म्हणोनि रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें.

## ज्ञानाचा नंदादीप--ज्ञानदेव

१

रूप पाहातां लोचनीं । सुख जालें वो साजणी ॥ १ ॥
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ॥ २ ॥
बहुता सुकृतांची जोडी । म्हणोनि विठ्ठलीं आवडी ॥ ३ ॥
सर्व सुखाचें आगरू । बाप रखुमादेवी वरू ॥ ४ ॥

२

सोनियाचा दिवस आजी अमृतें पाहला ।
नाम आठवितां रूपीं प्रगट पैं झाला ॥ १ ॥
गोपाळा रे तुझें ध्यान लागो मना ।
आनु न विसंबे हरि जगत्र जीवना ॥ ध्रु ॥
तनु मनु शरण विनटलों तुझ्या पाईं ।
रखुमा-देवीवरा वांचूनि आनु नेणें कांहीं ॥ २ ॥

३

माझे जिवींची आवडी । पंढरपुरा नेइन गुढी ॥ १ ॥
पांडुरंगीं मन रंगलें बाइये । गोविंदाचे गुणीं वेधलें ॥ २ ॥
जागृति स्वप्न सुषुप्ति नाठवे । पाहता रूप आनंदी आनंद ॥ ३ ॥
बाप रखुमादेवी वर निर्गुण सगुण । रूपें विटे वरि दाविली खूण ॥ ४ ॥

४

धनु वाजे घुणघुणा वारा वाजे रुणझुणा ।

भव तारकु हा कान्हा वेगीं भेटवा कां ॥ १ ॥
चाद वो चांदणें चापे वो चदन ।
देवकीनदनें विण नावडे वो ॥ ध्रु. ॥
चदनाची चोळी माझें सर्व अग पोळी ।
कान्हो वनमाळी वेगीं भेटवां कां ॥ २ ॥
सुमनांची सेज सीतळ वो निकी ।
वोळे आगी सारिखी वेगीं विझवा कां ॥ ३ ॥
तुम्ही गातसां सुस्वरें ऐकों नेदावीं उत्तरें ।
कोकिळें वर्जावें तुम्ही बाइयानों ॥ ४ ॥
दर्पणीं पाहतां रूप न दिसे वो आपुलें ।
बाप रखुमादेवीवर विठ्ठलें मज ऐसे केलें ॥ ५ ॥

५

इवलेंसें रोप लावियेलें द्वारीं । त्याचा वेल गेला गगनावरी ॥१॥
मोगरा फुलला मोगरा फुलला । फुलें वेंचितां वेंचितां अतिभारु कळियांसी आला ॥ ध्रु. ॥
मनाचे गुगुतीं गुंफिला शेला । बाप रखुमादेवीवरीं विठ्ठलीं अर्पिला ॥ २ ॥

६

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥
हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी॥ध्रु॥
असोनि संसारीं जिव्हे वेगु करीं । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा॥२॥
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणें । द्वारकेचे राणे पांडवा घरीं ॥३॥

७

याति कुळ माझें गेले हारपोनी । श्रीरंगावांचुनी आनु नेणे ॥१॥

किती वो शिकवाल मज वेळोवेळां । मी तया गोवळा रातलिये ॥२॥
अष्ट भोग भोगणें मातें नाहीं चाड भक्ति प्रेम गोड लेईन गे माये॥३॥
बाप रखुमादेवी वरु जीवींचा जिव्हाळा । कांहीं केलिया वेगळा नव्हे गे माये॥ ४ ॥

# पतितांचा दीपस्तंभ—नामदेव

— १ —

झणी दृष्टी लागो तुझ्या सगुणपणा । तेणें माझ्या मना बोध केला॥१॥
अनंता जन्मींचें विसरलो दुःख । पाहतां तुझें मुख पांडुरंगा॥२॥
योगियांच्या ध्यानीं ध्यातां नातुडसी । तो तूं आम्हापासीं मागें पुढें॥३॥
नामा म्हणे जीवें करीन निंबलोण । विटेसहित चरण ओवाळीन॥४॥

२

उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळां ।
झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळां ॥ ध्रु० ॥
संत साधु मुनि अवघे झालेती गोळा ।
सोडा शेजसुख आतां पाहूं द्या मुखकमळा ॥ १ ॥
रंगमंडपीं महाद्वारीं झालीसे दाटी ।
मन उतावेळ रूप पहावया दृष्टी ॥ २ ॥
राही रखुमाबाई तुम्हां येऊं द्या दया ।
शेजे हालउनी जागे करा देवराया ॥ ३ ॥
गरूड हनुमंत पुढें पाहती वाट ।
स्वर्गींचे सुरवर घेउनी आले बोभाट ॥ ४ ॥
झालें मुक्तद्वार लाभ झाला रोकडा ।
विष्णुदास नामा उभा घेऊनि काकडा ॥ ५ ॥

३

उठा अरुणोदय प्रकाश जाहला । घटा गजर गर्जिन्नला ।
हरी चौघडा सुरूं झाला । काकड आरती समयाचा ॥ १ ॥
महाद्वारीं वैष्णवजन । पूजासामुग्री घेउन ।
आले घावें तयांसि दर्शन । बंदिजन गर्जती ॥ २ ॥
सभामडपीं कीर्तनघोष । मृदग टाळविणे सुरस ।
आनंदे गाती हरीचे दास । परम उल्हास करूनियां ॥ ३ ॥
चद्रभागे वाळवटीं । प्रात.स्नानाची जनदाटी ।
आतां येतील आपुले भेटी । उठीं उठीं गोविंदा ॥ ४ ॥
ऐसें विनवी रुक्मिणी । जागृत झाले चक्रपाणी ।
नामा बद्धांजुळी जोडुनी । चरणीं माथां ठेवितसे ॥ ५ ॥

४

परब्रह्म निष्काम तो हा गौळिया घरीं ।
वाक्या बाळे अहु कृष्ण नवनीत चोरी ॥ १ ॥
म्हणती गौळणी हरीचीं पाउलें धरा ।
रांगत रांगत येतो हरी हा राजमदिरा ॥ २ ॥
लपत छपत येतो हरी हा राजभुवनीं ।
नंदासी टाकुनि आपण बैसे सिंहासनीं ॥ ३ ॥
सांपडला देव्हारा यासी बांधा दाव्यांनीं ।
शख चक्र गदा पद्म शारगपाणी ॥ ४ ॥
बहुतां कष्टें बहुतां पुण्यें जोडलें देवा
अनत पवाडे तुमचे न कळती मावा ॥ ५ ॥
नामा म्हणे केशवा अहोजी तुम्ही दातारा ।
जन्मोजन्मीं घाव्री तुमची चरण सेवा ॥ ६ ॥

# अनाथांचा नाथ—एकनाथ

कर जोडूनि विनवितो तुम्हां । नका करू संसार श्रमा ।
नका गुंतू विषयकामा । तुम्ही आठवा मधुसूदना ॥ १ ॥
रे तुम्ही वासुदेव वासुदेव म्हणा ॥ ध्रु० ॥
हा नरदेह दुर्लभ जाणा । शत वर्षांची गणना ।
त्यामध्यें दु:ख यातना । तुम्ही आठवा मधुसूदना ॥ २ ॥
नलगे तीर्थांचें भ्रमण । नलगे दंडण मुंडण ।
नलगे पंचाग्नीसाधन । तुम्ही आठवा मधुसूदना ॥ ३ ॥
हीच माझी विनवणी । जोडोनिया कर दोन्ही ।
शरण एका जनार्दनी । तुम्ही वासुदेव म्हणा अनुदिनी ४

२

जया परमार्थाची चाड । तेणें सांडावें लिगाड ।
धरुनी भजनाची चाड । नित्य नेम आदरें ॥ १ ॥
साडी माडी परती टाकीं । वासुदेव नाम घोकीं ।
मोक्ष येईल सुखीं । नाम स्मरता आदरे ॥ २ ॥
रामकृष्ण वासुदेवा । धरीं हाचि दृढभावा ।
आणिकाचा हेवा । दुरीं करीं आदरें ॥ ३ ॥
घालीं सतासी आसन । पूजा करीं काया वाचा मनें ।
एका जनार्दनीं जाणें । इच्छिलें तें पुरवी ॥ ४ ॥

३

खाद्यावरी कांबळी हातामधीं काठी
चारीतसे धेनु सावळा जगजेठी ॥ १ ॥
राधे राधे राधे राधे मुकुंद मुरारी ।
वाजवितो वेणु कान्हा श्रीहरी ॥ २ ॥

एक एक गौळणी एक एक गोपाळ ।
हातीं धरुनी नाचती रासमंडळ ॥ ३ ॥
एका जनार्दनीं रासमंडळ रचिलें ।
जिकडे पाहे तिकडे अवघें ब्रह्मचि कोंदलें ॥ ४ ॥

४

ऐक ऐक सखये बाई । नवल मी सांगू काई ।
त्र्यैलोक्याचा धनी तो हा । यशोदेसी म्हणतो आई ॥१॥
देवकीनें वाहिला । यशोदेनें पाळिला ।
पांडवाचा बंदिजन । होऊनियां राहिला ॥ २ ॥
ब्रह्मांडाची साठवण । योगियाचें निजधन ।
चोरी केली म्हणऊन । उखळासी बंधन ॥ ३ ॥
सकळ तीर्थें जया चरणीं । सुलभ हा शूळपाणी ।
राधिकेसी म्हणे तुझी । करीन वेणीफणी ॥ ४ ॥
शरण एका जनार्दनीं । कैवल्याचा मोक्षदानी ।
गाई गोप गोपीबाळा । मेळविले आपुलेपणीं ॥ ५ ॥

## भक्तिमार्ग प्रदीप—तुकाराम

१

सुंदर तें ध्यान उभें विटेवरीं । कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥
तुळसीहार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥२॥
मकर कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभ मणि विराजित ॥३॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें॥४॥

२

एक धरिला चित्तीं । आम्ही रखुमाईचा पती ॥ १ ॥
तेणें जालें अवघें काम । निवारला भवभ्रम ॥ २ ॥

ठाणे
७५८५
क्र.



परद्रव्य धननारी । जाली विषाचिया परी ।। ३ ।।
तुका म्हणे फार । नाहीं लागला व्यवहार ।। ४ ।।

३

।। आम्हां वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा ।
विश्वास नामाचा एका भावे
तरीच हरिचे दास म्हणवितां श्लाघीजे ।
निर्वासना की जे चित्त आधीं
गाऊ नाचू प्रेमें आनदे कीर्तनीं ।
भुक्ति मुक्ति दोन्ही न मागो तुज
तुका म्हणे देवा ऐसीयांची सेवा ।
द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं

४

धर्माचें पाळण । करणें पाखाड खडण ।। १ ।।
हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ।। २ ।।
तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेऊनि बाण फिरें ।। ३ ।।
नाहीं भीड भाड । तुका म्हणे साना थोर ।। ४ ।।

५

नाहीं संतपण मिळत हें हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ।।१।।
नये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें।।२।।
तुका म्हणे मिळे जिवाचिये साटीं । नाहीं तरी गोष्टी बोलों नये।।३।।

६

संताचिया पायीं हा माझा विश्वास । सर्वभावें दास जालो त्यांचा
तेचि माझें हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी
मागलिया मज बाहतील कडिये । त्यांचियानें जोडे सर्व सुख
तुका म्हणे शेष घेईन आवडी । वचन न मोडी बोलिले तें ।।